# पुणे महानगरपालिका

## सन २०२०–२१

## महापालिका आयुक्त यांचे निवेदन

**स्थायी समितीचे माननीय अध्यक्ष व सभासद,**

मी महापालिका आयुक्त या पदाचा नुकताच पदभार घेतला असून, पदभार स्वीकारता क्षणीच महाराष्ट्रातील नामांकित अशा महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सादर करण्याचे संधी मला मिळाली हा माझा सन्मान आहे, असे मी समजतो. देशातील एका अग्रस्थानी व नांवलौकिक असलेल्या महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सादर करताना मला आनंद होत आहे. **मा. स.गो.बर्वे यांनी सन १९५० ते १९५२ मध्ये शहराचे महापालिका आयुक्त म्हणून जी जडणघडण सुरु केली. त्यांनी व त्याच्यानंतर आलेल्या सर्व महापालिका आयुक्त यांच्या योगदानाबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.**

**कोणत्याही शहरामध्ये राहण्याचा अभिमान गरीब–श्रीमंत, वृद्ध, महिला, अपंग, विधवा आणि समाजातील उपेक्षित घटकांपासून सर्वांना ज्या दिवशी वाटेल त्या दिवशी महानगरपालिकेचे काम चांगले झाले आहे, असे मानावे लागेल. त्यामुळे या शहराचा महापालिका आयुक्त झाल्या पासून सामान्य नागरिकांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी लागणारे सर्व प्रयत्न करण्याची माझी तयारी आहे.** पुणे शहर शैक्षणिक, औद्योगिक, आय.टी.हब, रोजगार निर्मितिचे शहर असल्याने व हे शहर राहण्यायोग्य (Most Livable City) असल्याने शहराचे आकर्षण सर्व स्तरावर आहे. त्यामुळे शहराकडे येणाऱ्या लोकांचा लोंढा दिवसेंदिवस वाढत असल्याने त्याचा ताण शहराच्या मुलभूत सोयीसुविधा व विकासाच्या गतीवर होत असतो. त्यामुळे सामान्य माणूस (Comman Man) डोळयासमोर ठेऊन शहराच्या मुलभूत बाबी म्हणून पाणी, वाहतूक कचरा, आरोग्य व शहराचे पर्यावरण या गोष्टींचा विचारात करुनच अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. या शहराचा नागरिक अतिशय दक्ष व चौकस असल्याने त्यांच्या अपेक्षांची चाचपणीही अंदाजपत्रक तयार करताना करावी लागते. अंदाजपत्रक तयार करताना शहराची विकासाची कामे, लहान–मोठे, अल्प व दिर्घ मुदतीचे प्रकल्प यांचा प्राधान्यक्रम यांचाही विचार करण्याचे आव्हान प्रशासनावर व राजकिय स्तरावर निश्चितच असते आणि शहराच्या सर्वसमावेशक विकासाची गतीही साधावी लागत असते.

पुणे महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून कार्यरत असल्याने पुणे शहरातील शासकीय व केंद्र शासनाचे विविध विभागांची कामे एकमेकांच्या सहकार्यावर व समन्वयावर अवलंबून असल्याने ही कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीनेही अंदाजपत्रकात गरजेनुसार तरतूद करावी लागत असते.

तसेच केंद्र व राज्य शासनाच्यावतीनेही अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येत असतात. त्यात प्रामुख्याने प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत अभियान, आयुष्यमान भारत या महत्वकांक्षी योजनांचा समावेश असल्याने त्यांची अंमलबजावणी करताना त्यास अनुसरुन अंदाजपत्रकात या बाबींचा समावेश करावा लागत असतो. अशा सर्व कामांचा व सेवांचा सर्वसमावेशक वापर करुन

गतीमान, कार्यक्षम व पारदर्शी प्रशासकीय कामांसाठी व शहरातील प्रत्येक नागरिकाचा विकास ही धारणा डोळयासमोर ठेऊन सेवासुविधा प्रदान करणे हे प्रमुख उद्दिष्ट साध्य करावे लागणार आहे.

**या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट असलेल्या सर्व योजना व नव्याने प्रस्तावित योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना आलेल्या सर्व सकारात्मक सूचनांचे मी स्वागतच करतो.**

**तथापि, माझी आपणास नम्र विनंती आहे की, विधी मंडळ, जिल्हा परिषद, अन्य शासकीय संस्था तसेच राष्ट्रीय पातळीवर नावाजलेल्या संस्थामधील अर्थसंकल्पाप्रमाणे आपला अर्थसंकल्प असला पाहिजे. त्यामुळे पुन्हा-पुन्हा पुर्नविनियोजन करुन अर्थसंकल्पात बदल करण्याचे धोरण कटाक्षाने पुणे महानगरपालिकेने टाळले पाहिजे. त्यामुळे एकदा अंदाजपत्रक तयार झाल्यावर त्यामध्ये पुर्नविनियोजनची प्रक्रिया अपवादात्मक परिस्थितीत एकदाच अंदाजे नोव्हेंबर- डिसेंबरच्या सुमारास अंगीकृत करावी, असे मी प्रस्तावित करीत आहे.**

## सन २०१९-२० मध्ये पुणे महानगरपालिकेस मिळालेली अ‍ॅवॉर्डस् -

- **स्मार्ट सिटीज डिजिटल पेमेंटस अ‍ॅवॉर्डस**- भारत सरकारच्या शहरी आवास मंत्रालयाने ७२ स्मार्ट सिटीमध्ये पुणे शहराला दि.२६ फेब्रुवारी,२०१९ रोजी नवी-दिल्ली येथे १० लाख पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांच्या श्रेणीतील, डिजिटल पेमेंटस अ‍ॅवॉर्ड मध्ये पुणे शहराने '**बेस्ट डिजिटल पेमेंटस अ‍ॅडॉप्टर**' पुरस्कार मिळाला आहे.
- **Wellbeing City Award -** पुणे महानगरपालिकेला '**लाईट हाऊस**'प्रकल्पासाठी भारतातील पुणे शहराला अर्थव्यवस्था आणि संधी क्षेत्रातील मॉन्ट्रीअल शहर, कॅनडा व नोवार्टिक युएस फाउंडेशन यांच्या समवेत न्यूसिटीज या संस्थेने ''**वेलबीईंग सिटी अ‍ॅवॉर्ड २०१९**' विजेता म्हणून प्राप्त झाला आहे. वेलबीईंग सिटी अ‍ॅवॉर्ड हा जागतिक पातळीवरील पहिला पुरस्कार असून तो शहराद्वारे नागरी कल्याणसाठी केल्या जाणाऱ्या कार्यक्रमाची ओळख करुन देतो.
- **शाश्वत परिवहन पुरस्कार -** रस्ते, पादचारी पायाभूत सुविधा सुधारणांमधील प्रादेशिक नेतृत्व आणि बीआरटी सिस्टम ग्रोथ मधील प्रतिष्ठित '**शाश्वत परिवहन पुरस्कार**' पुणे मनपास प्राप्त झालेला आहे. विशेषत: सर्व टिकाऊ वाहतुकीच्या पध्दतींसाठी वेगवान वचनबध्दतेमुळे पुण्याला हा पुरस्कार ब्राझील या देशाने दिलेला आहे. पादचारी पायाभूत सुविधांमध्ये महत्वपूर्ण वाढ. ज्यामध्ये रस्त्याचे डिझाईन फक्त कारसाठी न वापरता पादचारी, सायकलस्वार, वाहनचालक आणि सुरक्षित प्रवास यासर्व सुविधांसाठी दिला जातो.
- **स्कॉच अ‍ॅवॉर्ड ऑफ मेरिट -**
    - Urban95 Programme अंतर्गत पाच वर्षाच्या आतिल बालकांचे जीवनमान सुधारण्यासाठी शहरातील नियोजन आणि व्यवस्थापनातील बाल विकास यासाठी पुणे अर्बन Initiative हा उपक्रम शॉर्टलिस्ट केलेला आहे. **स्कॉच अ‍ॅवॉर्ड ऑफ मेरिट** हा पुरस्कार स्कॉच ग्रुप,दिल्ली यांचेमार्फत पुणे महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे.
    - माहे - नोव्हेंबर २०१९ मध्ये ET Global Smart Cities Forum Awards २०१९ व माहे ऑगस्ट २०१९ मध्ये Skoch Award : Order of Merit , असे दोन पुरस्कार Pune E-learning करिता नवी दिल्ली येथे प्राप्त झालेले आहेत.
    - माहे ऑगस्ट २०१९ मध्ये Skoch Award: Order of Merit, PMC Enterprise GIS प्रकल्पाकरिता नवी दिल्ली येथे पुरस्कार मिळाला.
    - माहे ऑगस्ट २०१९ मध्ये Skoch Award - Order of Merit, PMC Enterprise Dashboard प्रकल्पाकरिता नवी दिल्ली येथे पुरस्कार मिळाला.

## मागील चार वर्षाच्या महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाचा संक्षिप्त आढावा

| जमा बाजू | डिसेंबर २०१६ अखेर | डिसेंबर २०१७ अखेर | डिसेंबर २०१८ अखेर | डिसेंबर २०१९ अखेर |
|---|---|---|---|---|
| स्थानिक संस्था कर | १०५१.७४ | ६३५.६६ | ७३.४३ | १२४.१७ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | ० | ८२३.८० | ११७९.५४ | १२७६.९२ |
| मिळकतकर | ८९८.६० | ६०७.४७ | ७५०.४१ | ८२६.६१ |
| पाणीपट्टी | ३५.४९ | १४९.५६ | १९७.४३ | १९७.४९ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ४०२.०५ | ३२९.१२ | ५५९.८७ | ५८८.९७ |
| इतर जमा | २१७.८७ | २९८.३६ | १९४.४७ | २०५.९९ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ० | ३९.९० | ०.३० | – |
| शासकीय अनुदान | १२.४१ | ७९.३९ | ९९.०२ | १२२.३६ |
| कर्जरोखे | ० | २००.०० | – | – |
| प्रधानमंत्री आवास योजना | – | – | ०.०३ | – |
| **एकुण रक्कम रूपये** | **२६१८.७४** | **३१६३.२६** | **३०५४.५०** | **३३४२.५१** |

| खर्च बाजू | डिसेंबर २०१६ अखेर | डिसेंबर २०१७ अखेर | डिसेंबर २०१८ अखेर | डिसेंबर २०१९ अखेर |
|---|---|---|---|---|
| सेवकवर्ग खर्च | ७४३.२२ | ११६३.२७ | १०८१.०५ | ११२६.६८ |
| प्राथमिक शिक्षण | १०७.६४ | **०** | ० | ० |
| वीजखर्च व दुरूस्ती | १११.०६ | १४३.५१ | १४९.८६ | १६९.७० |
| पाणीखर्च | ७.५७ | १३.९८ | ५६.९४ | ५१.३७ |
| कर्जपरत फेड, व्याज व घसारा | ३५.५१ | १२.७१ | २१.०६ | २९.६१ |
| औषधे, पेट्रोल व डिझेल | ६९.७० | ६०.३५ | ७४.४२ | १०१.८१ |
| देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | २८७.१३ | ३०९.३५ | ३७६.६५ | ४१५.६२ |
| वॉर्डस्तरीय कामे | ४.४२ | १.३३ | ४.४२ | ३.६० |
| क्षेत्रीय कार्यालयाने करावयाचे कामे (नॉन प्लॅन) | १८.४३ | ०.४० | ५.८६ | १२.७० |
| भांडवली व विकासाची कामे | ४९८.३५ | ५३२.२३ | ४३५.०१ | ५३७.८३ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ५१.८४ | ६५.०३ | ३२.९१ | १५.६६ |
| **एकुण रक्कम रूपये** | **१९३४.८७** | **२३०२.१६** | **२२३८.१८** | **२४६४.५८** |

# विकास योजना प्रगती आढावा:-

## (१) पाणी पुरवठा (भांडवली तरतूद र. रु.६५६.६५ कोटी + महसूली तरतूद र.रु.६०३.९० कोटी = र.रु.१२६०.५५ कोटी)

### सन २०१९-२० चा दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- सन २०१९-२० सालासाठी मा.स्थायी समितीने मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार पाणीपुरवठा विभागासाठी महसुली कामासाठी र.रु. ५८६.९३ कोटी व भांडवली कामासाठी र.रु. ५७९.८३ कोटी असे एकुण र.रु. ११६६.१७ कोटीची तरतूद करण्यात आली होती. या तरतूदीचे अनुषंगाने सन २०१९-२० सालासाठी पाणीपट्टीपोटी र.रु. ३२० कोटी मिळणेचे उद्दिष्ट ठरवून दिलेले होते. त्या अनुषंगाने दिनांक ३१/१२/२०१९ पर्यत पाणीपट्टीपोटी र.रु. ७१.२५ कोटी जमा झालेले आहे. सदर अंदाजपत्रकात पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी २४ X ७ पाणीपुरवठा योजना राबविण्याकरीता मोठयाप्रमाणात तरतूद करण्यात आली होती व पुणे शहरामध्ये १४० कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या विकसित करण्यात आल्या आहेत तसेच अंदाजे पाच हजार जलमापक बसविण्यात आले आहेत. सदर योजने अंतर्गत ८२ साठवण टाक्या बांधणे, १८०० कि.मी. लांबीची जलवाहिनी टाकणे व ३.१५ लक्ष जलमापक बसविणे अंतर्भूत आहे.

**सन २०१९-२० मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नावीन्यपूर्ण योजना/प्रकल्पांची नावे ठळक बाबी.**

- पुणे शहरासाठी सन २०४७ सालच्या गरजा लक्षात घेऊन पाणीपुरवठा करणेसाठी ८२ साठवण टाक्या उभारणे प्रस्तावित आहे. यापैकी सध्या २६ साठवण टाक्यांची कामे पूर्ण झाली असून, माहे जानेवारी २०२० पर्यत किमान ५० साठवण टाक्यांची कामे पूर्ण होणे अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी या योजने अंतर्गत सुमारे ३०० कि.मी. लांबीच्या जलवाहिनीचे काम माहे मार्च २०२० पर्यत पूर्ण करणे व ४० हजार मीटर बसविणेचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. या पाणीपुरवठा प्रकल्पा अंतर्गत गणेशनगर या भागात १००% मीटर बसविण्यात आलेले असून, या भागामध्ये पूर्वी असलेली पाणी गळती, चोरी इत्यादीचे प्रमाण मोठया प्रमाणात कमी करण्यात आले आहे. तसेच ज्या भागामध्ये यापूर्वी पाण्याचा तुटवडा होता. त्या भागामधून नागरिकांकडून पाणीपुरवठया बाबत समाधान व्यक्त करण्यात येत असून, दरडोई पुरेसा पाणीपुरवठा सुरु करणेत आलेला आहे.

### सन २०२०-२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- सन २०२०-२१ सालासाठी महसुली तरतूद र.रु. ६०३.९० कोटी व भांडवली कामासाठी र. रु. ६५६.६५ कोटी असे एकुण र.रु. १२६०.५५ कोटीची मागणी करण्यात आली आहे. या अंदाजपत्रकामध्ये २४ X ७ पाणीपुरवठा योजनेसाठी सुमारे र.रु. ८०० कोटीची तरतूद करण्यात आलेली असून, यामध्ये ५०० कि.मी. लांबीची जलवाहिनी टाकणे व १.५ लक्ष जलमापक बसविण्याची कामे अंतर्भूत आहेत.

### सन २०२०-२१ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना.

- पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी पाणीपुरवठा प्रकल्प अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये सर्व साठवण टाक्या बांधण्याची कामे पूर्ण करुन, साठवण टाक्या कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे. पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी असलेला दुसरा प्रकल्प भामा आसखेड धरणातून पाणी आणण्याची योजना सन २०२०-२१ मध्ये कार्यान्वित करणेचे उद्दिष्ट असून, यामुळे पुणे शहराच्या पूर्व भागातील वडगांवशेरी, खराडी, चंदननगर, विमाननगर, कळस, धानोरी इत्यादी भागाची पाणी समस्या पूर्णपणे सोडविणे शक्य होणार आहे. सदर योजनेसाठी केंद्र शासनाचे जेएनएनयुआरएम टप्पा क्र. २ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

**राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी प्रदुषण नियंत्रण करणे (जायका प्रकल्प)**

### सन २०१९-२०२० (तरतूद र.रु. ८० कोटी)

- सन २०२७ पर्यतच्या लोकसंख्या वाढीनुसार निर्माण होणारे संपूर्ण मैलापाणी शुध्दीकरण करणेसाठी राष्ट्रीय नदी संवर्धन संचलनालय, नवी दिल्ली यांची जपान सरकारच्या (जायका) अर्थसहाय्याने करावयाच्या र.रु. ९९०.२६ कोटीच्या योजनेस दि. १४.०१.२०१६ रोजी मे.केंद्र सरकारमार्फत मंजुरी मिळालेली आहे.
- सदरची योजना राबविण्याकरिता योजनेच्या ८५% रक्कम केंद्र शासनाकडून अनुदान स्वरुपात पुणे मनपाला प्राप्त होणार असून, उर्वरीत १५% रक्कम पुणे मनपाने उभारणे अपेक्षित आहे. सदरची योजना सहा वर्षाच्या कालावधीमध्ये राबविण्याचा पुणे मनपाचा मानस आहे.
- सदर योजनेमध्ये प्रामुख्याने ११ ठिकाणी मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे उभारणे, सुमारे ११३ कि.मी. लांबीच्या मलवाहिन्या विकसीत करणे, जीआयएस/एमआयएस, स्काडा यंत्रणा उभारणे, कम्युनिटी टॉयलेट ब्लॉक उभारणे इ. अशा एकुण १३ पॅकेजेसच्या कामांचा समावेश आहे.
- सदर प्रकल्पासाठी आतापर्यंत र.रु. ३८.६९ कोटी इतका खर्च झालेला आहे.
- पुणे शहरामध्ये पाण्याचे काही नैसर्गिक स्त्रोत आहेत. उदा. बावधन येथील झरा, वृध्देश्वर-सिध्देश्वर घाटाजवळील झरा इत्यादी सद्य:स्थितीमध्ये या स्त्रोतांचा वापर होत नाही. सदर स्त्रोतांचा विकास करुन सदरचे पाणी उद्यान, बाग, बांधकाम इत्यादी वापरासाठी उपयोगात आणणे शक्य आहे. सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकामध्ये यासाठी र.रु. १ कोटीची तरतूद करण्यात आली असून, शहरातील नैसर्गिक स्त्रोतांचा जास्तीत जास्त वापर करण्यावर भर देणार आहे.

### सन २०२०-२०२१ (तरतूद र.रु. ७५ कोटी)

- सदर प्रकल्पामधील ६ मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे उभारण्याचा समावेश असलल्या पॅकेज क्र. ४,५,६ व ८ (एकुण क्षमता २७७ एमएलडी) आणि मुख्य मलवाहिन्या ७० कि.मी.लांबी) विकसीत करण्याच्या पॅकेज क्र. २ व ३ मधील कामे सुरु करण्यात येणार असून, सदर कामे आगामी ३ वर्षात पूर्ण करण्यात येणार आहेत.
- उर्वरीत पॅकेजेस मधील कामांची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येऊन सन २०२२ अखेर कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

## (२) <u>मलनि:सारण (भांडवली तरतूद र. रु.११७.२६ कोटी + महसूली तरतूद र.रु. १८०.९२ कोटी = २९८.१८ कोटी)</u>

### सन २०१९-२०

- सन २०१९-२० चे अंदाजपत्रकाव्दारे मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभागाच्या कार्याधिकारा अंतर्गत येणाऱ्या कामांकरिता उपलब्ध तरतुदीनुसार ४५० मि.मी ते १६०० मि.मी व्यासाचे सुमारे ४० कि.मी लांबीच्या मलवाहिन्या विकसित करण्याचे काम प्रस्तावित होते. त्यापैकी ३५ किमी लांबीच्या मलवाहिन्यांचे काम पूर्ण करणेत येणार असून उर्वरित कामे प्रगती पथावर आहेत.
- पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावांमध्ये मोठया व्यासाच्या ट्रंक लाईन विकसित करण्याच्या दृष्टीने सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या तरतुदीमधून पुर्वगणनपत्रके तयार करून कामे प्रगतीपथावर आहेत.
- पुणे मनपा हद्दीतील व नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांसाठी मैलापाणी वहन व्यवस्थेबाबत मास्टर प्लॅन तयार आहे. सदर गावांमध्ये र.रु. ११.५५ कोटीचे काम पूर्ण करण्यात येणार आहेत.

- पुणे शहरातील व नव्याने समाविष्ट ११ गावांमधील क्षेत्राची विविध ड्रेनेज ड्रिस्ट्रीक्ट (झोन) प्रमाणे प्रभाग निहाय माहिती संकलित करणेचे काम सुरू आहे.

## सन २०२०–२१

- पुणे शहरामधील नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविणे अंतर्गत आणि भौगोलिक विस्तार, नवीन गावांचा समावेश तसेच नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान आणि भविष्यातील बाबींचा विचार करता मलनिःसारण व्यवस्था सुनियोजित करणेसाठी खालील मुद्दयाच्या आधारे सन २०२०–२०२१ चे अंदाजपत्रक सादर करणेत येत आहे.
- पुणे महानगरपालिका क्षेत्रातील अपुऱ्या व्यासाच्या मुख्य ट्रंक लाईन बदलणे, नाल्याच्या पात्रातील मलवाहिन्या हलविणे व नाल्यामधील मलवाहिन्यांची कनेक्टीव्ही करणे, मोठया व्यासाच्या मलवाहिन्या टाकणे, या कामासाठी भरीव तरतूद करण्यात येत आहे.
- पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावांमध्ये मोठया व्यासाच्या ट्रंक लाईन विकसित करण्याच्या दृष्टीने सन २०२०–२१ मध्ये मुख्य मलवाहिन्या विकसित करणेकामी तरतूद करण्यात आली असून ११ गावांमधील मलवाहिन्यांच्या केलेल्या मास्टरप्लॅन प्रमाणे मुख्य मलवाहिन्या विकसित करण्यात येणार आहे.
- पुणे शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे अंबिल ओढ्यातील गाळ काढणे, मनपाच्या जागांना रस्त्यांना संरक्षक भिंती बांधणेच्या कामांचे पुर्वगणनपत्रके तयार करण्यात येत असून सदर कामासाठी सन २०२०–२१ मध्ये र.रू.३३ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.
- पुणे मनपा हद्दीतील व नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गांवामध्ये मैलापाणी वहन व्यवस्थेबाबत मास्टर प्लॅन तयार करणेचे काम करणेत आलेले असून सन २०२०–२१ या आर्थिक वर्षाकरिता तरतूद करण्यात आली आहे.

## मैलापाणी शुध्दीकरण –

- पुणे शहरात आजमितीस ७४४ दशलक्ष लिटर प्रतिदिन एवढे मैलापाणी निर्माण होते. सध्या ५६७ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेची १० मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे पुणे महानगरपालिका मार्फत उभारण्यात आलेली आहेत. सध्या अस्तित्वातील १० STP ची एकुण क्षमता ५६७ दशलक्ष लिटर असुन प्रत्यक्षात बंद जुना नायडु (९० एम.एल.डी) मैलापाणी शुध्दीकरण केंद्र वगळता सदर ९ STP ची एकुण क्षमता ४७७ MLD इतकी आहे. तथापि, दैनंदिन एकुण सरासरी ४०० ते ४२५ MLD इतकी मैलापाण्यावर प्रक्रीया केली जात होती. सध्या पुर्ण क्षमतेने मैलापाण्यावर प्रक्रीया केली जात आहे.
- अस्तित्वातील पुणे महानगरपालिकेच्या कायक्षेत्रातील मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे चालविणे व देखभाल दुरूस्तीची कामे या क्षेत्रातील अनुभवी कंपनी/ठेकेदाराकडुन निविदा पध्दतीने करण्यात येत आहे. मैलापाणी शुध्दीकरण केंद्र (STP) दररोज प्रक्रीया केलेल्या पाण्याची तपासणी मान्यताप्राप्त NABL प्रयोगशाळेमार्फत करण्यात येते व त्याचा दैनंदिन अहवाल पाण्याची गुणवत्ता मे.महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी ठरवुन दिलेल्या निकषानुसार प्रकल्प निहाय तपासणीचे आकडे मनपाच्या मोबाईल ॲपव्दारे (PMC-STP) सर्व नागरिकांसाठी उपलब्ध करून दिले आहेत. ज्यामुळे शुध्दीकरण केंद्रनिहाय किती मैलापाणी शुध्द करून नदीत सोडले जाते आणि त्याची गुणवत्ता काय आहे म्हणजे BOD, COD किती आहे. अशी महत्वपुर्ण माहिती लोकांना कळण्यास मदत होत आहे. याशिवाय पुणे महानगरपालिकेमधील कार्यान्वीत असलेले मैलापाणी शुध्दीकरण केंद्रांची परफॉर्मस ऑडीट NEERI (National Engineering Environmental Research Institute, Nagpur) या संस्थेमार्फत तपासणी करण्यात आली आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या हददीतील अस्तित्वातील नाल्यापैंकी आंबिल ओढा नाला, नागझरी नाला व सावरकर स्मारक शेजारील नाला या तीन नाल्यांवर प्रायमरी ट्रिटमेंट करून पाणी नदीमध्ये सोडण्यात येते. या प्रक्रीयेमध्ये स्क्रीनिंग यंत्रणेमार्फत नाल्यामध्ये वाहत असलेला कचरा (Inorganic Material)

जाळीमधुन बाहेर काढला जातो व पुढे या पाण्यावर क्लोरिन डाय ऑक्साईड या पावडरचा वापर करून निर्जतुकीकरण करण्यात येते. यामुळे पुण्यातील मुळा-मुठा नदीतील पाणी शुध्द ठेवुन जल प्रदुषण कमी करण्यास मदत होत आहे.

**सन २०१९-२०**

पुणे महानगरपालिकेच्या मल:निसारण विभागामार्फत सन २०१९-२० मध्ये खालील महत्वाची वौशिष्टपुर्ण कामे करण्यात आली आहे.

- एरंडवणे व नरवीर तानाजीवाडी मैलापाणी उपसा केंद्र व शुध्दीकरण केंद्रासाठी यांत्रिकी जाळया बसविण्यात आल्याने दोन्ही ठिकाणी इनलेटला येणाऱ्या पाण्यामध्ये येणारा कचरा मोठयाप्रमाणात पंपिगमध्ये अडथळा निर्माण करीत होता. सदरचे कामामुळे हा कचरा इनलेटलाच काढल्यामुळे मोठयाप्रमाणात पंपिगमध्ये वाढ झाली आहे.
- एरंडवणे व नरवीर तानाजीवाडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथे ब्लोअरचे शेल्फ लाईफ संपले होते व वारंवार त्यामध्ये बिघाड होत होता. त्यामुळे सदर ब्लोअर बदलण्यात आले आहेत ज्यामुळे मैला पाणी शुध्दीकरण प्रक्रीया पूर्ण करण्यास बऱ्याच प्रमाणात मदत झाली आहे.
- बोपोडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र, बॉटेनिकल गार्डन उपसा केंद्र व कल्याणीनगर उपसा केंद्र येथे उपसा यंत्र बसविण्यात आल्याने तसेच एरिगेशन झोनमधील जुने/खराब झालेले गियर बॉक्स काढुन त्या जागी नवीन गियर बॉक्स बसविल्याने बोपोडी येथील उपसा यंत्रामध्ये वारंवार बिघाड होण्याचे काम पुर्णता कमी झाल्याने बोपोडी येथील मैलापाणी शुध्दीकरण केंद्र पुर्ण क्षमतेने चालविण्यात येत आहे.

**सन २०२०-२१**

- महाराष्ट्रातील मैलापाणी शुध्दीकरण केंद्रा पैकी पुणे मनपा पहिली महानगरपालिका ठरणार आहे ज्या ठिकाणी मैलापाणी शुध्दीकरण केंद्रातुन काढण्यात येणारा स्लजवर ५०० KCI CO BALT-60 व्दारे गामा रेडीएशन करण्यात येणार आहे. यासाठी Bhabha Atomic Research Center (BARC) मार्फत ३ वर्षासाठी सदरचे Radio-Active Element Free of Cost मध्ये सप्लाय करण्यात येणार आहे. सदर रेडीएशनमुळे स्लजमधील हानीकारण Pathogens (बॅक्टेरिया) पुर्णपणे नष्ट करण्यात येणार आहे व तद्नंतर त्यामध्ये Soil Fertility वाढविण्यासाठी पोषक Micro – organisms doposit करून त्याचा वापर शेतकऱ्यांसाठी उत्तम सेंन्द्रीयखत म्हणुन करण्यात येणार आहे. यासाठी Capex Cost (100 MT Sludge Treatment) साठी अंदाजे र.रू. ३५ ते ४० कोटी एवढी रक्कम अपेक्षित आहे.
- नाल्यामधील मैलापाण्यावर प्रायमरी ट्रिटमेंट म्हणजेच स्क्रीनिंग व निर्जतुकीकरण करणे.
- एरंडवणे व विठ्ठलवाडी मैलापाणी केंद्र येथे सेकंडरी झोनमधील सेटलिंग टॅकमधील मिडीया खुप जुने झाल्याने MPCB ने ठरवुन दिलेल्या निकषाप्रमाणे शुध्दीकरण करणे अडचणीचे होत असल्याने, सदर काम करून घेण्यात येणार आहे.

## (३) घनकचरा व्यवस्थापन (भांडवली तरतूद र.रू ९०.२५ कोटी + महसूली तरतूद र.रू.४९५.३८ कोटी – ५८५.६३ कोटी)

**सन २०१९-२०**

**प्रकल्पीय कामे –**

- मे. साईराम इंजिनियरिंग प्रा.लि. केशवनगर प्रकल्पामार्फत ५० मे. टन दैनंदिन कचऱ्याचे यांत्रिकी पध्दतीने वर्गीकरण करण्याचे काम चालू आर्थिक वर्षात सुरू करण्यात आले आहे. सदर काम २०२०-२१ मध्ये देखील सुरु राहणार आहे.

- मे. आदर्श कन्स्ट्रक्शन प्रा.लि. रामटेकडी प्रकल्पामार्फत १२५ मे. टन दैनंदिन कचऱ्याचे यांत्रिकी पध्दतीने वर्गीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. सदर काम २०२०-२१ मध्ये देखील सुरु राहणार आहे.
- मे. संस्कृती इंजीनीअरिंग प्रा.लि. वडगांवशेरी प्रकल्पामार्फत २५ मे. टन व बिबवेवाडी प्रकल्पामार्फत ५० मे. टन दैनंदिन कचऱ्याचे यांत्रिकी पध्दतीने वर्गीकरण करण्याच्या प्रकल्पाचे काम पूर्णत्वास आले आहे.
- आंबेगांव प्रकल्पा अंतर्गत १०० मे. टन, लोहगाव प्रकल्पा अंतर्गत १०० मे. टन, हडपसर-रामटेकडी प्रकल्पा अंतर्गत २०० मे. टन दैनंदिन कचऱ्याचे यांत्रिकी पध्दतीने वर्गीकरण करण्यात येणार आहे. सदर काम २०२०-२१ मध्ये देखील सुरु राहणार आहे.
- केशवनगर प्रकल्पा अंतर्गत मिश्र कचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येत असून यामध्ये १०० मे. टन मिश्र कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. सदर काम २०२०-२१ मध्ये देखील सुरु राहणार आहे.
- पुणे शहरातील रामटेकडी हडपसर येथे कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्पाचे मे. ऑरगॅनिक रिसायकलिंग सिस्टिम्स प्रा. लि., तर्फे एसपीव्ही पुणे बायो एनर्जी यांचेमार्फत उभारले जाणाऱ्या ७५० मे. टन प्रकल्प उभारण्याचे काम सुरू आहे. या अंतर्गत सुमारे ३०० मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे काम मार्च २०२० अखेर पर्यत सुरू करण्याचे नियोजन आहे. सदर प्रकल्पातून ७५० मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया करून १३.५ मेगावॅट इतकी वीज निर्मिती करण्यात येणार आहे. माहे ऑगस्ट २०१८ रोजी पासुन स्थापत्य विषयक पायाभूत कामे देखील सुरू करण्यात आली आहेत.
- पुणे शहरातील मुख्य रस्त्यांवर यांत्रिकी पध्दतीने झाडणकाम करणे यासाठी निविदा मान्य असून सद्यस्थितीत मुख्य रस्त्यांवर सदरचे काम सुरू आहे. शहरातील झोन १,२,३,४ या करीता ठेकेदार यांची नियुक्ती केली असुन रस्त्याचे झाडणकाम सुरु आहे. झोन क्र ५ करीता मनपाकडील मशीन मार्फत रस्त्याची साफसफाई करण्यात येत आहे.

**(बायोमांयनिग) ऊरूळी फुरसुंगी डेपो येथे १००० मे.टन क्षमतेचा प्रकल्प उभारणे व चार वर्षे मुदतीकरीता देखभाल दुरूस्ती करणे-**

- ऊरूळी फुरसुंगी कचरा डेपोवर मोठया प्रमाणात जुना कचरा साठलेला आहे. सदर कचऱ्यामुळे स्थानिक नागरिकांना होत असलेल्या त्रासामुळे मे. राष्ट्रीय हरित लवाद यांचेकडून पुणे मनपाला दिलेले आदेशा नुसार ऊरूळी फुरसुंगी कचरा डेपो येथील जुन्या साठविलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग पध्दतीने प्रक्रिया करण्यासाठी मे. भूमी ग्रीन यांना कार्यादेश देण्यात आले होते. सदरचा १००० मे.टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प पूर्ण झालेला असून सध्यास्थितीत दररोज सरासरी ९०० ते १००० मे.टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. नोव्हेंबर २०१९ अखेर सुमारे २ लक्ष मे. टन कचऱ्यावर प्रकिया करुन ५ एकर जागा मोकळी करण्यात आली आहे.

**ऊरूळी फुरसुंगी कचरा डेपो येथे शास्त्रोक्त भू-भराव करणे.**

- शहरातील निर्माण होणाऱ्या ओला व सुक्या कचऱ्यावर प्रकल्पामध्ये प्रक्रिया केल्यानंतर शिल्लक राहणाऱ्या रिजेक्टचे शास्त्रोक्त पध्दतीने भू-भराव करण्यासाठीचे स्थापत्य विषयक कामे उरुळी डेपो येथे सुरु करण्यात आली आहे.
- सदर प्रकल्प चार महिने कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे. काम पूर्ण झाल्यानंतर (तद्नंतर १ वर्ष कालावधी करिता सदर भू-भराव रिजेक्ट घेणेसाठी देखभाल दुरूस्ती खर्च दयावा लागणार आहे.) पुणे शहरामधील सर्व कचरा प्रकल्पामधील रिजेक्ट तसेच बायोमायनिंग प्रक्रिया झाल्यानंतर प्रक्रिया झाल्यानंतर निर्माण होणारे रिजेक्ट असे एकत्रित मिळून सुमारे ६०० मे.टन रिजेक्ट दररोज या शास्त्रोक्त भू-भरावात घेण्यात येणार आहे.

**स्वच्छ भारत अभियान २०२०**

- स्वच्छ भारत अभियान २०२० अंतर्गत शहरातील एकुण शौचालयापैकी २५ % शौचालय सर्व सुविधायुक्त बेस्ट टॉयलेट असणे आवश्यक आहे. शहरात १५ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत एकुण ३१० शौचालये निश्चित केलेली आहेत. सदर शौचालय स्वच्छ भारत अभियान मार्फत निश्चित केलेल्या मानकाप्रमाणे करण्यात आलेली आहेत. यामध्ये प्रामुख्याने सॅनिटरी वेडिंग मशीन, एक्झॉस्ट फॅन, वॉश बेसिन सोय, नॅपकीन या सुविधांनी युक्त करण्यात आली आहेत. या कामाकरीता सुमारे र.रू. १.८० कोटी क्षेत्रिय कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. यामुळे शहरातील स्वच्छतेचा दर्जा उंचावण्यास मदत होणार आहे.
- स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नागरिकांनी ओल्या व सुका कचरा स्वतंत्र करुन देणे अनिवार्य आहे. या करीता नागरीकांना माहिती देणे, जनजागृती करणे, सहभाग वाढविणे, मनपाकडुन विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. वस्ती पातळीवर बैठका घेणे रेडीओ व दूरदर्शनवर स्वच्छतेचे संदेश देणे, जाहिरात फलक लावणे, सेल्फी पॉईट करणे, रिक्षा, रथ याव्दारे जनजागृती करणे या सर्व बाबींची मोहिम सुरू आहे.

**ओल्या कचऱ्यावरील नाविन्यपूर्ण प्रकल्प**

- बाणेर स. नं. ४८ येथे मनपाकडुन शिल्लक ओला कचरा, अन्नपदार्थाची स्लरी करुन सुमारे १२५ मे. टन कचऱ्यावर प्रकिया सुरु आहे. स्लरी पासुन बायोसिएनजी गॅसची निर्मिती करण्यात येत असुन मनपाकडील वाहनांकरिता इंधन म्हणुन यशस्वी चाचणी झालेली आहे. सदर कॉम्प्रेस्ड गॅसचा उपयोग करुन वाहनाचे इंधन असा नाविन्यपुर्ण वापरामुळे महानगरपालिकेने एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे.

**सॅनिटरी नॅपकिन प्रक्रिया केंद्र**

- पुणे शहरात दैनंदिन सुमारे १० ते १२ मे टन सॅनिटरी नॅपकिन कचरा निर्माण होत आहे. यावर प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक होते. शहरात घनकचरा व्यवस्थापन विभागाकडुन १२ केंद्रावर सॅनिटरी नॅपकिन डीस्पोजल मशिन बसविण्यात आले आहेत. यावर प्रत्येक केंद्रावर सुमारे १००० नॅपकिनवर प्रक्रिया करण्यात येत आहेत. सदर केंद्राने जोडलेल्या भागातील सोसायटी, शाळा, वसतिगृह येथून सदर नॅपकिन प्रथमतः संकलित करण्यात येतात तद्नंतर केंद्रावर सॅनिटरी नॅपकिन आणून शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येत आहे. सदर काम सुमारे १ वर्षापासून ठेकेदार नेमुन करण्यात येत आहे.

## सन २०२०–२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

**प्रकल्पीय कामे –**

- पुणे शहरातील उपनगरात निर्माण होणारा कचरा त्याच भागात प्रक्रिया करुन जिरविण्याचे महानगरपालिकेचे उदिष्ट असुन त्या करीता पुढील ठिकाणी कामे करण्यात येणार आहेत.
- भूगांव व बावधान येथील सुमारे २ एकर जागा घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपलब्ध झाली असून त्या ठिकाणी यांत्रिकीकरण करुन आधुनिक रॅम्प करणे व १०० मे. टन मिश्र कचऱ्यावरील प्रकल्प प्रस्तावीत आहे.
- ऊरूळी फुरसुंगी कचरा डेपो येथे १० एकर जागेवर शास्त्रोक्त भू–भराव करणे. या कामासाठी सन २०२०–२१ या अंदाजपत्रकात सुमारे र.रू. २ कोटी इतकी रक्कम प्रस्तावित केलेली आहे.
- हडपसर– रामटेकडी येथील पुणे बायो एनर्जी प्रकल्पाकरीता मान्य करारनामानुसार २ एम.एल.डी चा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रकल्पातून प्रक्रिया केलेले पाणी पुणे बायो एनर्जी या प्रकल्पास उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. मलनिःसारण विभागाकडून या बाबत निविदा प्रकिया सुरु करण्यात आली आहे.

- पुणे महानगरपालिकेने राष्ट्रीय हरित लवाद (NGT) यांना प्रतिज्ञापत्र सादर केले असून उरुळी–फुरसुंगी येथे डिसेंबर २०१९ पासून कचऱ्याचे शुन्य डंपिंग व सविस्तर आराखडा तयार केला आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेने जानेवारी २०२० पासून याठिकाणी ओपन डंपिंग १०० % बंद केले आहे. तसेच आणखी नवीन चार कचरा प्रक्रिया एप्रिल २०२० पर्यंत चालू होणार असून सध्या काम करत असलेल्या जुन्या कचरा प्रक्रिया प्रकल्प धारकाकडून शहरातच २१०० मे. टन कचऱ्यावर शहरातच प्रक्रिया केली जात आहे.

**सफाई कर अंतर्गत वापरकर्ता शुल्क –**

- घनकचरा विभागास दरवर्षी मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार केल्यास आजमितिस मालमत्ता करा अंतर्गत स्वच्छता करापोटी आकारण्यात येणारे शुल्क हे एकमेव उत्पनाचे स्त्रोत आहे.
- शासनाच्या घनकचरा (व्यवस्थापन हाताळणी), नियम २०१६ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थाने घनकचरा व्यवस्थापनासाठी होणाऱ्या एकुण खर्चासाठी तुलनेत त्या शहरातील नागरिकांकडून वापरकर्ता शुल्क आकारणी बंधनकारक आहे व त्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणतेही स्वतंत्र अनुदान मिळू शकणार नाही. महानगरपालिकेकडील RE19A125 या अंदाजपत्रकीय अर्थशीर्षकावर र.रू. १ कोटी प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. अर्थशिर्षकाचे नामनिर्देशन पुढीलप्रमाणे आहे. घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, कंटेनर मुक्त शहर करणे.
- सदर अर्थशीर्षकामधुन संपूर्ण शहरातील ४२ प्रभागांमध्ये कचरा संकलन व प्राथमिक वाहतुक रॅम्प पर्यंत करणे असे कामकाज निविदा मागवुन करण्यात येणार आहे. यामुळे घरोघरी जाऊन वर्गीकृत कचरा संकलन करण्याचे प्रमाण सुमारे १००% पोहचविणे शक्य होणार आहे.
- शहरातील सार्वजनिक शौचालय व वस्ती पातळीवरील शौचालयाची स्वच्छता आऊटर्सोसिंग तत्वावर करण्यात येणार आहे, यासाठी २०२०–२१ च्या अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आली आहे.

## (४) आरोग्य (महसूली तरतूद र.रु. ३२५.८४ कोटी)

### सन २०१९–२०

- **डायलेसिस प्रकल्प** – पुणे शहरातील किडनीच्या आजाराने ग्रस्त असलेल्या व डायलेसिसची आवश्यकता असणाऱ्या रूग्णांकरीता पुणे महानगरपालिकेच्या भारतरत्न स्व.राजीव गांधी रूग्णालय येरवडा येथे कोठारी चॅरीटेबल ट्रस्ट, कै. नामदेव शिवरकर दवाखाना वानवडी येथे लायन्स क्लब ऑफ पुना आय फाउंडेशन, व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना, मित्रमंडळ चौक पर्वती येथे श्री गुरू गौतम मुनी मेडिकल ॲन्ड चॅरीटेबल ट्रस्ट, यांचेमार्फत पुणे मनपा संयुक्त विद्यमाने या तीन ठिकाणी ५ (पाच) वर्षे मुदतीच्या कराराने प्रति रूग्ण रक्कम रूपये ४००/– (विना कन्ज्युमेबल्स) इतक्या माफक दरामध्ये रूग्णांना सेवा उपलब्ध करून देण्यास मा.स्थायी समिती व मा.मुख्य सभेची मान्यता मिळालेली आहे. या तीन ठिकाणा पैकी राजीव गांधी रूग्णालय डायलेसिस प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. कै.नामदेव शिवरकर दवाखाना वानवडी व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना, मित्रमंडळ चौक पर्वती या ठिकाणी येत्या एक ते दोन महिन्यात डायलेसिसच्या सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

- **आय.सी.यु.विभाग** – पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रूग्णालय येथे आय.सी.यु.विभाग तीस वर्षे मुदतीच्या कराराने डॉ.सॅम्स मेडिकल कन्सलटन्सी यांना चालविण्याकरीता मा.मुख्य सभेची मान्यता मिळालेली आहे. येत्या दोन महिन्यात सदरचा प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहे.

- **ज्येष्ट नागरीक व रूग्ण यांच्या मदतीसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणेसाठी प्रशिक्षण केंद्र उभारणे**

  पुणे महानगरपालिकेच्या कै.थरकुडे दवाखाना एरंडवणा येथील जागेमध्ये ज्येष्ठ नागरीकांच्या बेड साईड केअर गीव्हर सेंटरसाठी आरोग्य विषयक विविध सेवा पुरविणेकामी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याच्या हेतूने, एरंडवणा येथील जागा ५ वर्षे मुदतीच्या कराराने कर्नल्स क्युब या संस्थेस चालविण्यास देणेकामी मा.मुख्य सभेची मान्यता मिळालेली आहे. सदरचा प्रकल्प सदर ठिकाणी कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

- **पुणे शहरातील मृत प्राणी २४ X ७ या तत्वावर उचलुन त्यांची इन्सीनेरेटर प्लँटमध्ये विल्हेवाट लावणे**

  पुणे शहरातील नागरीकांना त्यांचेकडील मृत प्राणी २४ X ७ या तत्वावर त्यांची इन्सीनेरेटर प्लँटमध्ये विल्हेवाट लावणेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली असून त्यासाठी महानगरपालिकेकडून हेल्पलाईन क्र. ९६८९९३१९०३ हा २४ X ७ या तत्वावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. मृत प्राणी २४ X ७ या तत्वावर इन्सीनेरेटर प्लँटपर्यत वाहतूक करण्याच्या दृष्टीने ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

- पंडीत दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजनेअंतर्गत दि.०१/०४/२०१९ ते दि.१३/०१/२०२० अखेर एकुण १८ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला असून मृत्यू दावे लाभार्थी संख्या १३ असून खर्च रक्कम रुपये ६५,००,०००/- व दवाखाना खर्च लाभार्थी संख्या ५ असून खर्च र.रु. ६,४४,२४९/- असा एकुण खर्च र.रु. ७१,४४,२४९/- झालेला आहे. तसेच संभाव्य मृत्यूदावे व संभाव्य दवाखाना खर्च अशी एकुण र.रु. ९६,००,०००/- चे संभाव्य लाभार्थ्यांना देय असुन माहे मार्च अखेर र.रू. १,६७,४४,२४९/- इतका अपेक्षित आहे.

## सन २०२०–२१

- **एम.आर.आय.प्रकल्प –** पुणे महानगरपालिकेच्या स्व.भारतरत्न राजीव गांधी रूग्णालय येथे एम.आर.आय. प्रकल्प खाजगी वैद्यकीय संस्था/ चॅरीटेबल ट्रस्ट/ स्वयंसेवी संस्था यांना १० वर्षे मुदतीच्या कराराने चालविण्यास देणेकामी प्रस्ताव आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.
- **नायडु डॉग पॉडचे आधुनिकीकरण करणे –** भटक्या व मोकाट कुत्र्यांची मोठ्याप्रमाणात नसंबदी शस्त्रक्रिया होण्याच्या दुष्टीने नायडू डॉग पाँडचे आधुनिकीकरण भवन रचना विभागामार्फत करण्यात येणार आहे व सध्या अस्तित्वात असलेल्या नायडू डॉग पाँडचे ठिकाणी तीन मजली सुसज्ज डॉग पाँड ( ३५० कुत्रे एकाच वेळी शस्त्रक्रियेसाठी ठेवता येतील या क्षमतेचे) बांधण्यात येणार आहे त्यासाठी र.रु. ४ कोटीची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.
- **जागतिक बॅंकेच्या अर्थसहाय्याने कत्तलखान्याचे आधुनिकीकरण करणे –** जागतिक बॅंकेच्या अर्थसहाय्याने कोंढवा येथील शेळी व मेंढी यांच्या कत्तलखान्याचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे (APEDA STANDARD) च्या धर्तीवर आधुनिकीकरण करण्यासाठी पुणे महानगरपालिकेस अंदाजे र.रु. ७ कोटी १००% अनुदान हप्त्याहप्त्याने प्राप्त होणार आहे. सदर प्रकल्पा अंर्तगत पुणे शहरातील नागरिकांना उत्तम दर्जाचे मांस मिळेल तसेच पुणे शहरातील अनाधिकृत होत असलेल्या मांस कटाईस प्रतिबंध होईल. सदर प्रकल्प कार्यान्वित होण्यापुर्वी जागतिक बॅंकेच्या निर्देशाप्रमाणे PPP तत्वावर चालविण्यास देण्यात येईल, त्यासाठी जागतिक बॅंकेचे अनुदान प्राप्त होईपर्यंत र.रु. १.३० कोटीची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.
- **भटक्या व मोकाट कुत्र्यांची परिणामकारक नसबंदी शस्त्रक्रिया नियोजन –** पुणे शहरातील भटक्या व मोकाट कुत्र्यांचा उपद्रव कमी करण्याच्या दृष्टीने तसेच कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने भारतीय जीव जंतु कल्याण मंडळ (Animal Welfare Board of India) यांचे सभासदत्व असलेल्या संस्थांकडुन स्वतःचे इन्फ्रास्ट्रक्चर, सेवक वर्ग, वाहने, ऑपरेशन खर्च व अँटीरेबीज लसीकरण या कामासाठी निविदा प्रक्रिया करण्यात आली असून सध्या होणाऱ्या कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया

करण्याच्या प्रमाणात तीन पट वाढ करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी निविदा प्राप्त झाली असून सदर संस्थाना वर्कऑर्डर देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे. सन २०२०-२१ मध्ये ४० ते ४५ हजार भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी सन २०२०-२१ मध्ये र.रु. ४ कोटीची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

- **पंडीत दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना –** पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील निवासी मिळकतकर अदा करणाऱ्या नागरीक व गलिच्छ वस्ती निर्मूलन शुल्क अदा करणारे नागरीक यांचा जर अपघाती मृत्यू झाला किंवा त्यांना अपघातामुळे कायमस्वरुपी पुर्ण अपंगत्व अथवा अंशतः अपंगत्व आल्यास दि.०१/०४/२०१९ ते २८/०५/२०२० या कालावधीकरीता पंडीत दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजनेअंतर्गत अपघाती विमा योजना युनायटेड इंडीया इन्शुरन्स कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. प्रत्येक निवासी मिळकतकर अदा करणा-या प्रत्येक व्यक्तीसाठी र.रु.७५/- या प्रमाणे प्रिमीयम ग्राहय धरण्यात आलेला आहे. तसेच सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी पंडीत दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना मान्य तरतूद र.रु.७ कोटी करण्यात आली आहे.

**खाली नमूद केल्याप्रमाणे संबंधितांना पंडीत दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजनेअंतर्गत विमा संरक्षण देण्यात येते.**

- लाभार्थींचा अपघाती मृत्यू झाल्यास (पती/पत्नी) रक्कम रुपये ५ लाख विमा संरक्षण
- लाभार्थ्यावर अवलंबून असलेल्या २३ वर्षाखालील पहिल्या दोन अपत्यास प्रत्येकी रक्कम रुपये २ लाख ५० हजार चे विमा संरक्षण
- लाभार्थ्यांचे पालकांसाठी (आई व वडील) प्रत्येकी रक्कम रुपये २ लाख ५० हजार चे विमा संरक्षण
- लाभार्थ्यांचे कुटूंबातील व्यक्तींना अपघात झाल्यास त्या व्यक्तीला किंवा सर्वांना मिळून रक्कम रुपये १ लाख पर्यंत अपघातामुळे होणा-या औषधोपचाराचा खर्च
- वरील रक्कम रुपये ५ लाखाचे विमा संरक्षण त्या कुटूंबातील सर्वांना मिळून किंवा एका व्यक्तीला वर्षातून एकदा वापरता येईल.
- रुग्णवाहीकेसाठी रक्कम रुपये ३०००/-
- अपघाताने पुर्णतः कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास रक्कम रुपये ५ लाख विमा संरक्षण
- अपघाताने अंशतः कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास ससून सर्वोपचार रुग्णालय यांनी दिलेल्या टक्केवारीनुसार विमा रक्कमेच्या तुलनेत भरपाई देण्यात येईल.

## (५) <u>नगर नियोजन</u>

**सन २०१९-२०**

- **सन २०१९-२० मधील महत्त्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नाविण्यपूर्ण योजना/प्रकल्पांची नावे, ठळक बाबी**
  **पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट ११ गावांचा प्रारूप विकास आराखडा व बांधकाम परवानगी**
- दि. ०४/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार नव्याने ११ गावे पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आली आहेत. समाविष्ट ११ गावांचा प्रारुप विकास आराखडा करण्याबाबत मा. मुख्य सभेने ठराव क्र. ८७४, दि. २१/१२/२०१७ अन्वये कार्यवाही चालू करण्यास मान्यता दिली आहे. एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम २३ अन्वये मा. मुख्य सभा ठराव क्र. १६०, दि.२८/०६/२०१८ नुसार दि.०४/१०/२०१८ रोजी शासकीय राजपत्रात व दै. वर्तमानपत्रामध्ये इरादा जाहीर करण्यात आलेला आहे. तसेच नगर नियोजन अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

- विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच भविष्यकालीन आढाव्याकरिता लोकसंख्या, सामाजिक, आर्थिक विश्लेषण या करिता गोखले इन्स्टिट्युटस ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स या संस्थेची नेमणूक केलेली आहे. समाविष्ट ११ गावांचे हद्दी दर्शविणारा नकाशा जाहीर प्रकटणासह प्रसिध्द करणेत आलेला आहे. त्यातूनच विद्यमान जमीन वापर नकाशा पुणे महानगरपालिकेमध्ये तयार करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२(क) नुसार अनाधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून प्रशमित संरचना (Compounding Structure) म्हणून घोषित करणे**

- महाराष्ट्र शासनाचे नगर विभागामार्फत शासन निर्णय क्र. टीपीएस/१८१४/प्र.क्र. ८२/१४/नियम व नवि-१३, दि. ०७/१०/२०१७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२(क) नुसार अनाधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून प्रशमित संरचना म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८(१) अन्वये नियमावली प्रसिध्द केली आहे. सदर नियमावलीनुसार नियमात बसणारी पुणे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार वसूल करुन प्रशामित सरंचना (Compounding Structure) म्हणून घोषित करणेत आलेली असून त्याद्वारे र.रु.१२.६३ कोटी प्रशमित संरचना फी म्हणून जमा झालेली आहे.

**प्रधानमंत्री आवास योजना**

- प्रधानमंत्री आवास योजना सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे ही महत्वकांक्षी योजना सुरु केलेली आहे. पुणे शहरातील पात्र लाभार्थ्यांना घरे देण्याचे पुणे महानगरपालिकेचे उद्दिष्ट आहे. या योजनेचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे . त्यामधून परवडणाऱ्या घरांची निर्मिती होणार आहे.
- सदर योजनेतील प्रति सदनिकेसाठी पात्र लाभार्थ्यांना मे. केंद्र शासनाकडून र.रु.१.५० लक्ष व मे.राज्य शासनाकडून र.रु.१ लक्ष असे एकुण र.रु.२.५० लक्षचे अनुदान मिळणार आहे. उर्वरित सदनिकेची किंमत लाभार्थ्यांना भरावयाची आहे.
- पुणे महानगरपालिकेकडून अल्प उत्पन्न गटातील (EWS) सदनिका बांधण्यासाठी हडपसर, खराडी, वडगाव(खुर्द) या परिसरातील एकुण आठ सविस्तर प्रकल्प अहवालांना मे.केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झाली असून त्याद्वारे एकुण ६,२६४ सदनिकांची निर्मिती होणार आहे. सदरहु सदनिकांचे क्षेत्रफळ (Carpet) ३० चौ.मी. पर्यंत आहे. एकुण आठ प्रकल्पांचा सर्वसाधारण खर्च र.रु. ७०० कोटी इतका आहे. सदर कामांसाठी सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रकात र.रु. ७० कोटींची तरतूद केली आहे .
- पुणे महानगरपालिकेमार्फत सदनिकांचे वाटप करण्याकरीता सोडतीचे नियोजन करण्यात करण्यात येत आहे.
- मंजुर प्रकल्पांपैकी प्रथमत: खराडी, वडगाव (खुर्द) व हडपसर येथील तीन प्रकल्पांसाठी बांधकाम ठेकेदारांची नेमणूक करण्यात आली आहे. खराडी येथे प्रत्यक्ष जागेवर ७८६ सदनिकांचे कामकाज सुरु करण्यात आले आहे. तसेच वडगाव खुर्द येथे ११०८ व हडपसर येथे ३४० सदनिकांचे बांधकामाचे नियोजन करण्यात आले आहे.
- सन २०२०-२१ या वर्षात मौजे कोंढवा (बुद्रुक), बालेवाडी, बाणेर व धानोरी येथील जागा प्रकल्पांसाठी उपलब्ध होणार असून त्या जागांवरील सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार आहेत.
- खाजगी विकसकाच्या माध्यमातून मौजे लोहगाव, धानोरी व महमदवाडी येथील सुमारे ५,००० घरांना मे.केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे. मौजे लोहगाव येथे गृहप्रकल्पाचे काम सुरु झाले आहे व मौजे धानोरी व महमंदवाडी येथील प्रकल्पांस पर्यावरण विभागाची मान्यता मिळणेकामी सादर झाले आहेत.

### सन २०२०-२१ मधील करावयाचे प्रस्तावित महत्त्वाचे प्रकल्प/योजना

- **नगर रचना परियोजना (टि.पी. स्कीम) –** पुणे महानगरपालिका मुळ हद्द व समाविष्ट २३ गावे या ठिकाणी नवीन टि. पी. स्कीम राबविण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी मे. केंद्र शासनाने अमृत योजने अंतर्गत प्रायोगिक तत्वावर देशभरात २५ शहरांची निवड केलेली असून, त्यामध्ये पुणे शहराचा समावेश आहे. एका प्रायोगिक तत्वावरील टी. पी. स्कीमकरीता मे.केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त होणार आहे.

- पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांपैकी फुरसुंगी व देवाची उरूळी या दोन गावांमध्ये टि. पी. स्कीम राबविण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. नगर रचना परियोजना राबविल्यास त्या ठिकाणच्या सोयीसुविधासाठी आवश्यक जागा, अंतर्गत रस्ते महानगरपालिकेच्या ताब्यात येऊन या भागाचा सुनियोजित विकास होणार आहे.

- **११ गावांचा प्रारुप विकास आराखडा –** विद्यमान जमीन वापर नकाशा व अहवाल तसेच एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम २६ अन्वये प्रारुप विकास आराखडा तयार करुन नागरिकांच्या हरकती व सूचना मागविणेकरीता प्रसिध्द करण्यात येणार आहे. विकास आराखड्याची संपूर्ण वैधानिक प्रक्रीया पूर्ण करुन सदरचा प्रारुप विकास आराखड्यास मा.मुख्य सभेची मान्यता घेऊन मे. शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करण्यात येणार आहे.

- **प्रधानमंत्री आवास योजना –** सार्वजनिक-खाजगी तत्वावर खाजगी विकसकांमार्फत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत प्रस्ताव मागविण्यात आले असून, या अंतर्गत साधारण १०,००० घरकुलांची निर्मिती करण्याचे नियोजन आहे.

## (६) वाहतूक नियोजन व प्रकल्प (भांडवली तरतूद र. रु.१८६.२५ कोटी + महसूली तरतूद र.रु. १८.७५ कोटी = र. रु.२०५ कोटी)

- **सन २०१९-२०**

  सार्वजनिक वाहतूक व्यवस्था व विशेष प्रकल्प या अर्थशिर्षका अंतर्गत सन २०१९-२० मध्ये इलेक्ट्रीक बस, सीएनजी बस, नदीपुनरुत्जीवन प्रकल्प, वाहनतळ विकास व सुधारणा उड्डाणपुल, भूयारी मार्ग इ. प्रकल्प सुरु आहेत. तसेच चालू आर्थिक वर्षात सुरू असलेल्या उडड्राणपुलांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

- **सन २०१९-२० मधील पूर्ण/पूर्णत्वास आलेले प्रकल्प/ योजना-**

- **लुल्लानगर चौकात उडड्राणपूल बांधणे –** पुणे कॅन्टोनमेंटकडून कोंढव्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील लुल्लानगर चौकात उडड्राणपूल बांधण्याचे काम पुणे महानगरपालिकेतर्फे हाती घेऊन पूर्ण करण्यात आलेले आहे त्यामुळे कोंढवा रस्त्यावरील गेरा चौकात होणारी वाहतूक कोंडी मोठयाप्रमाणात कमी झाली आहे. दि.०२/०६/२०१९ पासून सदर उड्डाणपुल वाहतुकीसाठी खुला करणेत आला आहे.

- **डेंगळे पुलास नवीन समांतर पुल बांधणे –** अस्तित्वातील जुना डेंगळे पुल वाहतुकीसाठी कमी पडत असल्याने नवीन पुल बांधण्याचे काम हाती घेण्यात आले. सदर पुल दि. ०७/०६/२०१८ रोजी वाहतुकीसाठी खुला केलेला आहे.

- **हॅरिस पुलालगत नवीन पुल बांधणे –** जुन्या पुणे - मुंबई रस्त्यावर बोपोडी येथे ब्रिटीश कालीन हॅरिस पुल असून, सदरचा पुल जुना झाला असल्याने सदर पुलाचे बांधकाम हे पुणे मनपा व पिंपरी चिंचवड मनपाकडून संयुक्तपणे आर्थिक तरतूद वापरुन करणेत आले आहे. सद्यस्थितीत पुलाचे काम पूर्ण झाले असून पुल वाहतूकीस खुला करणेत आला आहे.

- **हडपसर मध्ये काळेपडळ व रामटेकडी येथील गेट क्रं. ६ व ७ तसेच गेट क्रं. ७ व ८ या दरम्यान हलक्या वाहनां करिता भुयारी मार्गाचे बांधकाम करणे –** हडपसर व रक्षकनगर कडून महमंदवाडी व हांडेवाडीकडे जाणारी व येणारी वाहने विना अडथळा ये–जा करणेसाठी काळेपडळ व रामटेकडी येथील गेट क्र. ६ व ७ तसेच गेट क्र. ७ व ८ या दरम्यानच्या लांबीत दोन भुयारी मार्गाचे काम अंतिम टप्प्यात आहे. भुयारी मार्गाचे कामा करीता पुणे महानगरपालिकेकडून मध्य रेल्वे, पुणे विभाग यांना दोन्ही भुयारीमार्ग कार्यान्वित करणे करीता एकुण र. रु. ८.०६ कोटी आदा करणेत आली आहे. मार्च २०२० अखेरीस सदरचे भुयारी मार्गाचे काम पूर्ण होणार आहे.

## सन २०१९–२० मध्ये सुरु असलेले प्रकल्प/योजना

- **थेट खरेदी पध्दतीने ८०० बसेस खरेदी करणे (पुणे मनपा हिस्सा ६०%) –** पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून ४०० सीएनजी, बीआरटी, नॉन एसी बसेसकरीता मनपा हिश्श्याच्या २४० बसेस खरेदीकरीता मे. टाटा मोटर्स यांना आदेश दिलेले आहेत. सदर २४० बसेसकरीता प्रति बस र.रु. ४८,४०,४५५/– या प्रमाणे एकुण र.रु. १,१६,१७,०९,२००/– इतकी रक्कम होत आहे. पुणे मनपाकडून महामंडळास बसखरेदीची ४०% र.रु. ४६,४६,८३,६८०/– वर्ग करणेत आली आहे. उर्वरीत र.रु. ६९,७०,२५,५२०/– आवश्यक पूर्तता झालेनंतर चालू आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या र. रु. ७५ कोटी मधून देण्यात येईल.
- **पी.एम.पी.एम.एल. च्या विविध डेपोंमध्ये विकसनाची कामे करणे –** पुणे व शहर हद्दीमध्ये एकुण १० डेपो कार्यान्वित असून, त्यापैकी भेकराईनगर, सुतारवाडी, शेवाळवाडी या डेपोंमध्ये विकास कामे करणे बाबत पीएमपीएमएल विभागाने कळविले आहे. यामध्ये काँक्रीट, सिमाभिंत बांधणे, बस दुरुस्ती शेड उभारणे, स्वच्छता गृह, डांबरीकरण इ. मुलभूत स्वरुपाची कामे करणे आवश्यक आहे. सदर काम पुणे महानगरपालिकेमार्फत करुन मिळाल्यास डेपो कामकाजामध्ये सुसूत्रता येऊन बसेस देखभाल दुरुस्तीची कामे अधिक सक्षमतेने होण्यास मदत होणार आहे. त्याअनुषंगाने भेकराईनगर व सुतारवाडी येथील बस डेपो विकसित करणेचे काम सुरु करणेत आले आहे.
- **सेव्हन लव्हज चौक ते वखार महामंडळ चौक उड्डाणपुल बांधणे –** सेव्हन लव्हज चौक ते वखार महामंडळ चौक या दरम्यान उड्डाणपुल विकसित करणेचे काम कार्यान्वित करणेत आलेले आहे. सदरहु कामा करीता सन २०१९–२० मध्ये र.रु. १२.६० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झालेली असून सदरचे काम अंतिम टप्प्यात आहे.
- **मुंढवा येथे मुळा मुठा नदीवरील जुन्या पुलाची दुरुस्ती करणे व तद्नुषंगिक कामे करणे –** नदीवरील जुन्यापुलाची दुरुस्ती व मजबुतीकरणाचे काम कार्यान्वित करणेत आलेले आहे. त्यामुळे पुलाचे आयुष्यमान वाढणार आहे. तसेच मुंढवा व खराडीकडे मार्गस्थ होणाऱ्या वाहना करिता सुविधा उपलब्ध होणार आहे. या कामा करिता सन २०१९–२० मध्ये र.रु. ५.६० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झालेली असून, मार्च २०२० अखेरपर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
- **घोरपडी पुणे येथे पुणे सोलापूर व पुणे– मिरज रेल्वे लाईनवर उड्डाणपुल बांधणे –** थोपटे चौक घोरपडी येथे पुणे–सोलापूर रेल्वे लाईनवर उड्डाणपुलाचे काम कार्यान्वित करणेत आलेले आहे. नियोजित रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम केल्यामुळे मुंढवा, घोरपडी व कल्याणीनगर असा पुर्वकडील भाग हा मध्यवर्ती पुणे शहराशी पुणे स्टेशन, ससून व जहाँगिर हॉस्पिटल तसेच इतर महत्वाचे संरक्षण विभाग आस्थापनाकडे जाणा–या वाहनांकरिता व पी.एम.पी.एम.एल. करिता सुविधा उपलब्ध होणार असून या चौकातील मोठयाप्रमाणात होणारी वाहतुक कोंडी दूर होणार असून काम कार्यान्वित करणेत आलेले आहे. सदरहू कामा करीता सन २०१९–२० मध्ये र.रु. १९.६० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झाली आहे. सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

- **प्रभाग क्र. २८ ब मध्ये वखार महामंडळ चौक येथे उड्डाणपुल बांधणे –** वखार महामंडळ चौकातील वाहतूक कोंडी कमी होणे करीता उड्डाणपुल बांधणेचे नियोजन करणेत आलेले आहे. या कामाचे पुर्वगणनपत्रकानुसार र.रु. १७.५० कोटी आहे. सदरहु कामाकरीता २ वर्षाचा अंदाजित कालावधी लागणार आहे. या कामा करिता सन २०१९-२० मध्ये र.रु. १० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झाली आहे.
- **नळस्टॉप चौकात उड्डाणपुल बांधणे** – पुणे शहरातील कर्वे रस्त्यावर वनाज ते रामवाडी हा नियोजित मेट्रो मार्ग आहे. नळस्टॉप चौकातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मेट्रो व फ्लाय ओव्हर यांचा एकत्रित विचार करुन वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गिकेवर नळस्टॉप चौकात उड्डाणपुल बांधणेत येत आहे. सदरचे काम महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचेमार्फत करणेत येत आहे. नळस्टॉप चौकामध्ये बांधणेत येणाऱ्या दुमजली पुलाचे एकुण खर्चापैकी पहिल्या मजल्यापर्यंत वाहनांचे उड्डाणपुलासाठी र.रु.३५.२५ कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना महानगरपालिकेकडून टप्प्याटप्प्याने अदा करणेत येणार आहे. सदर कामासाठी सन २०१९-२० चे आर्थिक वर्षात र.रु. १४.३५ कोटी इतकी तरतूद असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे. प्रस्तुत उड्डाणपुलाचे काम झाल्यास मुख्य कर्वे रस्त्यावरील व पौड रस्त्यावरील वाहतूक दुहेरी मार्गाने पुलावरुन सुरळीत होणेस मदत होणार आहे.
- **औंध वाकड / सांगवी रस्त्यावरील अस्तित्वातील पुलाशेजारी नव्याने पुल बांधणे –** औंध सांगवी रस्त्यावरील अस्तित्वातील नदीवरील पुल ८ मी.रुंदीचा आहे. सदर रस्त्याने पुणे कडून पिंपरी चिंचवडकडे व पिंपरी चिंचवडकडून पुण्याकडे होणारी वाहतूक जास्त असल्याने अस्तित्वातील पुल वाहतुकीसाठी अपुरा पडत आहे. सदर पुलाशेजारी २२ मी. रुंदीचा पुल (र.रु.२६.५९ कोटी)नव्याने प्रस्तावित केलेला असून त्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदरचा प्रकल्प पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असून नवीन पुलासाठी येणारा खर्च पिंपरी चिंचवड महानगरपालिका ५०% व पुणे महानगरपालिका ५०% अशा पध्दतीने करणेत येणार आहे. सदर पुलाला पिंपरी चिंचवड बाजूने जोडणारा मुख्य रस्ता ते नवीन पुलापर्यंतचा ॲप्रोच रस्त्यासाठी लागणारा पूर्ण खर्च पिंपरी चिंचवड महानगरपालिका पुणे महानगरपालिकेस देणार आहे. सदर कामासाठी सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात र.रु.६.३० कोटी इतकी तरतूद उपलब्ध करणेत आलेली आहे. प्रस्तुत कामामुळे औंध चौक ते सांगवी वाकड येथील २० मी.डी.पी. रस्त्याला जोडणाऱ्या पुलाची रुंदी वाढून वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.
- **गोल्फ क्लब चौक येरवडा येथे उड्डाणपुल बांधणे –** सदरचे काम दि ०९/०९/२०१९ पासून सुरु करणेत आले असून निविदा र. रु. ३१.८५ कोटी इतकी आहे. सदर कामामुळे गुंजन थिएटर पासून ते एअरपोर्ट रोड दरम्यानची वाहतूक सुरळीत होणार आहे. तसेच गोल्फ क्लब चौकातील वाहतुकीचा ताण कमी होणार आहे. सदरचे काम प्रगतीपथावर आहे.
- **विश्रांतवाडी येथे पुणे मनपा व राष्ट्रीय महामार्ग योजने अंतर्गत संयुक्तपणे उड्डाणपुल उभारणे –** विश्रांतवाडी चौक हा राज्य महामार्गावर येत असून या चौकात आळंदी, लोहगाव, धानोरी, दिघी, चाकण एम.आय.डी.सी. कडून मोठयाप्रमाणात वाहने ये-जा करतात. तसेच सदरच्या चौकाचे रस्त्यालगत मिलिटरीचे रणगाडयांची देखील ये-जा होते. या ठिकाणी येणाऱ्या वाहनांमुळे चौकात मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होते. सदर विश्रांतवाडी चौकात उड्डाणपुल/ ग्रेडसेपरेटर झाल्यास चौकातून वाहने लोहगाव विमानतळ व शहराच्या इतर परिसरात जाणारी वाहतुकीची कोंडी सुटण्यास मदत होणार आहे. विश्रांतवाडी येथे पुणे मनपा व राष्ट्रीय महामार्ग योजने अंतर्गत संयुक्तपणे उड्डाणपुल उभारणे या कामासाठी सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात र. रु. २० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झालेली आहे. सदरचे कामाबाबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी पत्र जा.क्र. NHAI / PIU / PUNE/Palakhi Marg/२४६९/२०१९ दि. २६/०७/२०१९ अन्वये उड्डाणपुलाचे काम पुणे महानगरपालिकेच्या स्तरावर करणेबाबत कळविले आहे. सदरच्या पुलाचे सर्वेक्षण झाले असून पूर्वगणनपत्रक तयार करण्याची प्रक्रिया चालू आहे.

- **मुंबई– बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर पाषाण– सुस येथे उड्डाणपुल बांधणे –** या कामाकरिता तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करण्यात आली असून सर्वसाधारण प्रकल्पाचे संकल्पचित्र (GAD) तयार करून त्यास राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे तत्वत: ना हरकत पत्र प्राप्त झाले आहे. या कामाकरिता तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करण्यात आलेली असून निविदा प्रक्रिया सुरु करणेत आली आहे. या प्रकल्पाची प्रकल्पीय रक्कम सुमारे र.रु.४५ कोटी इतकी आहे.
- **सिंहगड रोड येथे नवीन उड्डाणपुल बांधणे–** वडगाव, नऱ्हे , वडगाव धायरी, खडकवासला, इ. भागाला पुणे शहराशी जोडणारा सिंहगड रस्ता हा एकमेव रस्ता असल्याने या रस्त्यावर वाहतूकीचा मोठ्याप्रमाणात ताण येतो. सदरचा ताण कमी करणेसाठी सिंहगडरोड येथे उड्डाणपुल प्रस्तावित करणेत आलेला आहे. या कामाकरिता सन २०१९–२० चे अंदाजपत्रकात र. रु. ३० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झालेली आहे. या कामाकरिता तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करण्यात आलेली असून निविदा प्रक्रिया सुरु करणेत आली आहे.
- **खराडी बायपास चौक येथे उड्डाणपुल / ग्रेड सेपरेटर बांधणे –** खराडी बायपास चौक येथे उड्डाणपुल / ग्रेड सेपरेटर बांधणेचे नियोजन करण्यात आलेले असून या कामासाठी अंदाजित र.रु. ४५ कोटी रुपये अपेक्षित आहे. सदर प्रकल्पासाठी सन २०१९–२० मध्ये र.रु. १५ कोटी इतकी तरतूद उपलब्ध झालेली असून सदर कामासाठी तज्ञ सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच निविदा प्रक्रिया सुरु करणेत आली आहे. सदर कामामुळे नगर रस्त्यावरील खराडी बायपास चौकात होणारी वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत होणार आहे.
- **बोपोडी चौक, पुणे मुंबई रस्ता येथे वाहन भुयारी मार्ग व पादचारी मार्ग बांधणे–** या कामाकरिता तज्ञ सल्लागाराची नेमणूक केली असून सुमारे र.रु.१३ कोटी इतका खर्च अपेक्षित असून सन २०१९–२० चे अंदाजपत्रकात या कामासाठी र.रु. ७ कोटी इतकी तरतूद उपलब्ध आहे. तसेच या कामासाठी आवश्यक जागेचा ताबा मिळणेसाठी भूसंपादन विभागामार्फत भूसंपादन कार्यवाही सुरु करणेत आली आहे.
- **राजाराम पुल येथे बंडगार्डन आर्ट प्लाझाच्या धर्तीवर पेडेस्ट्रीयन प्लाझा विकसित करून सुशोभिकरण करणे–** राजाराम पुलाच्या अपस्ट्रीम बाजुला नदीपात्राचे भागात पेडेस्ट्रीयन प्लाझा तयार करण्याचे नियोजन आहे. सदर पेडेस्ट्रीयन प्लाझा बाकडे, पादचारी मार्ग, झाडे– रोपे, योगासने व प्राणायाम याकरिता मोकळी जागा इ. ची व्यवस्था करण्यात येणार आहे. या कामाकरिता सन २०१९–२० चे अंदाजपत्रकात र.रु. १.७५ कोटी तरतूद उपलब्ध झाली असून याकरिता सल्लागार यांचेमार्फत नकाशे तयार करणेत आलेले आहेत. तसेच सदर कामासाठी ठेकेदार यांचेमार्फत प्रत्यक्ष कामास सुरवात करणेत आलेली आहे.
- **सनसिटी, सिंहगड रोड ते कर्वे नगर नदीवर पुल बांधणे –** पुणे महानगरपालिकेच्या २०१९–२० च्या अंदाजपत्रकात कामासाठी र.रु. १ कोटी इतकी तरतूद उपलब्ध झाली आहे. या चालू आर्थिक वर्षात उपलब्ध झालेली र.रु. १ कोटी तरतूद भू –संपादन व्यवस्थापन विभागास जा.क्र. १९०८ दि. २०/११/२०१९ अन्वये कळविणेत आले आहे. त्यानुसार पुलाच्या पोहोच रस्त्याची भूसंपादन प्रक्रिया चालू करण्यात आली आहे.
- **बालेवाडी स.नं. ४६/४७ जवळ मुठा नदीवर पुल बांधणे –** सदर कामाचे पुणे मनपा हद्दीकडील बाजूच्या ॲप्रोच रस्ता व पुलाचे काम पूर्ण करणेत आले आहे. तथापि, पिंपरी चिंचवड बाजूकडील पुलाचा १ स्पॅन व ॲप्रोच रस्त्याची जागा उपलब्ध नसल्याने यापूर्वी हे काम पूर्ण करता आले नाही. आता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून त्यांचेकडील ॲप्रोच रस्त्याची जागा ताब्यात घेण्यात आल्याने सदर कामाची निविदा मागवून जागेवर काम सुरु केले आहे.
- **जुन्या पुलांची दुरूस्ती करणे** – पुणे महानगरपालिकेमार्फत सन २०१३–१४ मध्ये एकुण १८ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करणेत आलेले होते. त्यापैकी ११ पुलांची दुरूस्तीविषयक कामे पूर्ण करणेत आलेली आहेत. तसेच सन २०१८–१९ मध्ये यापुर्वी स्ट्रक्चरल ऑडीट करणेत आलेल्या १८ पुलां व्यतिरिक्त २० वर्षापेक्षा जुन्या आणखी १२ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करणेत आले असून स्ट्रक्चरल ऑडिटच्या

रिपोर्टनुसार आवश्यक त्या दुरूस्त्या करणेत येणार आहेत. या कामासाठी सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात र.रु. ४.२० कोटी इतकी तरतूद उपलब्ध असून त्यानुसार बंडगार्डन व निलायम टॉकीज पुलाचे दुरुस्तीविषयक काम सुरु आहे.

- **पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ विकसित करणे/बांधणे –** पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये व नव्याने समाविष्ट झालेल्या गावांच्या हद्दींमध्ये वाहतुकीची व पार्कींगची मोठयाप्रमाणात समस्या भेडसावत आहे. विकास आराखडयामध्ये वाहनतळासाठी राखीव असलेल्या व नजिकच्या काळात पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात येऊ शकणाऱ्या विविध जागांवर वाहनतळ विकसित करणे आवश्यक आहे. सन २०१९-२० मध्ये या कामासाठी र.रु. ७ कोटी इतकी तरतूद उपलब्ध झाली असून त्यानुसार वडगाव शेरी, कोंढवा व कात्रज या ठिकाणी वाहनतळ विकसित करण्याचे काम चालू आहे.

- **मेट्रो मार्गाचे विस्तारीकरण करण्यासाठी डी.पी.आर. तयार करणे –** पुणे महानगर मेट्रो प्रकल्पाच्या स्वारगेट ते कात्रज अशा विस्तारीत मेट्रो मार्गिकेस तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महामेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांनी स्वारगेट ते कात्रज (फेज २) या मेट्रोरेल मार्गिकेचा डिपीआर तयार केला असून सदरचा डिपीआर पुणे मनपास सादर केला आहे.

  तसेच वनाझ ते रामवाडी या मेट्रो मार्गिकेचे काम प्रगतीपथावर असताना वनाझ ते चांदणी चौक (शिवसृष्टी) पर्यंतच्या वाहतुकीचा प्रश्न सोडविणेकरीता मेट्रो मार्ग विस्तारीत करण्यासाठी व त्याचा डिपीआर तयार करणेसाठी मा. स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. त्यावर प्रशासकीय कार्यवाही सुरु असून सदर डिपीआर तयार करणेकरीता र. रु. ३० लक्ष अधिक जीएसटी इतका खर्च येणार असल्याचे महा मेट्रो कॉर्पोरेशन लि.यांनी कळविले आहे. डि.पी. आर.चे काम महामेट्रोमार्फत सुरू आहे.

- **राष्ट्रीय राजमार्ग क्रमांक ४ वरील चांदणी चौकातील रस्त्यांने एकात्मिक विकसनाबाबत –** राष्ट्रीय राजमार्ग क्र. ४, चांदणी चौक येथील एकात्मिक रस्ते विकसनाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात येत आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) तज्ञ सल्लागार मे. एक्स.सी.सी. इंजिनिअर्स अँड प्लॅनर्स व पुणे महानगरपालिका यांचेमध्ये झालेल्या त्रिस्तरीय करारनाम्यानुसार राष्ट्रीय राजमार्ग क्र. ४ चे हद्दीबाहेरील एन.डी.ए., फॉरेस्ट व डिफेन्स या विभागाकडील आवश्यक परवानग्या घेणेची जबाबदारी पुणे महानगरपालिकेची आहे. चांदणी चौक विकसित करणे या कामासाठी अडथळे ठरणाऱ्या सेवावाहिन्या हलविणे व इतर तदनुषगिक कामे करणे या अर्थशिर्षका अंतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षात र.रु. १५.५० कोटी इतकी तरतूद उपलब्ध आहे. सदर ठिकाणच्या युटीलिटी शिफ्टींगबाबतची कार्यवाही पुणे महानगरपालिकेच्या मलनिःसारण , विद्युत विभागाकडून चालू आहे. विद्युत विभागाकडील युटीलिटी शिफ्टींगसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात र.रु. ४.३३ कोटी इतकी तरतूद उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. मलनिःसारण विभागाकडील युटीलिटी शिफ्टींगसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात र.रु. १,५८,२१,४००/- इतकी तरतूद उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. झाडे तोडणे व वृक्षारोपण करणे तसेच पाणीपुरवठ्याचे लाईन टाकणेचे काम NHAI मार्फत करणेत येणार असून त्यास महानगरपालिकेमार्फत निधी उपलब्ध करुन देण्याचा ठराव मा. स्थायी समिती मध्ये मान्य झाला आहे.

**सन २०२०-२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक –**

- सार्वजनिक वाहतूक व्यवस्था व विशेष प्रकल्प या अर्थशिर्षकांतर्गत चालू वर्षातील इलेक्ट्रीक बस, सीएनजी बस, नदीपुनरुत्जीवन प्रकल्प, वाहनतळ विकास व सुधारणा, भुयारीमार्ग तसेच उड्डाणपुलांची कामे प्रगती पथावर असून सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात नव्याने काही कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत आणि सद्यस्थितीत सुरु असलेली कामे मार्गी लावण्याचे अनुषंगाने तरतूद सुचविणेत आली आहे.

- **इलेक्ट्रॉनिक बस (जी.सी.सी. मॉडेल)विकत/पीपीपी इत्यादी धर्तीवर बस उपलब्ध करुन देणे –** पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून बीआरटी एसी इलेक्ट्रीक बसेस जी.सी.सी. तत्वावर घेणे कामी निविदा प्रक्रिया सुरु आहे. सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये सदर कामाकरीता मनपा हिश्श्याच्या २१० बसेस करीता प्रति बस र.रु.५० लक्ष या प्रमाणे र.रु. ९० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **पी.एम.पी.एम.एल. च्या विविध डेपोमध्ये विकसनाची कामे करणे –** पीएमपीएमएल विभागाने पुणे मनपा हद्दीतील विविध डेपोमध्ये विकसनाची कामे करणेबाबत मागणी केली आहे. त्या अनुषंगाने सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये र. रु. १३ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **सेव्हन लव्हज चौक ते वखार महामंडळ चौक उड्डाणपुल बांधणे –** सेव्हन लव्हज चौक ते वखार महामंडळ चौक या दरम्यान उड्डाणपुल विकसित करणेचे काम सुरु असून उर्वरीत काम पूर्णत्वाकरीता सन २०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये र. रु. १० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **मुंढवा येथे मुळा मुठा नदीवरील जुन्या पुलाची दुरुस्ती करणे व तद्नुषंगिक कामेकरणे –** पुलाच्या दुरुस्तीचे काम पूर्णत्वाकरीता सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु.३ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **घोरपडी पुणे येथे पुणे सोलापूर व पुणे- मिरज रेल्वे लाईनवर उड्डाणपुल बांधणे –** थोपटे चौक घोरपडी येथे पुणे-सोलापूर रेल्वे लाईनवर उड्डाणपुलाचे काम कार्यान्वित करणेत आलेले आहे. सदर कामा करीता सन २०२०-२१ करीता र. रु. २० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **प्रभाग क्र . २८ ब मध्ये वखार महामंडळ चौक येथे उड्डाणपुल बांधणे –** सदर कामाकरीता तज्ञ सल्लागार नेमणूकीबाबतची प्रक्रिया कार्यान्वित करणेत असून नियोजीत उड्डाणपुलाचे कामाकरीता सन २०२०-२१ करिता र. रु. १० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **नळस्टॉप चौकात उड्डाणपुल बांधणे** – उड्डाणपुलाचे काम महामेट्रोमार्फत सुरु असून सन २०२०-२१ मध्ये सदर कामाकरीता र. रु. २० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **औंध वाकड / सांगवी रस्त्यावरील अस्तित्वातील पुलाशेजारी नव्याने पुल बांधणे –** सदर पुलाचे काम सुरु असून या कामाकरीता सन २०२०-२१ चे अंदाजपत्राकामध्ये या कामाकरीता र. रु. १४ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **गोल्फ क्लब चौक येरवडा येथे ग्रेड सेप्रेटर किंवा सबवे बांधणे –** एअरपोर्ट रोडवरील गुंजन थिएटर ते एअरपोर्ट रोड दरम्यानची वाहतूक सुरळीत करणे करीता तसेच गोल्फ कल्ब चौकातील वाहतूकीचा ताण कमी करणेकरीता सन २०२०-२१ चे अंदाजपत्राकामध्ये या कामाकरीता र. रु. १७ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **विश्रांतवाडी येथे पुणे मनपा व राष्ट्रीय महामार्ग योजने अंतर्गत संयुक्तपणे उड्डाणपुल उभारणे –** सदरच्या पुलाचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून पूर्वगणनपत्रक तयार करण्याची प्रक्रिया चालू आहे. सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये या कामाकरीता र. रु. २० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **मुंबई- बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर पाषाण- सुस येथे उड्डाणपुल बांधणे –** या कामाकरिता सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये र. रु. २० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **सिंहगड रोड येथे नवीन उड्डाणपुल बांधणे–** सदर कामाची निविदा प्रक्रिया सुरु असून या कामाकरीता सन २०२०-२१ मध्ये र. रु. २० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **खराडी बायपास चौक येथे उड्डाणपुल / ग्रेड सेपरेटर बांधणे –** सदर कामासाठी जागेवर ट्रॅफीक सर्व्हे पूर्ण करणेत आलेला असून सद्यस्थितीत सॉईल इन्व्हेस्टिगेशनचे काम चालू आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात र. रु. २० कोटी इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे.

- **बोपोडी चौक, पुणे मुंबई रस्ता येथे वाहन भुयारी मार्ग व पादचारी मार्ग बांधणे–** या कामाकरिता सन २०२०–२१ चे अंदाजपत्रकामध्ये र. रु. ५० लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **राजाराम पुल येथे बंडगार्डन आर्ट प्लाझाच्या धर्तीवर पेडेस्ट्रीयन प्लाझा विकसित करून सुशोभिकरण करणे–** सदरचे काम सुरु असून या कामासाठी सन २०२०–२१ मध्ये र.रु.२.५० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **सनसिटी, सिंहगड रोड ते कर्वे नगर नदीवर पुल बांधणे –** या पुलाचे कामासाठी तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करण्यात आली आहे. पुलाचे दोन्ही बाजूकडील अॅप्रोच रस्त्याचे भूसंपादन कार्यवाही सुरु आहे. सन २०२०–२१ चे अंदाजपत्रकामध्ये या कामाकरीता र. रु. ५० लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **बालेवाडी स.नं. ४६/४७ जवळ मुठा नदीवर पुल बांधणे –** सदर पुलाचे काम सुरु असून या कामासाठी सन २०२०–२१ चे अंदाजपत्रकामध्ये र. रु. ७ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **जुन्या पूलांची दुरूस्ती करणे** – सन २०१८–१९ मध्ये वीस वर्षापेक्षा जुन्या १२ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आलेले आहे. या पुलांपैकी दोन पुलांची स्ट्रक्चरल स्ट्रेन्थनिंगची कामे करणेत येत आहेत. उर्वरित पुलांच्या दुरुस्ती विषय कामे करणेसाठी सन २०२०–२१ चे अंदाजपत्रकामध्ये र. रु. १० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ विकसित करणे/बांधणे –** पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये व नव्याने समाविष्ट झालेल्या गावांच्या हद्दींमध्ये वाहतुकीची व पार्कींगची मोठयाप्रमाणात समस्या भेडसावत आहे. विकास आराखडयामध्ये वाहनतळासाठी राखीव असलेल्या व नजिकच्या काळात पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात येऊ शकणाऱ्या विविध जागांवर वाहनतळ विकसित करणेकरीता सन २०२०–२१ चे अंदाजपत्रकामध्ये र. रु. ३ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प –** सदरचे काम महामेट्रो विभागामार्फत सुरु असून सन २०२०–२१ चे अंदाजपत्रकामध्ये या कामाकरीता र. रु. १० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **राष्ट्रीय राजमार्ग क्रमांक ४ वरील चांदणी चौकातील रस्त्यांचे एकात्मिक विकसनाबाबत –** सदर प्रकल्पाचे अनुषंगाने झाडे तोडणे व पुर्नरोपण करणे, पाणीपुरवठ्याच्या सेवावाहिन्या स्थलांतरीत करण्याचे काम तसेच चांदणी चौक येथील प्रकल्पांतर्गत बाधित एनडीएशी निगडीत सर्व बांधकामे निष्कासित करुन एन.डी.ए. च्या आराखड्यानुसार व मनपाचे सुचनेनुसार लाईट पाणी ड्रेनेज व्यवस्था इत्यादीसह सर्व कामे व पोलिस वाहतूक चौकीचे बाधित बांधकाम निष्कासित करुन मनपा/ वाहतूक पोलिस यांचे सुचनेप्रमाणे तसेच आराखड्यानुसार लाईट, पाणी, ड्रेनेज इत्यादी सुविधांसह सर्व कामे NHAI मार्फत करणेत येणार असून या करीता सन २०२०–२१ चे अंदाजपत्रकामध्ये र. रु. ७ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

## सन २०२०–२१ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना

- **साधू वासवानी पुल (कोरेगाव पार्क ) ते बंडगार्डन पुलापर्यंत एकात्मिक वाहतूक आराखडा तयार करुन तदनुषंगिक कामे करणे –** साधु वासवानी पुल (कोरेगाव पार्क उड्डाणपुल) या मध्यवर्ती भागातील या पुलावरू न येणारी वाहने ही लष्कर भागातून, पुणे शहरातून, कोरेगाव पार्क व नगर रोड महामार्गाकडे मोठयाप्रमाणात ये–जा करतात. साधु वासवानी पुल हा ९ मी. रुंदीचा असून तो वाहतुकीसाठी अपुरा पडत आहे. साधु वासवानी पुल हा सुमारे ४० वर्षे जुना पुल आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेमार्फत पुणे शहरातील जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी नेमण्यात आलेले तज्ञ सल्लागार मे. सबडक्शन झोन कन्सल्टंट व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचेकडून सदर पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात येऊन पुल हा कमकुवत झाला असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सदरचा पुल हा नवीन करणे आवश्यक आहे. भविष्यात कोणताही धोका होऊ नये याकरिता साधु वासवानी उड्डाणपुलावरील जड

वाहतूक बंद करणेत आली आहे. सदर पुलासाठी २०२०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु. १० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

- **पी.पी.पी./ बी.ओ.टी./ डेव्हलपमेंट टी.डी.आर. इत्यादी माध्यमातून बंडगार्डन जंक्शन ते मुंढवा पुलापर्यंत मान्य विकास आराखडयात दर्शविलेल्या नदीकाठच्या दक्षिणेकडील ३० मी. उन्नत डी.पी. रस्त्याच्या कामाचा डीपीआर तयार करणे, रस्ता विकसित करणे व तदनुषंगिक कामे (पुल) करणे –** पुणे-नगर रस्ता व नॉर्थ मेन रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी करणेकरिता पुणे महानगरपालिकेच्या मान्य विकास आराखडयानुसार ३० मी. रुंदीचा शिवणे- खराडी रस्ता नदीच्या उत्तरेस आणि बंडगार्डन जंक्शन ते बोटॅनिकलगार्डन पर्यत ३० मी. रुंदीचा रस्ता दक्षिणेस दर्शविण्यात आलेला आहे. बंडगार्डन जंक्शन ते बोटॅनिकलगार्डन पर्यत ३.४० किमी लांबीचा रस्ता आहे. त्यापैकी बंडगार्डन जंक्शन ते कल्याणीनगर १.९० किमी लांबीचा असून कल्याणीनगर पुल ते बोटॅनिकलगार्डन पर्यत १.५० किमी रस्त्याची लांबी आहे. सदर प्रस्तावामध्ये नदी पुनरुत्जीवन प्रकल्प, नदीची लाल व निळी पुररेषा, पर्यावरणाशी निगडीत बाबींचा विचारकरुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व त्यानुसार पुलाचे रुंदीकरण, नव्याने पुल बांधणे व रस्ता विकसित करणे इ. बाबींचा समावेश असणार आहे. सदर रस्त्यासाठी र. रु. २५ कोटी तरतूद करण्यात आली आहे.
- **पुणे शहरातील विविध पुलांना संरक्षक जाळी बसविणे व तदनुषंगिक कामे करणे –** पुणे शहरातील नदीवरील व नाल्यांवरील पुलांवरुन नदी व नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये कचरा टाकणेत येतो. यामुळे नदी व नाल्यांमध्ये मोठ्याप्रमाणात प्रदुषण होते, नाल्यांच्या प्रवाहाची वहनक्षमता कमी होते तसेच नदीच्या पुलांवरुन नदीमध्ये उडी मारुन आत्महत्या करण्याचे प्रकार वाढले आहेत. या सर्व बाबींना आळा घालण्यासाठी शहरातील विविध पुलांना संरक्षक जाळी बसविणेचे नियोजन असून सन २०२०-२१ मध्ये सदर कामाकरीता र. रु. २ कोटीची तरतुद करण्यात आली आहे.
- **करिश्मा चौक ते कर्वे पुतळा उड्डाणपुल बांधणे –** पुणे शहरातील वाढते औद्योगिकीकरण, आय.टी. हब , नागरिकीकरण यामुळे शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या यामुळे चौकाचौकात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. कर्वे पुतळा चौक येथे कर्वे रस्त्यावरील वाहतूक, कोथरुड गावठाण, वारजे रस्त्यावरील वाहतूक एकत्र होत असल्याने, सदर ठिकाणी वाहतुकीची कोंडी होते. सबब, सदर ठिकाणी उड्डाणपुल केल्यास वाहतुकीची कोंडी कमी होईल. त्या अनुषंगाने या कामाकरीता सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु. १० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **रामटेकडी /काळेपडळ येथे नवीन बांधण्यात आलेल्या भुयारीमार्गाकरीता पोहोच रस्ता करणे व रेल्वे फाटक क्र. ७ जवळ वाहतूक विषयक विविध कामे करणे –** सदरहू कामाकरीता पोहोचमार्ग विकसित करणे व रेल्वे फाटक क्र. ७ लगत वाहतूक विषयक विविध कामे करणे या कामाकरिता सन २०२०-२१ मध्ये र.रु. ५ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- **पुणे शहरातील विविध उड्डाणपुलाखाली सुशोभिकरणाची कामे करणे अंतर्गत शहरातील दहा पुलांचे (बीओटी/सौजन्य) सुशोभिकरण करणे –** पुणे शहरामध्ये १८ उड्डाणपुल अस्तित्वात असून वखार महामंडळ चौक व गोल्फकल्ब चौक या दोन ठिकाणी नव्याने उड्डाणपुल बांधणेची कामे सुरु आहेत. अस्तित्वात असलेल्या उड्डाणपुलांखाली मोठ्याप्रमाणात अतिक्रमण व अनाधिकृतपणे वाहनांची पार्कींग होत आहे. या समस्येवर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून उड्डाणपुलाखालील जागा बंदिस्त करुन सदर ठिकाणी सुशोभिकरण करण्याचे नियोजन आहे. यामध्ये हिरवळ लावणे, सुशोभिकरणाची झाडे लावणे, रंगरंगोटी करणे, चित्र काढणे, म्युरल तयार करणे, स्कल्चर तयार करणे, विद्युत रोषणाई करणे इत्यादी कामांचा समावेश आहे. सन २०२०-२१ मध्ये एकुण १० उड्डाणपुलांखाली सुशोभिकरण करण्याचे नियोजन असून याकरीता अंदाजपत्रकामध्ये र.रु. ५ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

## (७) पथ(भांडवली तरतूद र. रु.४६१.७३ कोटी + महसूली तरतूद र.रु. २०२.३८ कोटी = र. रु.६६४.११ कोटी)

- **सन २०१९-२० चा दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती –** पथ विभागामार्फत विविध खोदाई पोटी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात र.रू. ५.०९ कोटी इतकी जमा झाली असून, खात्याकडे आलेल्या खोदाई प्रस्तावांचा विचार करता माहे मार्च,२०२० अखेर ७.०९ कोटी इतकी रक्कम जमा होईल.
- **सन २०१९-२० मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नाविन्यपूर्ण योजनांचे ठळक मुद्दे –**
- **एच.सी.एम.टी.आर.प्रकल्प –**एच.सी.एम.टी.आर. प्रकल्पाची एकुण लांबी सुमारे ३६ कि.मी.असून रूंदी २४ मी. आहे. सदर प्रकल्पाची प्रस्तावित अलाइन्मेन्ट पूर्णत: उन्नत स्वरूपाची असून त्यावर एकुण ६ मार्गिका प्रस्तावित आहेत. यामध्ये २ मार्गिका बी.आर.टी. साठी व उर्वरित मार्गिका खाजगी वाहनांसाठी आरक्षित आहेत. सदर प्रकल्पाच्या उभारणीसाठी रक्कम रू. ५०९६ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच भूसंपादनाकरीता सुमारे र.रू.१५५० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर प्रकल्पासाठी कॅपिटल फॉर्च्युन प्रा.लि. या सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. या सल्लागाराने विहित मुदतीत म्हणजे ८ महिने कालावधीमध्ये सदर प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी विविध Financial Options देवून प्रकल्प खर्च उभारणीची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. सन २०१०-२१ च्या अंदाजपत्रकात सदर प्रकल्प विकसनासाठी र.रू.१४० कोटी व भूसंपादनासाठी र.रू.१५ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.
- **शिवणे ते खराडी रस्ता –** शहरातील वाहतूकीवरील ताण कमी करण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणुन शिवणे ते खराडी दरम्यान नदीकाठावर दर्शविण्यात आलेल्या डी.पी.रस्त्याचे काम, शिवणे ते म्हात्रे पुल फेज-१ लांबी ६ कि.मी. व संगमवाडी ते खराडी फेज-३ लांबी ११.५० कि.मी. असे एकुण १७-५० कि.मी. लांबीचे काम प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत सदर रस्त्याचे सुमारे ६०% काम पूर्ण झाले आहे. सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये या कामासाठी र.रू.३५ कोटी तरतूद सुचविण्यात आली आहे.
- **कात्रज-कोंढवा रस्ता –** कात्रज-कोंढवा रस्ता राजस सोसायटी ते खडीमशिन चौक दरम्यान सुमारे ३.५ कि.मी. लांबीचा व ८४ मी. रूंदीचा रस्ता विकसित करण्याकरीता मा.स्थायी समिती मार्फत मंजूरी देण्यात आली असून या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर रस्त्याच्या कामासाठी आवश्यक असणारी जमीन टीडीआर व एफएसआय पोटी तडजोडीने ताब्यात घेण्याची कार्यवाही पथ विभागामार्फत सुरू आहे. आतापर्यंत सुमारे ७५% जागा तडजोडीने टीडीआर पोटी ताब्यात घेण्यात आली आहे. उर्वरित जागेसाठी प्रयत्न सुरू आहेत. या कामासाठी सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये र.रू.३० कोटी व भूसंपादनासाठी र.रू.५ कोटी इतकी तरतूद सुचविण्यात आली आहे. कामाचे व रस्त्याचे महत्व लक्षात घेता मुदतीमध्ये काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने ही रक्कम आवश्यक आहे.
- **बी.आर.टी.एस.प्रकल्प –** संगमवाडी ते विश्रांतवाडी व नगररस्ता या रस्त्यांवर एकुण सुमारे १६ कि.मी.लांबीकरीता बी.आर.टी.एस. योजना कार्यान्वित करण्यात आली असून सदर रस्त्यांवर बी.आर.टी. बसेसचे संचलन सुरू आहे. सिमला चौक ते राजीव गांधी पुल, औंध दरम्यान ६.५ कि.मी.लांबीच्या प्रस्तावापैकी विद्यापीठ चौक ते राजीव गांधी पुल दरम्यानचे ३.२ कि.मी.लांबीचे रस्तारुंदीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच पाटील इस्टेट जंक्शन ते हॅरिस ब्रिज, बोपोडी या रस्त्यांवर सुमारे ५.७० कि.मी. लांबी पैकी पाटील इस्टेट जंक्शन ते रेंजहिल चौक दरम्यान २.०० कि.मी. लांबीच्या भागामध्ये रस्तारुंदीकरणाचे काम पुर्ण झाले आहे. रेजहिल चौक ते खडकी रेल्वे स्टेशन (लांबी २.२ किमी) खडकी कॅन्टोन्मेन्ट बोर्डाच्या अखत्यारित असून सदर जागेवर वर्कींग परमिशन मिळणेसाठीचा प्रस्ताव मे. केंद्र शासनाच्या संरक्षण विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

- पाटील इस्टेट जंक्शन पूल ते संगमवाडी गावठाण दरम्यान रस्ता रुंदीमधील जागा ताब्यात मिळाल्यानंतर सदर ठिकाणी रुंदीकरणाचे काम करण्यात येणार आहे. त्यानंतर बीआरटीएस योजनेकरीता वाहतूक पोलीस विभागाशी समन्वय साधून बसथांबे बांधणे व बी.आर.टी.एस. कॉरिडॉर तयार करणेचे उर्वरित काम हाती घेण्यात येणार आहे

- सातारा रस्ता स्वारगेट जंक्शन ते कात्रज दरम्यान सुमारे ५.५० कि.मी.लांबीकरीता बी.आर.टी. एस. योजनेचे काम थोडया कालावधीमध्ये पूर्णत्वास येत आहे. उर्वरित अत्यावश्यक कामांसाठी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात र.रू.७ कोटी तरतूद करण्यात आली आहे.

- **गणेशखिंड रस्ता, पुणे-मुंबई रस्ता व पाटील इस्टेट ते संगमवाडी –** सदर कामामध्ये एकुण १५ कि.मी.लांबीचा बी.आर.टी.मार्ग प्रस्तावित आहे. सदर कामातील खालील ३ बी.आर.टी. मार्ग हे अस्तित्वातील बी.आर.टी. जोडण्याच्या अनुषंगाने महत्वाचे आहेत.

- Urban Street Design Guidelines नुसार पुणे शहरात नव्याने विकसित होत असलेले रस्ते करण्यात येत आहेत. रस्त्याचा वापर करणारे पादचारी यांना केंद्रस्थानी ठेऊन, रस्त्यांचे डिझाईन करण्यात येत आहे. पादचाऱ्यांना सुरक्षितपणे रस्त्यावरून चालता यावे या उद्देशाने पदपथ गेल्या तीन वर्षापासून तयार करण्यात येत आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये विविध रस्त्यांवर एकुण साधारण १०० किलोमीटरचे पदपथ विकसित करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. 'Pedestrian First' हे ध्येय समोर ठेऊन पदपथ विकसित करण्यात येणार असल्याने, ज्येष्ठ नागरिक महिला, लहान मुले, विकलांग इत्यादी घटकांसहित सर्व पादचाऱ्यांना सुविधा निर्माण होणार असून त्यांच्या सुरक्षिततेमध्ये भर पडणार आहे.

- **सिमला ऑफिस चौक- राजीव गांधी पुल -औंध- गणेशखिंड रस्ता - लांबी ६.५ किमी. व रूंदी ३६ मी**

  सदर बी आर टी च्या कामाचे र.रू.६२,७२,५६,१७७/- इतक्या रकमेचे पुर्वगणनपत्रक आहे. एकत्रित निविदेची रक्कम रू.१४९,९७,१७,४५०/- इतक्या रकमेची आहे. अद्ययावत कामाचा एकुण खर्च र.रू.२७ कोटी इतका आहे. या कामांतर्गत पुणे विद्यापीठ ते ब्रेमेन चौक या ३२०० मी. लांबीच्या रस्त्याचे ३६ मी.प्रमाणे रूंदीकरण पूर्ण झाले आहे. उपलब्ध रूंदीकरणासाठीच्या जागेपैकी ब्रेमेन चौक ते राजीव गांधी पुल या ९०० मी. लांबीच्या रस्त्याचे काम १२० फुट रूंदीऐवजी ९० फूट रूंदीप्रमाणे करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच पुणे विद्यापीठ ते संचेती पुल या ३३०० मी. लांबीच्या रस्त्याचे काम प्रस्तावित हिंजवडी मेट्रोच्या कामामुळे स्थगित ठेवलेले आहे.

- **बालभारती ते पौड फाटा रस्ता –** बालभारती ते पौड फाटा या दरम्यान मंजूर विकास आराखडयामध्ये ३० मी. रूंदीचा व अंदाजे २ कि.मी. लांबीचा रस्ता दर्शविण्यात आलेला आहे. या रस्त्या संदर्भात यापूर्वी मे.हाय कोर्टामध्ये याचिका दाखल करण्यात आलेली होती. त्यामध्ये मे. हाय कोर्टाने सदर रस्त्यासाठी Environment Impact Assessment व Traffic Impact Assessment यांचा अभ्यास करून याचिकाकर्त्यांच्या समन्वयाने व त्यांचा समावेश असलेल्या समितीमध्ये याबाबत सविस्तर चर्चा करून मार्ग काढावा असे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार नेमण्यात आलेल्या सल्लागारा मार्फत सादरीकरण करण्यात आले असून त्याची मान्यता मिळाल्यानंतर लवकरच काम हाती घेण्यात येईल.

## सन २०२०-२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

### सन २०२०-२१ मध्ये करावयाच्या प्रस्तावित योजना –

- **पुणे महानगरपालिका सायकल क्लब –** पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सायकल क्लब स्थापन केला असून यामध्ये इतर स्वयंसेवी संस्था, नागरीक यांना देखील या उपक्रमात सामिल करून घेण्यात येत आहे. पुणे महानगरपालिका सायकल क्लबचे आजमितिस ९३५ सभासद असून यामध्ये मनपा अधिकारी, कर्मचारी, आजी/माजी पदाधिकारी, स्वंयसेवी संस्था, नागरिक यांचा समावेश आहे. सायकल रॅलीच्या माध्यमातून स्वयंस्फूर्तीने सायकलींचा वापर करणे, पर्यावरण रक्षण, ध्वनी प्रदुर्षण टाळणे, आरोग्य

सांभाळणे, वाहतूक समस्या, इ. विषयांबाबत मोठयाप्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. पुणे महानगरपालिके मार्फत राबविण्यात येणारे विविध उपक्रम, योजना यांची जनजागृती करणे यासाठी देखील सायकल क्लबच्या माध्यमातून यशस्वीपणे प्रयत्न करण्यात येत आहे. सायकल क्लबच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविणारी पुणे महानगरपालिका ही भारतातील पहिली स्थानिक स्वराज्य संस्था आहे.

- **पुणे मनपा पथ विभाग नाविन्यपुर्ण योजना (रोड स्टॅबिलायझेशन /बेस स्टॅबिलायझेशन) –** पुणे मनपाचे पथ विभागामार्फत शहरातील १४०० किमी लांबीच्या रस्त्यांची बांधणी व देखभाल दुरूस्तीची कामे केली जातात. सन २०२०-२१ चे बजेट मध्ये काही नाविन्यपुर्ण कामे करणेकरिता रोड स्टॅबीलायझेशन या तंत्रज्ञानाचा अभ्यास पथ विभागामार्फत केला आहे.

- रोड स्टॅबिलायझेशन /बेस स्टॅबिलायझेशन या नवीन तंत्रज्ञामध्ये रस्त्याचा बेस लेयर अत्यंत मजबुत बनविण्यात येता, या करिता काही विशेष केमिकल्सचा वापर करण्यात येतो. या मुळे रस्त्याचे कामामधील वरील डांबराचे थरांच्या जाडीमध्ये जवळ जवळ ३५ ते ४० टक्के कपात करता येते. या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याकरिता इंडीयन रोड कॉंग्रेस (IRC, Delhi) मार्फत IRC 37-2018 व IRC SP 89-2018 हे दोन मानांक प्रसिध्द केले आहेत. या मानंकाव्दारे रस्त्याचे डिझाईन करून त्यामध्ये वेळ, मटेरियल आणि कामाचे खर्चामध्ये मोठया प्रमाणात बचत शक्य होते. तसेच टिकाऊ आणि दर्जेदार रस्ता बनविण्यास मदत होते. रोड/बेस स्टॅबिलायझेशनचे ठळक फायदे खालीलप्रमाणे ...
    - रस्त्याचे कामात लागणाऱ्या मालामध्ये ३० टक्के बचत होत.
    - जुन्या रस्त्यातील मालाचा/थरांचा वापर केल्याने पर्यावरणपुरक (Environmental Friendly) पध्दतीने रस्ता बनतो.
    - रस्त्याच्या खर्चामध्ये २०-२२ टक्क्यापर्यंत बचत होते.
    - रस्त्याचे कामाचा वेळ ३० ते ४० टक्क्याने कमी होतो.
- रोड/बेस स्टॅबिलायझेशन तंत्रज्ञान वापरून डांबरी तसेच कॉंक्रीट रस्ते करणे शक्य आहे. याकरिता IRC मानांक तसेच याचा दर PWD SSR (दरसुची) मध्ये उपलब्ध असल्याने हे काम पुणे मनपामार्फत नाविन्यपूर्ण काम (Innovative work) म्हणून नक्कीच हाती घेण्यात येऊ शकते. या कामामध्ये समावेश करण्यासारखे रस्ते अधोरेखित करून त्यांचा समावेश सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात करण्यात येईल.
- **रेन वॉटर हार्वेस्टींग अनुषंगिक नियोजन–** पावसाळी पाण्याचे जमिनीमध्ये पुन:र्भरण करणे हे पर्यावरणाचे अनुषंगे अत्यावश्यक झाले आहे. त्याअनुषंगाने पावसाळी लाईनमधील चेंबरच्या तळाशी पोरस कॉंक्रीट करणेचे नियोजन आहे, जेणेकरून प्रत्येक चेंबरच्या तळामधून पावसाचे पाणी जमिनीमध्ये मुरवले जाईल. यामुळे जमीनीमधील पाण्याची पातळी वाढणेस मदत होईल. तसेच काही ठिकाणी खोलीसाठी बोअर करणेचे नियोजन आहे. त्यामुळे ज्यादा खोलीवर पावसाचे पाणी जाणेस मदत होईल.
- **लहान मुलासाठी वाहतुक विषयक प्रकल्प** (Children Traffic Plaza) – भारतामध्ये मुलांना सुमारे १८ वर्षे झाल्यानंतर टु-व्हीलर साठी लायसेन्स घेतेवेळी वाहतुकी विषयक नियमांची माहिती दिली जाते. विकसीत देशामध्ये लहान वयामध्ये मुलांना वाहतुक विषय नियम व माहिती वेगवेगळया माध्यमां मार्फत (Traffic Plaza, Video, Presentation, Training) दिली जाते. जेणेकरून लहान संस्कारक्षम वयामध्ये याबद्दल माहिती मिळाल्यामुळे त्याचे पालन योग्य त्या पध्दतीने होत असल्याचे निदर्शनास येत आहे.
- त्याअनुषंगाने पुणे मनपामार्फत अर्बन ९५ या प्रकल्पांतर्गत ब्रेमेन चौक, औंध नजीक ४०० मी १८ मी या क्षेत्रामध्ये लहान मुलांसाठी (Children Traffic Plaza) वाहतूक विषयक माहिती देणारा पार्क उभारणेचे काम सुरू केले आहे. या परिसरातील ११ शाळामधील सुमारे ५००० विद्यार्थी या उपक्रमाचा लाभ घेऊ

शकतात. पोलीस उप आयुक्त (वाहतूक) यांनीही या प्रकल्पास सहमती दर्शविली असून, पुढील वर्षी येरवडा विभागामध्ये असा प्रकल्प उभारणेचे नियोजन आहे. त्यामुळे वाहतुक विषयक नियमांचे पालन करणेसाठी समाज प्रबोधन करणेस मदत होईल.

- **3D थर्मोप्लास्टीक पेंट–** पुणे शहरामध्ये बी.एम.सी.सी. येथे 3D थर्मोप्लास्टीक पेंटव्दारे झेब्रा पट्टे मारण्याचा प्रयोग करण्यात आला. त्यामुळे वाहनाचा वेग किमी होण्यास तसेच पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेमध्ये वाढ होण्यास मदत होत आहे, असे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगे सन २०२०–२१ या आर्थिक वर्षात पुणे शहरातील २५ चौकात 3D झेब्रा पट्टे रंगवण्याचा खात्याचा मानस आहे.

## (८) <u>पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.(र. रू.३४६.३८ कोटी)</u>

### सन २०१९–२०

- पुणे महानगर परिवहन महामंडळाने स्वमालकीच्या ४०० सीएनजी बसेस घेतल्या असून सर्व ४०० बसेस ताफ्यात दाखल झाले आहेत.
- १५० ई–बसेस पैकी २५(मिडी) व १२५(मोठया) बसेसपैकी ९४ बसेस ताफ्यात दाखल झाल्या आहेत. ३१ बसेस मार्च २०२० अखेर ताफ्यात दाखल होणार आहेत.
- ३५० ई–बस टेंडर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. माहे मार्च २०२० अखेरपर्यंत सदर बसेस ताफ्यात दाखल होणेचे नियोजन आहे.
- Faster Adoption & Manufacturing of Hybride & Electric Vehicles in India (FAME) अंतर्गत १५० ई–बस करिता निविदा प्रसिध्द करण्यात आली असून सदर बसेस मार्च २०२० अखेर ताफ्यात दाखल होणार आहेत.
- जीसीसी तत्वावरील ४४० सीएनजी बसेसचे Letter of Intent (LOI) देण्यात आलेले आहे. सदर बसेस मार्च २०२० अखेर ताफ्यात दाखल होणार आहेत.
- सद्यस्थितीत पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या स्वमालकीच्या एकुण १६५९ बसेस आहेत. सन २०१९–२० अखेरपर्यंत २०० बसेस ताफ्यातुन बाद होणार आहेत. १४५९ स्वमालकीचा बस ताफा राहणार आहे.
- सद्यस्थितीत भाडेतत्वावरील ४९२ बसेस, ई–बसेस –११९ (२५ मिडी, ९४ मोठया) व सन २०१९–२० अखेर ९७१ (ई–बस मोठया–३१, Fame अंतर्गत ई–बस –१५०, ई–बस ३५० व जीसीसी सीएनजी बस –४४०) बसेस ताफ्यात दाखल होवून एकुण बस ताफा ३०४१ राहणार आहे.
    - **<u>सन २०१९–२०</u>**

| | | |
|---|---|---|
| | : अपेक्षित उत्पन्न | – र.रू.८२८.९६ कोटी |
| | : अपेक्षित खर्च | – र.रू.११६२.९२ कोटी |
| | : तुट | – र.रू.३३३.९६ कोटी |

### सन २०२०–२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- सन २०२०–२१ मध्ये ३०४१ चा बसेसचा ताफा राहणार आहे.
- ३०० ई–बस घेण्याचे नियोजन आहे.
- सन २०२०–२१ च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात र. रू. ३४६.३८ कोटींची तरतूद करणेची मागणी करण्यात आली आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम रू. (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १. | इ.५ वी ते १० वी विद्यार्थ्यांना मोफत पासेस / बस सेवा | ७.५० |
| २. | नागरवस्ती विकास योजना - अंध/अपंग पासेस | १२.२५ |
| ३. | विविध सवलतीचे पासेस | २३.२५ |
| ४. | संचलन तूट (शा.नि.क्र.एनयुआर-२०१३/प्र.क्र.३३८ न.वि.३३, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि.१८/०२/२०१४) | २००.३८ |
| ५. | ई-बस सबसिडी ३०० बसेस (६०%) | ९०.०० |
| ६. | डेपो विकसन | १३.०० |
|  | **तरतूद करावयाची एकुण रक्कम रू.** | **३४६.३८** |

## (९) नदी पुनरुज्जीवन प्रकल्प (र.रु.१० कोटी)

### सन २०१९-२०

- **नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे -** पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड या भागांच्या हद्दीतून वाहणाऱ्या अंदाजे ४४ कि.मी. लांबीच्या मुळा, मुठा, मुठा व मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या प्रारुप आराखडयास मा. मुख्य सभेची ठ. क्र.२०९७ दि. १२/०२/२०१८ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच State Level Environmental Assessment Authority यांचेमार्फत SEIAA-EC0000002088 दि. १६/११/२०१९ अन्वये सदर प्रकल्पास मान्यता मिळालेली आहे. SPV स्थापन केल्यास नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे सुलभ होणार आहे. यासाठी सदरचा प्रस्ताव मे. राज्य शासन यांचेकडे सादर करण्यात आलेला असून याबाबतचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

### सन २०२०-२१

- **नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणे -** मुळा, मुठा, मुळा-मुठा या नद्यांचे पुनरुज्जीवन प्रकल्पाचे अनुषंगाने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात पुढील प्रमाणे कामे करण्याचे नियोजन असून या करीता सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामध्ये र. रु. १० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- सदर प्रकल्पाशी संलग्न असलेल्या विविध विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे
- नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी शासन मान्यतेनंतर विविध संस्था मिळुन एस.पी.व्ही. स्थापन करणे.
- प्रकल्प उभारणीसाठी फायनान्शीयल मॉडेल तयार करणे.
- एस.पी.व्ही. स्थापन झाल्यानंतर या प्रकल्पातील फेज १ चे डिटेल इंजिनिअरींग ड्रॉईंग, एस्टीमेट तयार करणे.

## (१०) उद्यान(भांडवली तरतूद र. रु.५६.७५ कोटी + महसूली तरतूद र.रु. ४८.८५ कोटी = र.रु.१०५.६० कोटी)

**सन २०१९–२०**

**स्व.राजीव गांधी प्राणी संग्रहालय –**

- स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालय कात्रज येथे हत्तीसाठी पोहण्याच्या तलावाचे काम १००% पूर्ण झालेले आहे. तसेच विविध प्राण्यांसाठीचे खंदक, सिंह खंदक, रस्टी स्पॉटेड कॅट लेसर कॅट शेकरु तसेच रेप्टाइल पार्कची कामे प्रगतीपथावर असून या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचे प्रयोजन आहे.
- स. नं. ५५, वडगाव शेरी येथे “Barrier Free Access” या संकल्पनेवर आधारित दिव्यांगांकरिता अडथळा विरहीत उद्यान विकसीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
- स. नं. २२७ लोहगाव, विमाननगर येथे बालकांकरीता (Toddlers) वैशिष्टयपुर्ण उद्यान विकसित करण्याचे काम सुरु आहे.
- स.नं.५२,५३ बावधन येथील उद्यानाचे काम प्रगतीपथावर आहे.
- कै.बाळासाहेब ठाकरे उद्यान डहाणुकर कॉलनी, कोथरुड येथे सुशोभिकरण करणेचे काम प्रगतीपथावर आहे.
- अभिरुची मॉल जवळील नियोजित उद्यान, सिंहगड रोड येथे काम सुरु असून या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचे प्रयोजन आहे.

**सन २०२०–२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- सन २०१९–२० च्या आर्थिक वर्षात वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेली सर्व कामे सन २०२०–२१ मध्ये पूर्ण करण्यात येणार आहे.

## (११) विद्युत (भांडवली तरतूद र. रु.२९.०६ कोटी + महसूली तरतूद र.रु. १०७.१७ कोटी = र.रु. १३६.२३ कोटी)

**सन २०१९–२०**

- पुणे शहरामध्ये महानगरपालिकेच्या नऊ इमारतीवरती रूफ टॉप सोलर सिस्टीम रेस्को मॉडेल व्दारा ४४३ किलो वॅट क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात आला असून र.रू ३.६२ प्रति युनिट वीज दराने वीज खरेदी चालु आहे. तसेच ३० इमारतीवर रूफ टॉप सोलर सिस्टीम कॅपेक्स मॉडेल व्दारा ८२५ किलो वॅट सोलर एनर्जी उत्पन्न होत असून यासाठी र.रू ४२५.६५ कोटी इतका खर्च झालेला आहे, यामुळे पुणे मनपाने एकुण १.२५ मेगा वॅट क्षमतेचा प्रकल्प उभारण्याचे काम पूर्ण केले आहे.
- सन २०१८–१९ सालापासुन आजपर्यंत मे.टाटा प्रोजेक्ट उज्ज्वल पुणे लि.यांचे मार्फत एस्को तत्वावर साधारणत: ८७,००० एलईडी फिटींग बसविणेत आलेल्या असून त्यासाठी देखभाल दुरूस्तीसाठी टोल फ्री क्र. १८००८३३८८ हा सर्वासाठी खुला करण्यात आलेला आहे. तसेच मनपा कर्मचारी, सभासद आणि नागरिकांसाठी मोबाईल ॲप "Pune Street Light Readressal" सुरू करण्यात आलेले आहे, जेणे करून शहरामध्ये दिवे दुरूस्तीसाठी तात्काळ सेवा देणे शक्य होईल. तसेच २०१९–२० मध्ये ऑगस्ट २०१९ पासुन प्रायोगिक तत्वावर विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाच्या हदद्दीत एलईडी दिवे देखभाल दुरूस्ती संपुर्णपणे मे.टाटा प्रोजेक्ट यांचेकडुन करण्यात येत असून तेथील विद्युत कर्मचारी इतर क्षेत्रिय कार्यालयामध्ये वर्ग करण्यात आले आहेत त्यामुळे अंदाजे एकुण र.रू ७१.५६ लाख पर्यत खर्चात बचत होत आहे.

- नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई च्या आदेशानुसार EESL च्या माध्यमातुन एकुण ५२,००० नग फिलिप्स मेक एलईडी दिवे खरेदी करण्यासाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली असून या कामा अंतर्गत नव्याने बसविण्यात आलेल्या पोलवर ८०४६ नग एलईडी दिवे बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे, तसेच शहरामधील जुने सोडियम दिवे,टी-५, मेटल हेलाईड फिटींग व नव्याने समाविष्ट गावांमधील जुने फिटींग (सोडियम दिव,टी-५,सि.एफ.एल,पी.एल टयुब,बल्ब इ.) तसेच शहरातील जुने व वारंवार बंद पडणारे एल.ई.डी दिवे असे एकुण १७,६८६ नग फिटींग्ज् बदलेले आहेत, या कामामुळे पुणे मनपाचे एकही सोडियम दिवे राहिले नसुन ऊर्जा बचतीचे १,६८,००० नग एलईडी पथ दिव्यांच्या सहाय्याने प्रकाश व्यवस्था करण्यात येत आहे.
- पुणे मनपाच्या मुख्य इमारतीमध्ये वीज बचत करण्याचे दृष्टीने एलईडी दिवे बसविण्याचे काम ९०% पूर्ण झाले असून या कामामुळे प्रकाश व्यवस्थेत सुधारणा झालेली असून M.S.E.B च्या बिलात साधारणपणे ५०% पेक्षा जास्त वीज बचत झालेली आहे.
- पुणे शहरातील नदीवरील पुलांवर आर्कीटेक्चरल लाईटिंग करण्यासाठी र.रू ३५० लक्ष तरतूद उपलब्ध झाली असून या कामामध्ये शहरातील शिवाजी पुल, डेंगळे पुल, वेलस्ली पुल, संगम पुल, वारजे उडड्राण पुल, स्वातंत्र्यवीर सावरकर उडड्राण पुल,पौड रोड,खराडी पुल या सात पुलांवर विशिष्ट प्रकारचे आर्किटेक्चरल पध्द्तीने प्रकाश व्यवस्थेचे काम प्रगती पथावर आहे.
- नानासाहेब बराटे उद्यान या ठिकाणी आर्किटेक्चरल प्रकाश व्यवस्था, बाणेर रस्ता याठिकाणी आर.के.लक्ष्मण प्रायोगिक रंगभुमी येथे विद्युत विषयक कामे, बाळासाहेब ठाकरे कला मंदिर कोथरूड येथे स्टेज लाईट,वातानुकुलीत यंत्रणा,ध्वनीक्षेपण यंत्रणा व वायरिंगची कामे ९०% पूर्ण, पुणे शहरातील हडपसर येथील तुपे नाटयगृहासाठी वातानुकुलीत यंत्रणा, स्टेज लाईट, वायरिंग, विद्युत पुरवठया संबंधीत कामे सुरू करण्यात आले असून ८०% पूर्ण व छत्रपती शिवाजी महाराज उद्यान वडगावशेरी, ज्ञानेश्वरी उद्यान वारजे माळवाडी,चिमा उद्यान बंडगार्डन या तिन्ही ठिकाणी ४५ मीटर उंचीचा ध्वजस्तंभ उभारून त्यावर राष्ट्रीय ध्वज उभारण्याचे काम सुरू करण्यात आले असून सदर काम प्रगतीपथावर आहे.
- कोंढवा आणि संगमवाडी स्मशानभुमीमध्ये या ठिकाणी पर्यावरणपुरक एअर पोल्युशन कंट्रोल यंत्रणा उभारण्यात आली असून नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच वडगावशेरी येथील स्मशानभुमीमध्ये एअर पोल्युशन कंट्रोल यंत्रणा उभारण्याचे काम प्रगती पथावर आहे. या कामामुळे पुणे शहरातील वायु प्रदुषण कमी करण्यास मदत होणार आहे.
- पुणे मनपा हददीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावांमध्ये विविध रस्त्यांवर नव्याने प्रकाश व्यवस्था करण्याचे काम प्रगती पथावर असून या कामासाठी र.रू १.६ कोटी तरतूद उपलब्ध झालेली आहे.
- छत्रपती शिवाजी महाराज उद्यान वडगावशेरी या ठिकाणी ३२ आसन क्षमतेचे ७ डी थिएटर उभारून नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे.
- लुल्लानगर उडड्राण पुल येथील प्रकाश व्यवस्थेचे काम पूर्ण करणेत आले आहे.

### सन २०२०-२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- पुणे शहरातील पथ दिवे सक्षम व अद्ययावत करणेसाठी र.रू २.५ कोटी तरतूद करण्यात आली आहे.
- पुणे शहरातील नदीवरील पुलांवर आर्किटेक्चरल प्रकाश व्यवस्था करणे व सुशोभिकरण करणे या कामासाठी र.रू २.१७ कोटी तरतूद करण्यात आली आहे.
- पुणे शहरातील प्रकाश व्यवस्थेमध्ये EESL च्या माध्यमातुन नवीन पोलसाठी दिवे व शहरातील जुने वारंवार बंद पडणारे एलईडी दिवे बदलणे कामी र.रू १२ कोटी तरतूद करण्यात आली आहे.

- तुपे नाटयगृह हडपसर या ठिकाणी उर्वरित प्रकल्पीय कामे(एसी, साउंड सिस्टीम, स्टेज लाईटिंग, वायरिंग, आऊटडोअर लाईटिंग) याठी र.रू २ कोटी तरतूद करण्यात आली आहे.
- पुणे महानगरपालिका व क्षेत्रिय कार्यालय या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर ई-चार्जिंग स्टेशनची उभारणी करणे यासाठी EESL च्या बरोबर करारनामा करण्यात येत असून लवकरच सदर कामाची सुरवात करण्यात येणार आहे. मिनिस्ट्री ऑफ पॉवर यांचे PSU एनर्जी इफिसिअन्सी सर्व्हीसेस लि. (EESL) मार्फत इलेक्ट्रीक व्हेईकल्स् ६ वर्ष कालावधीकरीता घेण्यात येणार असून याकामी आवश्यक MOU (करार)करणेत येणार आहे. यामुळे इंधन बचत होणार असून प्रदुषण मुक्त पर्यावरण ठेवता येणार आहे.
- सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात यापुढे भवानीपेठ क्षेत्रिय कार्यालय व घोले रोड क्षेत्रिय कार्यालय हद्दीमध्ये संपुर्णपणे मे.टाटा प्रोजेक्टस मधील एलईडी दिवे बसवुन त्यांचेकडुन देखभाल दुरूस्ती केली जाईल.

## (१२) <u>अमृत अभियान व स्मार्ट सिटी, जनेराशपुअ वाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्प</u>

### सन २०१९-२०

- अमृत अभियान व स्मार्ट सिटी, ज.ने.रा.श.पु.अ.वाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्प, बीएसयुपी या योजने अंतर्गत करावयाच्या कामांसाठी सन २०१९-२० साठी आवश्यक तरतूद र.रु.१६८.८८ कोटी मंजूर आहे.
- ज.ने.रा.श.पु.अ. वाढीव कालावधीमध्ये मंजूर झालेले तसेच अमृत अभियानांमध्ये समावेश झालेल्या भामा आसखेड पाणी पुरवठा योजनेसाठीची तरतूद र.रु.८० कोटी व वडगाव बुद्रुक प्रकल्पासाठी र.रु.२ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त बीएसयुपी योजने अंतर्गत र.रु ५.२५ कोटी तरतूद केली आहे.
- अमृत अभियान अंतर्गत सुरु असलेल्या हरित क्षेत्र विकास प्रकल्पांसाठी र.रु.४.१० कोटी तरतूद करण्यात आली आहे व पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (24 X 7) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणे यासाठी अंदाजपत्रकात 'क' चा समावेश करण्यात आला आहे.
- स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांसाठी र.रु.५० कोटी मनपा समहिश्याची तरतूद अनुदान म्हणून करण्यात आली आहे.

### सन २०१९-२० मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नाविन्यपूर्ण योजना/प्रकल्प

- ज.ने.रा.श.पु.अ.अंतर्गत वाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्पातील भामा आसखेड या प्रकल्पाच्या प्राप्त निधीच्या चौथ्या हप्त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र पाठविण्यात आले आहे. सदर प्रकल्पाचे चारही हप्ते प्राप्त झाल्याने यापुढील काम पुणे महानगरपालिकेच्या तरतुदीतून पूर्ण केले जाईल.
- तसेच अमृत अभियानांतर्गत हरित क्षेत्र विकास प्रकल्प (२०१५-१६) या प्रकल्पा अंतर्गत हडपसर येथे कॅनॉल लगतच्या जागेमध्ये तारेचे कंपाऊंड करण्याचे काम पूर्ण झाले आहे. तसेच या जागेत वृक्षारोपणाकरिता विकास कामे करणे, प्रकल्पातील झाडांकरिता ठिबक सिंचन येथे सुशोभिकरण विषयक कामे पूर्ण करण्यात आली आहे. सदर प्रकल्प पूर्ण झालेला आहे.
- अमृत अभियानांतर्गत हरित क्षेत्र विकास प्रकल्प (२०१६-१७) या प्रकल्पा अंतर्गत शासनाकडून नवीन जागा बदल मान्य करुन घेतला असून, उरळी देवाची येथे वृक्षरोपणाचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यामध्ये साधारणपणे ९००० इतक्या वृक्षाच्या रोपाची लागवड झाली आहे.

### सन २०२०-२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- अमृत अभियान व स्मार्ट सिटी, ज.ने.रा.श.पु.अ.वाढीव कालावधीमधील प्रकल्प, बीएसयुपी या योजने अंतर्गत करावयाच्या कामांसाठी सन २०२०-२१ साठी एकुण आवश्यक तरतूद र.रु.१२२.७० कोटी प्रस्तावित आहे. या व्यतिरिक्त पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४ X ७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणेसाठी पाणीपुरवठा विभागाच्या अंदाजपत्रक 'क' अंतर्गत र.रु.६० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत पुणे मनपाचा हिस्सा र.रु.५० कोटी इतकी तरतूद अनुदान म्हणून प्रस्तावित आहे.

### सन २०२०-२१ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना-

- ज.ने.रा.श.पु.अ. अंतर्गत वाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्पातील भामा आसखेड या प्रकल्पाच्या सद्यस्थितीत संपूर्ण प्रकल्पाची भौतिक प्रगती सुमारे ८५% असून सदर प्रकल्प पूर्ण करण्याची सुधारित दिनांक ३१ मे २०२० अपेक्षित आहे.
- अमृत अभियान अंतर्गत पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना(२४ X ७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणे हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

## (१३) भवन रचना(भांडवली तरतूद र. रु.१९४ कोटी + महसूली तरतूद र.रु. ३७.७८ कोटी = र.रु. २३१.७८ कोटी)

### सन २०१९-२० चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- शिवाजीनगर येथे डॉ.होमी भाभा हॉस्पिटल पाडून नव्याने विकसित करणेत येणार आहे.
- बावधन येथे नवीन फायर स्टेशन व ट्रेनिंग सेंटर उभारण्यात येत आहे.
- हडपसर येथील फायर स्टेशनचे काम पूर्ण करणेत येत आहे.
- सिंहगड किल्ल्यावरील स्वराज्य निष्ठ शिल्पाची उभारणीचे कामे करणेत येत आहेत.
- बाणेर येथे आर.के.लक्ष्मण यांच्या नावाने कलादालन उभारणेत येत आहे.
- येरवडा येथील रामभाऊ मोझे शाळेची धोकादायक इमारत पाडून नव्याने बांधणेत येणार आहे.
- नानावाडा येथील फ्रिडम फायटर म्युझियमसाठी विविध क्रांतिकारकांची दालने उभारणेची कामे पूर्ण करणेत येत आहे.

### सन २०१९-२० मधील महत्वाच्या पूर्णत्वास / सुरू असलेले प्रकल्प

- कोथरुड येथे शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे कलामंदिराचे उर्वरित काम करणेत येत आहे.
- हडपसर येथे राजर्षी शाहु संकुलामधील कै.विठ्ठलराव तुपे नाटयगृहाचे काम पूर्ण करणेत येत आहे.
- नगर रोड येथील क्षेत्रिय कार्यालयाची इमारत पूर्ण करणेत येणार आहे.
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय, लक्ष्मीनगर येथील नवीन इमारतीचे काम पूर्ण करणेत येणार आहे.
- घोरपडे पेठ येथे महात्मा गांधी शाळेची जुनी इमारत पाडुन नवीन इमारत बांधणेत येत आहे.

**सन २०२०-२१चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- कोथरुड येथे नवीन बालनाट्यगृह उभारणे/यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाचे विस्तारीकरण करणेचे कामे पूर्ण करणेत येणार आहे. (पोडीयम पार्किंग)
- कळस धानोरी, मुंजाबावस्ती येथील ई लर्निंग स्कूलचे कामे, कर्वेनगर येथील सम्राट अशोक शाळा येथे नवीन इमारतीचे काम, वारजे येथे मॅटर्निटी होम हॉस्पिटल बांधणे, महमंदवाडी कौसरबाग येथील उर्वरित भाजी मंडईचे काम, वैकुंठ स्मशानभुमी विद्युतदाहिनी परिसर येथे हॉल बांधणे व नवीन दशक्रिया विधी घाट परिसर विकसित करणे, बिबवेवाडी, म्युनिसिपल पर्पजसाठी आरक्षित जागेवर अद्ययावत प्रसुतिगृह व आरोग्य केंद्र उभारणे, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयासाठी नवीन इमारत उभारणे, बावधन येथे नवीन फायर स्टेशन व ट्रेनिंग सेंटर उभारणेचे कामे व हडपसर येथे सांस्कृतिक (मल्टीपर्पज) हॉलचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

**सन २०२०-२१ मधील प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना**

- कोथरूड येथे शिवसृष्टी उभारणेत येणार आहे.
- घोले रोड येथे नगर वाचनालय (सिटी लायब्ररी) बांधण्याचे नियोजन आहे.
- कोथरूड येथे एक्झिबिशन सेंटरची उभारणी करणे व त्याअंतर्गत ग.दि.माडगुळकर यांचे स्मारकाचे समावेश करणेत आला आहे.
- बालगंधर्व रंगमंदिर पुर्ननिर्माण करणेत येणार आहे.
- पुणे मनपाच्या कर्मचाऱ्यांचे राहणीमान सुधारणेचे अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या वसाहतींचे पुर्ननिर्माण करणेचे अभियान हाती घेणेत येणार आहे.
- बाणेर स.नं. ११४+११५ येथे नोकरी करणाऱ्या महिलांसाठी हॉस्टेल बांधणेत येणार आहे.
- अण्णासाहेब मगर दवाखान्यासाठी जुनी इमारत पाडुन नवीन अद्यावत हॉस्पीटल इमारत बांधणेचे काम करणेत येणार आहे.
- बाणेर स.नं.८८ येथे आदिवासी / मागासवर्गीय विद्यार्थीनी, महिलांकरीता निवासी प्रशिक्षण केंद्र बांधणे.

## (१४) <u>माहिती व तंत्रज्ञान (र. रू.३२.९० कोटी)</u>

### सन २०१९-२०

- **PMC CARE 2.0 -** पुणे महानगरपालिकेमार्फत नागरिकांच्या सुविधेसाठी PMC CARE (Citizen Assistance Response Engagement) हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. मनपाच्या सर्व विविध खात्यांची संगणक प्रणाली, तक्रार निवारण, महानगरपालिकेमार्फत सर्व सेवा सुविधा एकाच प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन २,२९,२४० एवढया तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारीबाबत एकुण २२५८५८ (९८%) एवढ्या तक्रारींचे निवारण करण्यात आले. PMCCARE प्रणालीमध्ये विविध Digital Channels व्दारे वेबसाईट (Mobile App, सोशल मिडिया, संगणकप्रणाली व्दारे) नागरिक तक्रारी, माहिती ई-मेलद्वारे देवाणघेवाण करून शकतात.
- **Enterprise Dashboard -** पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांची माहिती अद्ययावत करून सदरची माहिती Online Dashboard च्या माध्यमातून विकसित करून त्याबाबत Centralised Platform तयार करण्यात आला आहे. त्यास सर्व संगणक कार्यप्रणाली Integrated करण्यात आली आहे. सदरच्या वर्षात Dashboard चे प्लॅटफॉर्मसचे अद्यावतीकरण करण्यात आले व विविध खात्यांची माहिती एकत्रित स्वरूपात

एकाचवेळेस सर्व खातेप्रमुखांना पाहता येईल अशा स्वरूपात सेंट्रलाईज करण्यात आली. Dashbord संगणकप्रणालीचा वापर प्रशासकीय कामकाजामध्ये आयुक्तांच्या व खातेप्रमुखांची दरमहा बैठकीमध्ये प्रभावी वापर करून प्रशासकीय कामकाजामध्ये सुसूत्रता व गतिमानता आणण्याकरिता उपयुक्त ठरली. तसेच, Revenue Dashboard चा प्रभावी वापर करून मनपाच्या उत्पन्न वाढीकरिता प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे.

- **Network Infrastructure Upgradation -** पुणे मनपातील विविध विभागांमार्फत ऑनलाईन संगणक प्रणाली व माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापराच्या अनुषंगाने पुणे मनपा मुख्य इमारतीमधील सर्व विभाग, विविध क्षेत्रिय कार्यालये व संपर्क कार्यालयांमधील नेटवर्क हार्डवेअरचे अपग्रेडेशन करण्यात आले. याबाबत सर्व क्षेत्रिय कार्यालयांमध्ये Network Infrastructure Upgradation अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत संगणकीय साहित्य पुरविण्यात आलेली आहे व त्याचे Installation करुन कामकाजाची प्रक्रिया निरंतर चालू आहे.

- **Bandwith Upgradation** – पुणे मनपातील सर्वच विभागातील संगणकीकरण वाढल्याने १०० Mbps इंटरनेट लीजलाईनची बँडविथ घेणेत आली. विविध क्षेत्रिय कार्यालयातील तत्परतेने संगणक प्रणालीचा वापर वाढत असल्याने सर्व क्षेत्रिय कार्यालयांना १० Mbps upgrade Bandwith Upgrade करण्यात आले.

- **DBT (Direct Benefit Transfer) -** पुणे महानगरपालिकेच्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभधारकांना मिळणारा लाभ थेट बँकेत जमा करण्यासाठी लाभाचे थेट हस्तांतरण विकसित करणेत आलेली असून, त्यामध्ये विविध योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला व तसेच पुणे मनपातील सेवकांना विविध योजनांचा लाभ घेण्याकरिता संगणकप्रणालीचे विकसन, देखभाल दुरूस्ती व अद्यावतीकरण करणेत आले आहे. सदर मनपाच्या नागरीकार्याभिमुख योजना इयत्ता १० व १२ वी ऑनलाईन स्कॉलरशिप, सी.एन.जी., रिक्षा अनुदान, समाज विकास विभागाच्या सर्व योजनांची एकाच संगणकीय प्रणालीव्दारे एकत्रितरित्या अंमलबजावणी करण्यात आली आहे.

- **Social Media Promotion -** मनपाच्या सर्व विभागाच्या नागरिकाभिमुख माहिती मनपाचे संकेतस्थळ, सोशल मिडिया, वॉटस अॅप, फेसबुकव्दारे, Twitter व्दारे प्रसिध्द करण्यात आली. यामध्ये मनपाच्या संकेतस्थळास एकुण १३,०४,८५६ क्लिक्स, प्राप्त झाले आहे. तसेच सोशल मिडीयाच्या माध्यमातुन एकुण १,१७४ पोस्टस/ अपडेटस ६०,७२,१७३ नागरिकांपर्यंत पोहचविण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावरून नागरिकांपर्यंत माहिती पोहचविण्यास डिजीटल माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात आला. तसेच विविध विभागातील योजनांची, कार्यक्रमांची, विविध खात्यांच्या राबविण्यात येणाऱ्या मोहिम याबाबतच्या माहितीची जागरूकता करून देण्यात आले आहे. नागरिकांचा सोशल मिडीया प्लॅटफार्मचा वापर करून त्याबाबतच्या प्रतिक्रिया घेण्यात येतात. त्यावर विविध विभागांव्दारे प्रशासकीय कामकाजात सुधारणा करणेत येते. सन २०२०-२१ साठीही **Social Media Promotion** चे पुढे चालू ठेवण्यात येणार आहे.

- **PMC e- Learning -** पुणे महापालिकेतील मनपा शाळामध्ये मराठी, उर्दू व इंग्रजी या माध्यमातून इयत्ता १ ली ते १० वी तील विद्यार्थ्यांसाठी शासनाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना दृक-श्राव्य माध्यमातून (2D-3D Content) शिकविणेत येत आहे.

- **Digital Payment -** पुणे महानगरपालिकेतील विविध विभागांकडील संगणकप्रणालीसाठी Online Payment (Cashless Payment) सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

- **Enterprise GIS -** एकाच संगणकीय प्रणालीव्दारे एकत्रितरित्या अंमलबजावणी करण्यात आली. सदर संगणक प्रणालीमध्ये Tender Utility Module विकसित करून पुणे मनपाच्या विविध खात्याशी टेंडर सुविधा GIS map वरती मार्क करणेकरिता सुविधा देणेत आली आहे.

## सन २०२०–२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- पुणे महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने सन २०२०–२१ या वर्षातील प्रस्तावित कामे खालीलप्रमाणे :

- **नगरसचिव विभाग दस्तऐवज स्कॅनिंग –** पुणे महानगरपालिकेच्या नगरसचिव विभागाकडील सन १९५० पासूनचे सर्व जुने व महत्वाचे दस्त, नस्ती, नोंदी, अभिलेख, विविध समिती निर्णय इत्यादी महत्वाचे रेकॉर्ड स्कॅनिंग करून डिजीटल स्वरूपात जतन करणे व भविष्यातील गरजेप्रमाणे त्याचा वापर करणे प्रस्तावित आहे. याबाबतच्या निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.

- **Enterprise GIS** – पुणे महानगरपालिकेने विविध विभांगाकडून भौगोलिक माहिती एकत्रित करण्याचे कामकाज चालु आहे. Enterprise GIS या प्रकल्पांमार्फत नव्याने पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेले ११ गावांचे नकाशांची भौगोलिक माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच विविध विभांगाकडील निविदेव्दारे करण्यात येणाऱ्या कामकाजाची नोंद सदर प्रणालीमार्फत करणेत येत आहे.

- **Network Infrastructure Upgradation** - ऑनलाईन संगणक प्रणाली व माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापराच्या अनुषंगाने विविध क्षेत्रिय कार्यालये व संपर्क कार्यालयांमधील संगणकी हार्डवेअरचे अपग्रेडेशन करण्यात आले. याबाबत क्षेत्रिय कार्यालये व संपर्क कार्यालयांमध्ये Network Infrastructure Upgradation (Network operation Centre, LAN Network Access Points) अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित संगणकीय Installation ची प्रक्रिया चालू आहे.

- **Enterprise Cloud Managed Services for PMC**– पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांकरिता विविध संगणक प्रणाली कार्यरत असून सद्यस्थितीत माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात क्लॉउड तंत्रज्ञानाचा वापर मोठयाप्रमाणात करण्यात येत आहे. पुणे मनपाच्या भविष्यातील विविध विभागांच्या प्रकल्पांच्या गरजेनुसार व आवश्यकतेनुसार मे. महाराष्ट्र शासनाच्या क्लाऊड धोरण व निर्णयातील दरानुसार पुणे मनपाच्या भविष्यातील कमी अधिक गरजेनुसार क्लाऊड सर्व्हिस कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे.

- **Security Audit** - पुणे महानगरपालिकेतील विविध विभागांमार्फत नागरिकाभिमुख सेवासुविधा उपलब्ध करून देणेकरिता विविध ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित करणेत आलेल्या आहेत. सदर संगणक प्रणालींच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व प्रणालींचे त्रयस्थ संस्थेमार्फत सिक्युरिटी ऑडीट करणे प्रस्तावित आहे.

- **ERP Implementation Final Stage -** ERP (Enterprise Resource Planning) प्रकल्पांतर्गत पुणे महानगरपालिकेसाठी 1) Finanace Management 2) Material Management 3) Document Management वर काम करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्प अंतिम टप्यात असून अंमलबजावणीस सुरवात करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पा अंतर्गत Finanace System, Material Management , तसेच मुख्य लेखा व वित्त विभाग, मध्यवर्ती भांडार कार्यालय चे कामकाज हे ERP-SAP मध्ये करणे प्रस्तावित आहे.

- **Artificial Intelligence** - पुणे मनपाच्या विविध विभागामध्ये अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा Artificial Intelligence व Data Analytics चा प्रभावी वापर दैनंदिन प्रशासकीय कामकाजामध्ये व नागरिकाभिमुख सेवा सुविधा उपलब्ध करून देणेकरिता प्रस्तावित आहे.

- **Backup Solution** - पुणे महानगरपालिकेतील विविध विभागांमार्फत नागरिकाभिमुख सेवासुविधा उपलब्ध करून देणेकरिता विविध ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित करणेत आलेल्या आहेत. सदर संगणक प्रणालींची संगणकीय माहिती सुरक्षेच्या दृष्टीकोनातून जतन करणे गरजेचे व अत्यावश्यक असल्याने सद्यस्थितीत अस्तित्वात असलेला सर्व संगणक प्रणालींच्या डाटाचा बॅकअप घेण्याचे कामकाज सुरु असून Backup Solution कार्यरत ठेवणे प्रस्तावीत आहे.

- **Call Centre -** पुणे महानगरपालिकेतील विविध विभागातील विभागांमार्फत उपलब्ध नागरिकाभिमुख सेवासुविधा व त्याबाबत उद्‌भवणाऱ्या तक्रारींचे नियोजनबध्द पध्दतीने निपटारा करणेकामी तक्रार निवारण संगणक प्रणाली व Call Centre सुरु करण्यात आले आहे. पुणे शहराच्या नागरिकांना तक्रार नोंदविणेकामी कार्यालयात न येता तक्रारी नोंदविण्यासाठी पुणे मनपाचा टोल फ्री क्रमांक १८००१०३०२२२ उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर Call Centre मार्फत पुणे महानगरपालिकेकडे सन २०१९ मध्ये एकुण ७०४९४ वेळा तक्रारी नोंदविणेकरिता सदर टोल फ्री क्रमांकाचा वापर करण्यात आला आहे. सदर Call Centre चे कामकाज पुढे कार्यरत ठेवणे प्रस्तावित आहे.
- **Property Tax Software अद्ययावतीकरण -** पुणे महानगरपालिकेच्या कर आकारणी कर संकलन विभागामार्फत पुणे शहरातील मालमत्ता व मिळकतीविषयक कामकाज करण्यात येत असून पुणे महानगरपालिकेचे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असून सद्यस्थितीतील संगणक प्रणाली नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अद्यावतीकरण करणे अत्यंत महत्वाचे असल्याने सदर कामकाज करणे प्रस्तावित आहे.

## (१५) <u>हेरिटेज सेल</u>

### सन २०१९–२०

**सन २०१९–२० च्या दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती.**

- नानावाडा, विश्रामबागवाडा, महात्मा फुले मंडई येथे वारसा जतन व संवर्धनाची कामे सुरू आहेत.

**सन २०१९–२० मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नाविन्यपुर्ण योजना/प्रकल्पांची नावे**

- सिंहगड किल्ल्यावरील स्वराज्यनिष्ठ शिल्प व नरवीर तानाजी मालुसरे समाधीस्थळ सुशोभीकरणाचे व मेघडंबरीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर काम करताना नरवीर तानाजी मालुसरे यांची मूळ समाधी(झाकली गेलेली) दर्शनासाठी दिसणार आहे.
- नानावाडा येथील दर्शनी लाकूड बांधकामातील दरबार हॉलचे काम पूर्ण केले आहे.
- पुणे शहराचा हेरिटेज टुरिझम मास्टर प्लॅनचे काम पूर्णत्वास आले आहे.

### सन २०२०–२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती

- पुणे शहराचे ऐतिहासिक महत्व असलेल्या लालमहाल, शनिवारवाडा, नानावाडा, विश्रामबागवाडा, भिडे वाडा, महात्मा फुले मंडई इ. वास्तुंच्या जतन संवर्धनासाठी अंदाजपत्रकात तरतूद केली आहे.
- पर्वती पायथा येथे चित्रकला, शिल्पकला सराव व प्रात्यक्षिकांसाठी बैठक व्यवस्था करणे या कामासाठी अंदाजपत्रकात तरतूद केली आहे.
- पुणे पेठ शुक्रवार येथील आद्य क्रांतीकारक उमाजी नाईक स्मारक सुशोभीकरणासाठी अंदाजपत्रकात तरतूद करणेत आली आहे.

### सन २०२०–२१ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना

- नानावाडा येथे आद्य सशस्त्र क्रांतीकारक यांचे जीवनचरित्रावर आधारित म्युझियमच्या फेज–२ चे कामासाठी तरतूद केली आहे.
- मराठा शैलीमधील ऐतिहासिक लालमहालचे काम पूर्ण करण्यासाठी तरतूद केली आहे.
- सिंहगड किल्ल्यावरील नरवीर तानाजी मालुसरे समाधीस्थळ भोवतालच्या परिसरात पर्यटकांच्या सोयीसुविधा पुरविणेकरिता तरतूद केली आहे.

- पर्यटनवाढीसाठी विविध ब्रॉशर्स, पोस्टर्स, माहिती पुस्तिका तसेच ऐतिहासिक वास्तूमध्ये माहिती फलक, साईनेजेस यासाठी तरतूद करणेत आली आहे.
- वारसा संवर्धन आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी हेरिटेज वॉक, मिनी बस टूर हे उपक्रम सुरू करण्यात येतील.

## (१६) <u>शिक्षणासाठी आधुनिक सुविधा</u>
## <u>(प्राथमिक र. रू.३४५.१९ कोटी, माध्यमिक शिक्षण र. रू. ७२.६८ कोटी)</u>

### सन २०१९–२०

- प्राथमिक शिक्षण विभागाकडील सुमारे ९३,७८७ विदयार्थी /पालकांच्या बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजने अंतर्गत गणवेश, स्वेटर, दप्तरे, बुटमोजे, वहया, पाटया, चित्रकला साहित्य क्रिडानिकेतन व विद्यानिकेतन शाळांमधील साहित्य इत्यादींचे र.रु. १८.९७ कोटी जमा करण्यात आले आहेत.
- ई–लर्निंग – बी.एस.एन.एल. व पुणे महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व शाळांमध्ये ई– लर्निंग सुविधा पुरविण्यात आली आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षण विभागाच्या मध्यवर्ती कार्यालयात १ व्हर्च्युअल स्टुडिओ, ९१ व्हर्च्युअल क्लासरुम, ४९५ डिजिटल क्लासरुमचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उपरोक्त स्टुडिओमधून आदर्श पाठ तसेच ॲडॅप्टीव्ह लर्निंग मॅनेजमेंट, स्कुल मॅनेजमेंट सिस्टिम इ. संगणकीय प्रणालीचा पर्याप्त वापर करण्यात येतो.
- प्राथमिक शिक्षण विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धामध्ये प्रामुख्याने जिल्हास्तर क्रीडास्पर्धा, अंतिम लोकनृत्य स्पर्धा, आंतरशालेय क्रीडास्पर्धा, विभागीय क्रीडास्पर्धा, समुहगीत स्पर्धा, रंगभरण स्पर्धाचा समावेश होतो.
- मॉडेल ऑर्फ एक्सलंस स्कुल – प्राथमिक शिक्षण विभागाचे १० शाळांमध्ये मॉडेल ऑफ एक्सलंस स्कुल हा उपक्रम पुणे महानगरपालिका व पुणे सिटी कनेक्ट या संस्थेव्दारे सुरु करण्यात आला आहे. दिल्ली येथील शाळांची पाहणी केल्यानंतर एकुण ५ इमारतीतील १० शाळांमध्ये जीवन शिक्षण हा मुल्यशिक्षणावर व अध्ययन– अध्यापन प्रक्रियेवर आधारीत अभ्यासक्रम शिकविण्यात येतो. तसेच मैदाने विकसीत करुन विविध क्रीडा विषयक उपक्रम राबविणे, रोबोटिक लॅब, म्युझिक रुम, विद्यार्थी गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांची अध्यापन पध्दतीमधील क्षमता वाढ करण्यात आली आहे.
- विशेष मुलांची शाळा– पुणे महापालिकेची विशेष मुलांसाठीची शाळा क्र. १४ बी शिवाजीनगर येथे कार्यरत आहे. तेथे एकुण २२ विद्यार्थी शिकत आहेत. शाळेत येणारी मुले ही सेरेब्रल, अस्थिव्यंग, स्वमग्न व बहुविकलांग असल्याने त्यांच्या गरजा विशेष असतात. त्यांना वाहतुकीची सुविधा पुरविण्यात येते आहे.

### सन २०२०–२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- शिक्षकांना मार्गदर्शन करणेसाठी व संशोधनात्मक कार्य करणेसाठी गुणवत्ता कक्ष स्थापन करणे प्रस्तावित आहे. सहयोगी दलामधील शिक्षकांमार्फत्त गरजेनुसार शिक्षकांना प्रशिक्षण देणे, संशोधन करणे, विविध शैक्षणिक साहित्य तयार करणे अशा प्रकारच्या योजना प्रस्तावित करण्यात येत आहे.
- पुणे महापालिकेकडून चालविण्यात येणाऱ्या क्रिडानिकेतन शाळेतील विद्यार्थ्यांना अध्यापनाबरोबरच क्रिडाविषयक विशेष प्रशिक्षण देण्यात येते या विद्यार्थ्यांनी विविध क्रिडास्पर्धांमध्ये यश मिळविले आहे त्यांच्यासाठी अपघात विमा योजना सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.
- महापालिकेच्या प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या सवयी लागाव्यात यासाठी स्वच्छ शाळा स्पर्धांचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे.

## माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिका

## सन २०१९–२०

**पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांकडील विद्यार्थ्यांसाठी राबविलेले विशेष उपक्रम.**

- **मोफत पाठ्यपुस्तके** – पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी व पुणे महानगरपालिका हद्दीतील रात्रशाळेतील शिक्षण घेणा–या इ.९वी व १०वी च्या विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके बालभारती संस्थेकडून र.रु ४९,७५,५१२/– इतकी देण्यात आली.
- **मोफत गणवेश**– पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकडील इ. ५ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश मोफत देण्यात येतात. सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षात गणवेशा बाबतची कार्यवाही भांडार विभागाकडून करुन ११०९४ विद्यार्थ्यांना गणवेशाची र.रु. २,५८,५७,६११ इतकी रक्कम डी.बी.टी अंतर्गत त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे .
- **मोफत बसपास सुविधा –** पुणे महानगरपालिका हद्दीतील इ. ५ वी ते १०वी पर्यंतच्या शहर निवासी विद्यार्थी व विद्यार्थीनींना सन २०१५–१६ या शैक्षणिक वर्षात पास देताना पुणे महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना मोफत व इतर शाळांतील विद्यार्थ्यांना पास देताना त्यांच्याकडून २५ टक्के रक्कम घेवून उरलेली ७५ टक्के रक्कम पुणे महानगरपालिकेकडून पीएमपीएमएलला २०१९–२० अदा करण्याची कार्यवाही चालू आहे.
- **मोफत २१ अपेक्षित प्रश्न संच**– इ. १०वी च्या विद्यार्थ्यांना मोफत २१ अपेक्षित प्रश्नसंचाची रक्कम डी.बी.टी अंतर्गत खात्यावर जमा करणेबाबतची कार्यवाही चालू आहे.
- **शारदाबाई पवार शिष्यवृत्ती योजना** – पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील इ. १० वी व १२ वी च्या अनुक्रमे ज्या विद्यार्थ्यांना ८५% व ८०% पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना प्रत्येकी र.रु. ५१,०००/– दिले जातात. या वर्षी पुणे महानगरपालिका संचलित शाळांकडील इ. १० वी व १२ वी चे १०६ विद्यार्थ्यांना र.रु. ५४,०६,०००/– इतक्या शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला.
- कला व क्रिडा स्पर्धा, विज्ञान भूगोल प्रदर्शन, छात्रसेना (स्काऊट), स्नेहसंमेलन व इ. १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ यांचे आयोजन शाळा पातळीवर करण्यात येत आहे.
- **NSQF(National Skill Qualification Framework)** अंतर्गत पुणे महानगरपालिका संचलित १७ माध्यमिक विद्यालयांमध्ये सन २०१४–१५ मध्ये सदरची योजना इ. ९वी साठी लेन्ड अ हॅन्ड इंडिया व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान याच्या सहकार्याने सुरू करण्यात आली असून सध्या २०१९–२० मध्ये इ. ९वी ते १२ वी माध्यमिक शाळांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय शिक्षण शिकवले जात आहे. सदरच्या योजने मध्ये एकुण १९५९ विद्यार्थी व्यवसाय शिक्षण घेत आहेत.
- **E-Learning Initiative** –

  पुणे मनपा संचलित सर्व माध्यमाच्या एकुण २६५ प्राथमिक शाळा १४४ इमारतींमधून कार्यरत आहेत. या शाळांमधून सर्वसामान्य घटकांतील बालकांना इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे ई–लर्निंगच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षण दिले जात आहे. या प्रकल्पा अंतर्गत एकुण १६५ शाळांमध्ये ४८२ डिजिटल क्लासरुम व ८९ व्हर्च्युअल क्लासरुम सुरू करण्यात आले आहेत. तसेच सेंट्रलाईज स्ट्युडिओच्या माध्यमातून तज्ञ व अनुभवी शिक्षणकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दिले जात आहे.

- **सॅनिटरी नॅपकीन –** घनकचरा विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडून ३,८६,११२ नग सॅनिटरी नॅपकीन र.रु १७,०२,७५३.९२/-प्राथमिक व माध्यमिकच्या विद्यार्थ्यींनींना पुरवली आहेत.
- **१० वी च्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व्याख्यानमाला** – माध्यमिक विभागाकडील इ. १० वीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासाचे तंत्र, परिक्षा पध्दती व करिअर निवड बाबत मार्गदर्शनपर व्याख्यानमालाच्या आयोजनाची कार्यवाही सुरु आहे.
- **सी.सी.टी.व्ही. कॅमेरा –** माध्यमिक शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरो बसविण्याची कार्यवाही सुरु आहे.
- **सी.एस.आर अंतर्गत उपक्रम –**

**अ.** स्टेप-अप फाऊंडेशनच्यावतीने विविध शाळांमध्ये जीवनमूल्य शिक्षण (समुपदेशन) प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

**ब.** सलाम बॉम्बे फाऊंडेशनच्यावतीने व्यवसायभिमुख कौशल्य प्रशिक्षण व तंबाखु मुक्त शाळा उपक्रम राबविण्यात येत आहेत.

**क.** विज्ञान आश्रम, मेंटर टुगेदर, अगस्त्था फाऊंडेशन, स्त्री मुक्त संघटना इ. संस्थाच्या मार्फत विज्ञान व समुपदेशन विषयक विविध उपक्रम राबविण्यात येते आहेत.

**ड.** सामाजिक आर्थिक विकास संस्था यांच्यावतीने विज्ञान व प्रकल्प सादरीकरण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

### सन २०२०–२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- सन २०१९–२० मध्ये राबविण्यात आलेल्या मोफत पाठयपुस्तके व गणवेश, मोफत बस पास सुविधा, मोफत २१ अपेक्षित प्रश्नसंच, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती योजना, NSQF (National Skill Qualification Framework) योजना, सॅनिटरी नॅपकिन, इ. ११ वी व १२ वी द्विलक्षी अभ्यासक्रम, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, सी.एस.आर. अंतर्गत उपक्रम सन २०२०–२१ मध्येही प्रभावीपणे राबविण्यात येतील व त्याकरीता अधिक सुधारणा व सुसूत्रता करण्यात येणार आहे. तसेच NSQF (National Skill Qualification Framework) व राज्य शासनाचे उदिष्टानुसार 'Model ITI' प्रमाणे पुणे महानगरपालिका संचलित श्री छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) चे अद्यावतीकरण व नुतनीकरण करण्यात येणार आहे.

## (१७) सामान्य प्रशासन

### सन २०१९–२०

- **e-Worksheet द्वारे कर्मचाऱ्यांचे कामकाजाचे सनियंत्रण व प्रकरणांचा जलद निपटारा**

पुणे महानगरपालिकेत दाखल होणारे विविध प्रस्ताव, प्रकरणे, अर्ज कागदपत्रे इत्यादीवर विहित मुदतीत कार्यवाही होते अगर नाही, प्रकरण सध्या कोणत्या स्तरावर आहे, कोणाकडे प्रलंबित आहे, प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे? इ. माहिती ऑनलाईन एका क्लीकव्दारे कळण्यासाठी व अशा स्वरुपाच्या कार्यवाहीतून नागरिकांच्या कामाचा निपटारा जलदगतीने व विहित मुदतीत होण्यासाठी पुणे महानगरपालिकेत गतवर्षीपासून "File Tracking System" कार्यान्वित करण्यात आली आहे.

चालू आर्थिक वर्षापासून ऑनलाईन आवक झालेली प्रकरणे त्याचे कामकाज पाहणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडे ऑनलाईन पाठवण्याची सुविधा File Tracking System मध्ये करण्यात आली आहे. संबंधित अधिकारी यांनी त्या प्रकरणावर कार्यवाही पूर्ण करून त्याची नोंद या सिस्टिम मध्ये करावयाची आहे. अशा प्रकारे प्रत्येक कर्मचाऱ्याची e worksheet तयार होऊन प्रत्येक खातेप्रमुखास सिस्टिमच्या डॅशबोर्ड वर जाऊन कोणत्या कर्मचाऱ्याकडे किती प्रकरणे प्रलंबित आहेत हे केव्हाही तपासणे शक्य झाले असल्याने कर्मचाऱ्याच्या कामकाजावर सनियंत्रण ठेवून जलदगतीने प्रकरणांचा निपटारा करणे शक्य झाले आहे.

- **लेखनिकी संवर्गातील ५० वर्ष वयाच्या आतील कर्मचाऱ्यांसाठी एमएससीआयटी व टायपिंगचे प्रशिक्षण**

  लेखनिकी संवर्गातील कर्मचाऱ्यांना संगणकावर करावयाची कामे व टंकलेखनाचे काम करणे अनिवार्य असते. तथापि, जे कर्मचारी एमएससीआयटी व टायपिंगची परिक्षा उत्तीर्ण नाहीत, ज्यांना संगणकाचे व टायपिंगचे काम करण्यात अडचणी येतात अशा कर्मचाऱ्यांना या कामाची आवड निर्माण करण्याकरिता म.न.पा प्रशिक्षण प्रबोधिनीच्या व समाज विकास विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून समाज विकास विभागामार्फत प्रशिक्षण देण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या योजनेमुळे संगणकावर व टायपिंगचे कामासाठी जास्तीत जास्त सेवकवर्ग उपलब्ध होऊन खात्याचे कामकाज वेळेत व अचूकपणे करणे शक्य होणार आहे. पहिल्या टप्प्यात मार्च २०१० अखेर १४ कर्मचाऱ्यांना यांना एमएससीआयटीचे प्रशिक्षण व ३५ कर्मचाऱ्यांना टायपिंगचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

- **आपले सरकार या तक्रार निवारण प्रणालीवर दाखल होणाऱ्या तक्रारींचा निपटारा**

  आपले सरकार पोर्टलवर प्राप्त झालेल्या ९९३४ तक्रारींपैकी ९८२९ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. प्रलंबित तक्रारींची संख्या १% आहे.

- **पी.जी.पोर्टल या तक्रार निवारण प्रणालीवर दाखल होणाऱ्या तक्रारींचा निपटारा**

  तसेच पी.जी.पोर्टलवर प्राप्त झालेल्या १२१५ तक्रारींपैकी ११७६ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. प्रलंबित तक्रारींची संख्या १% आहे.

- **कर्मचारी प्रशिक्षण**

  मतदान जनजागृती या विषयावर पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यासाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. तसेच अर्थसाक्षरता विषयक संवाद प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. राज्य प्रशिक्षण धोरणा अंतर्गत अनुकंपा व वारसहक्क (वर्ग-३) कर्मचाऱ्यांसाठी १२ दिवसीय प्रशिक्षण यशदा मार्फत आयोजित करण्यात आले होते. यात १०५ सेवकांना ३ टप्यांमध्ये प्रशिक्षण देण्यात आले. माहिती अधिकार या विषयांवरील उजळणी प्रशिक्षण मा. राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ व एन.जी.ओ. व आर.टी.आय तज्ञ यांचे मार्फत घेण्यात आले आहे. महिलांना दैनंदिन कामकाजात इंटरनेटचा वापर सुरक्षित करता यावा यासाठी "Cyber Crime Awareness for Women" या विषयावर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. एकुण ११४१ अधिकारी /कर्मचाऱ्यांना विविध विषयांवरील प्रशिक्षण चालू वर्षात देण्यात आले आहे. प्रशासन अधिकारी, अधीक्षक , उपअधिक्षक , वरिष्ठ लिपिक व लिपिक टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी सेवानिवृत्त वेतन, घाणभत्ता वारस व अनुकंपा नियुक्ती प्रकरण, सतत ५ वर्षे गैरहजेरी, इंडेमनिटी बॉंड प्रकरणे, १२/२४ वर्षे कालबध्द पदोन्नती इ. विविध विषयावर प्रशिक्षण देण्याचे नियोजन आयोजित करण्यात आले आहे. यामुळे लेखनिक कर्मचाऱ्यांचे दैनंदिन कामकाज सुलभतेने व बिनचुक करणेस मदत होणार आहे.

- **HRMS प्रणालीमुळे उपलब्ध e Service Book माध्यमाने कोणत्याही कर्मचाऱ्यांचे संपूर्ण रेकॉर्ड एका क्लिकद्वारे उपलब्ध**

  HRMS प्रणालीमुळे अधिकारी/कर्मचारी यांचे सेवा तपशिलामध्ये वेळोवेळी होणारे बदल (वार्षिक वेतनवाढ, कालबध्द पदोन्नती, प्रत्यक्ष पदोन्नती, शैक्षणिक पात्रतेमधील बदल (Educational up gradation), विभागीय चौकशी, शास्ती, निलंबन, गोपनीय अहवाल/मालमता विवरणपत्र defaulters, परदेश दौरा इत्यादी ) इ. माहिती वेळोवेळी अद्ययावत केली जाणार असल्याने तसेच त्यांचे शैक्षणिक व मनपा सेवेसाठी अन्य आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याचे काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुणे मनपा मध्ये कार्यरत १५८३५ सेवकांपैकी १५६७६ सेवकांची नोंदी झालेल्या आहेत. या प्रणालीमुळे कोणत्याही सेवकाचे सर्व्हिस रेकॉर्ड व कागदपत्रे एका क्लिकव्दारे संबंधित खातेप्रमुखांना पाहता येणार आहे. त्यामुळे सेवकांची बदली करताना, बढती देताना तसेच प्रशासकीय कार्यवाही अथवा शास्ती करावयाची असल्यास निर्णय प्रक्रिया सुलभ होणार आहे.

**सन २०२० –२१**

- **मनपा प्रशासनातील विविध खात्यातील कर्मचाऱ्यांची कामाचे स्वरूपानुसार TNA (प्रशिक्षण गरजेचे विश्लेषण)**

  कर्मचाऱ्यांना सोपविलेल्या कामकाजात व कर्तव्य पार पाडण्यात सक्षम बनविणे या माध्यमातून गतिमान व सक्षम प्रशासन निर्माण करण्याकरिता प्रत्येक 'अ' ते 'ड' संवर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्याला त्याचे कर्तव्यनिहाय प्रशिक्षण देण्याकरिता प्रत्येक अधिकारी/कर्मचारी त्यांच्या विभागात कोणत्या स्वरूपाचे काम करतो, त्यास कोणती जबाबदारी सोपविण्यात आली आहे याबाबतची माहिती संकलित करून त्यांचे Training Need Analysis करून कोणत्या विषयावर प्रशिक्षण देणे आवश्यक आहे याबाबत निश्चिती करून प्रशिक्षण कार्यक्रम (Training Calendar) राबविण्यात येणार आहे.

- **सफाई कर्मचारी नेमणूकीकरिता** Online System **चा वापर सुरु करणे**

  पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील घाणभत्ता अनुज्ञेय असणारे शेडयुलमान्य पदावरील सफाई सेवकांचे निवृत्त/ सेवेत/ शारिरीक अपात्र असताना मयत इ. कारणास्तव रिक्त झालेल्या जागी त्यांचे एका पात्र वारसास मा. लाड / पागे कमिटीच्या शिफारशी व मे. शासनाने वेळोवेळी निर्गमित आदेशानुसा कार्यवाही करण्यात येते. अशा सेवकांच्या वारसांची अर्जाची साठीचे कागदपत्र व संमतीपत्र चार्ट तयार केला असून प्रत्येक क्षेत्रिय कार्यालय पाठविते. त्यामुळे नियुक्तीस लागणारा वेळ कमी होणार असून त्यामध्ये पारदर्शकता व सुसूत्रता निर्माण होईल.

## (१८) <u>आपत्ती व्यवस्थापन विभाग</u>

**सन २०१९–२०**

- सन २०१९-२० या वर्षाकरीता आपत्ती व्यवस्थापन विभागासाठी एकुण र.रु.१६.१० कोटी इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आली होती. सदर तरतुदीतुन क्विक रिस्पॉन्स टिम व व्हेईकल ज्यामध्ये सर्च अ‍ॅन्ड रेस्क्यु करणाऱ्या यंत्रणे बरोबर, कम्युनिकेशन व प्रथोमपचार उपलब्ध असणारी यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली होती. क्विक रिस्पॉन्स टिम व व्हेईकलचा वापर रस्ते अपघात, इमारत कोसळणे आगीमध्ये सापडलेल्या व्यक्तीची सुटका करणे, सर्च अ‍ॅन्ड रेस्क्युमधील अडथळे दूर करणे, जखमी व्यक्तीचे स्थलांतर करणे इ. साठी क्किक रिस्पॉन्स टिम व व्हेईकलचा उपयोग होत आहे. आगीच्या ठिकाणी आग विझविण्याकरीता आवश्यक असणारे मदत कार्य व व्यक्तिंना सुखरुप बाहेर काढण्याकरीता आवश्यक असणारे सर्च अ‍ॅन्ड रेस्क्यु ऑपरेशन याकरीताची साधणे सदर वाहनामध्ये उपलब्ध असल्याने घटनेतील व्यक्तिला तात्काळ बचावासाठी मदत मिळत आहे. याकरीता सदर रक्कमेचा विनियोग करण्यात आला आहे.

- प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्रा अंतर्गत पुणे व सातारा जिल्ह्यातील नगरपरिषदातील, पुणे महापालिकेच्या महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभागातील सेवकांना आपत्ती व्यवस्थापनाचे निवासी प्रशिक्षण नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स, तळेगाव, पुणे येथे परिपूर्ण आपत्ती व्यवस्थापनाचे सेवकांना प्रशिक्षण देणेकरीता सदर संस्थेची मदत घेण्यात येत आहे.
- पुणे व सातारा जिल्ह्यातील नगरपालिकांकरीता प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र, मुख्य इमारत, पुणे महानगरपलिका येथे स्थापन करण्यात आले आहे. पुणे मनपा 'मुख्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष' व 'प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र' २४ X ७ तास सुरु करण्यात आले असून सदर केंद्रामध्ये सेवकांची २४ तास नेमणुक करण्यात आलेली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत पुणे मनपाचे विविध विभाग/खाते कर्मचारी यांचे करीता जनजागृती प्रशिक्षण व क्षमता बांधणी व आराखडा तयार करणेचे काम करण्यात येते.

### सन २०२०–२१

- आपत्ती व्यवस्थापन विभागासाठी सदर तरतुदीतुन क्विक रिस्पॉन्स टिम व व्हेईकल ज्यामध्ये सर्च ॲन्ड रेस्क्यु करणारी यंत्रणे बरोबर, कम्युनिकेशन व प्रथोमपचार अशी यंत्रणा उपलब्ध असणारी यंत्र सामुग्री खरेदी करण्यात आल्या होत्या. सदर खरेदी करण्यात आलेल्या यंत्रणेचा ऑपरेशन व मेंटेनंन्स आणि संचालनाकरीता र.रु.८ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.
- नैसर्गिक आपत्तीग्रस्त व अपघातग्रस्तांना तातडीच्या खर्चासाठी मदत र. रू.१.५० कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.

## (१९) <u>समाज विकास</u>

### सन २०१९–२०

- समाज विकास विभागामार्फत विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करणेत येते. या करीता सन २०१९–२०२० चे अर्थसंकल्पात र.रू. १०४.४८ कोटी तरतूद करणेत आली आहे.

**सन २०१९–२०२० मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नाविन्यपूर्ण योजना/प्रकल्पांची नावे ठळक बाबी**

- पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत दारिद्रय रेषेखालील व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी खालीलप्रमाणे योजना राबविणेत येतात.
- केंद्र व राज्य शासनाची दीनदयाल अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान योजना दारिद्रय रेषेखालील कुटुंबासाठी सन २०१४ पासून राबविणेत येत आहे. या योजनां करीता शासनाकडून निधी प्राप्त होतो. या व्यतिरिक्त मनपा अर्थसंकेल्पातील बांधील खर्च वजा जाता ५% रक्कम महिला बाल कल्याण, ५% रक्कम मागासवर्गीयांसाठी व ५% रक्कम दिव्यांगांसाठी राखून ठेवली जाते. खात्यामार्फत महिला बाल कल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, युवक कल्याणकारी योजना, दिव्यांग कल्याणकारी योजना इ. योजना राबविल्या जातात.
- **स्वयंरोजगार उपक्रम –** व्यवसाय प्रशिक्षण, उद्योजकता विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगारासाठी अनुदान
- केंद्र व राज्य शासनाची दीनदयाल अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी, क्षमता बांधणी व प्रशिक्षण, कौशल्य प्रशिक्षणाद्वारे स्वयंरोजगार व नोकऱ्यांची उपलब्धता, स्वयंरोजगार कार्यक्रम, फेरीवाल्यांना सहाय्य, शहरी बेघरांना निवारा योजना शासनाच्या निधीतून राबविल्या जातात. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामध्ये नागरिकांसाठी सेवा केंद्र, बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तु विक्री करीता आधार केंद्र, पुणे महानगर समाज विकास संस्था यांचा समावेश आहे.

- **बचत गटांसाठी योजना –** शहर पातळीवर सुमारे ८५७७ बचत गट कार्यरत असून बचत गट स्थापनेसाठी महिलांना प्रशिक्षण, फिरता निधी, बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंसाठी प्रदर्शन व विक्री करीता अर्थसहाय्य, स्वस्त धान्याची दुकाने देणे, तसेच मनपाच्या प्राथमिक शाळेतील सुमारे ७०००० विद्यार्थ्यांना शासनाच्या मध्यान्ह भोजन योजना अंतर्गत मध्यान्ह भोजन व बालवाडीतील १२००० मुलांना बचत गटांच्या माध्यमातून शालेय पोषण आहार दिला जातो.
- **महिलांसाठी योजना –** विधवा महिलांना अनुदान, महिलांना कुटुंब नियोजनासाठी प्रोत्साहन, महिला सबलीकरण केंद्र, महिला/युवती यांना स्वसंरक्षण प्रशिक्षण, मुलगी दत्तक योजना, पाळणाघर, वस्तीपातळीवरील विविध प्रशिक्षण वर्ग व अनुदान, महिलांसाठी योगासन वर्ग इ. योजना राबविण्यात येतात.
- **विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना –** इ. १० वी व इ. १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी खाजगी क्लास फी अर्थसहाय्य, सीईटी क्लास फी अर्थसहाय्य, उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल करीता अर्थसहाय्य, कमवा व शिका योजना, इ. १० वी व इ. १२ वी मध्ये ८०% अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अर्थसहाय्य, स्पोकन इंग्लिश वर्ग, अभ्यासिका, ग्रंथालय, घाणभत्ता मिळणाऱ्या मनपा सेवकांच्या मुलांना अर्थसहाय्य, पुणे महानगरपालिका हद्दीतील कचरा वेचक व बायोगॅस प्रकल्पावर काम करणारे तसेच कचऱ्याच्या संबंधित काम करणाऱ्या सर्व असंघटीत कष्टकरी कामगारांच्या मुलांना शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य, स्पर्धा परिक्षा केंद्र, मनपाच्या माध्यमिक प्रशालेतील मुलांना शैक्षणिक साहित्य इ. उपक्रम राबविले जातात.
- **भौतिक सुविधा उपक्रम –**झोपडपट्टीमध्ये वैयक्तिक शौचालय बांधणे, झोपडी दुरूस्ती, वीज कनेक्शन, नळ कनेक्शन इ. करीता मागासवर्गीय यांना अर्थसहाय्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहातील ४०० विद्यार्थ्यांचा भोजनाचा खर्च दिला जातो.
- **सामाजिक उपक्रम –** वृद्धांसाठी विरंगुळा केंद्र, व्यसनमुक्तीसाठी अर्थसहाय्य, रस्त्यावरील मुलांसाठी घरटं प्रकल्प, रात्र निवारा प्रकल्प, बाल विकास केंद्र इ. उपक्रम राबविण्यात येतात.
- **दिव्यांग कल्याणकारी योजना –** दिव्यांगाना मोफत पीएमपीएमएल बसपास, कृत्रिम अवयव घेणे, स्वयंरोजगार, उच्च शिक्षण, प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य, महापालिका क्षेत्रातील १८ वर्षापुढील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणाऱ्या महापालिका हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थसहाय्य, कुष्ठरोग पिडीत व १००% अतितीव्र अपंग (निःसमर्थ) व्यक्तीकरिता वार्षिक अर्थसहाय्य दिले जाते.
- पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने पुणे शहरात औंध, येरवडा, हडपसर, वारजे, सावित्रीबाई फुले स्मारक भवानी पेठ, बिबवेवाडी या ठिकाणी लाईट हाऊस प्रकल्प सुरू आहेत.
- प्रत्येक घरामध्ये एक व्यक्ती डिजीटल साक्षर व्हावा या उद्देशाने पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने पुणे शहरात विविध ठिकाणी डिजीटल लिटरसी सेंटर सुरू आहेत.

## सन २०२०–२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक –

- MPSC, UPSC पूर्व परिक्षेत उत्तीर्ण होऊन मुख्य परिक्षेला पात्र होणाऱ्या गुणानुक्रमे प्रत्येकी १०० विद्यार्थ्यांना पुस्तके खरेदीसाठी अर्थसहाय्य करणे.
- खादी ग्रामोद्योग आयोगाच्या नोडल एजन्सी असणाऱ्या राष्ट्रीय कुंभारी प्रशिक्षण संस्थेबरोबर स्वयंरोजगार कार्यक्रम राबविणे.
- पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने पुणे शहरात टिंगरेनगर, वडगांवशेरी या ठिकाणी लाईट हाऊस प्रकल्प सुरू करणे.
- **Gender Responsibility** अभ्यासगट तयार करणे व शहर पातळीवर महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे.
- सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी Safety Mapping व Safety Audit करणे.

## (२०) कामगार कल्याण विभाग

### सन २०१९ – २०

- **मृत सेवकांच्या वारसांना अर्थसहाय्य** –

  मृत सेवकांच्या ७७ वारसांना रु. ४०.२५ लाख अर्थसहाय्य प्रदान करण्यात आलेले आहे.

- **कामगार कल्याण निधी –**

  आषाढी वारीनिमित्त आळंदी ते पुणे दरम्यान कामगार दिंडीचे आयोजन करण्यात आले.

  इयत्ता १० वी व १२ वी मधील अनुक्रमे ९५ व २५ महापालिका सेवकांच्या विशेष प्राविण्य मिळविलेल्या पाल्यांचा गुणगौरव करणेत आला.

  मृत सेवकांच्या ७२ वारसांना र.रु. १६.१२ लाख वारस अनुदान वितरित करणेत आले.

  एका मनपा सेवकांच्या पाल्यास र.रु. २५,०००/– शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती वितरित करणेत आली आहे.

- **मराठी भाषा संवर्धन समिती –**

  मराठी भाषा संवर्धन समितीमार्फत पुणे मनपाच्या विविध उद्यानांमध्ये एकुण ११ साहित्यिक कट्टे निर्मित करण्यात आले असून, १३१ कार्यक्रमांचे आयोजन करणेत आले आहे.

  सन २०१५ करिता ९ व सन २०१६ करिता आठ अशा एकुण सतरा साहित्यिकांना साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आले.

  मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित पत्रलेखन स्पर्धेतील १२ विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.

- **ध्वजदिन निधी संकलन –**

  सन २०१९–२० मध्ये मा.जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या उद्दिष्टानुसार मनपा अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडून रु. २०,४१,१५०/– ध्वजदिन संकलित करण्यात आला आहे.

- **अपघात विमा योजना –**

  पुणे महापालिका कायम आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी समूह अपघात विमा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत माहे नोव्हेंबर, २०१९ पर्यंत २ कर्मचाऱ्यांना रु. २० लाख नुकसान भरपाई देण्यात आली.

### सन २०२० – २१

- **गुणवंत कामगार पुरस्कार –**

  सन २०१८–१९ व २०१९–२० मधील ४० अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी गुणवंत कामगार पुरस्कार वितरण समारंभ प्रस्तावित आहे.

- **मराठी भाषा संवर्धन समिती** –

  मराठी भाषा संवर्धन समितीमार्फत आकाशवाणीवर आपली मराठी हा कार्यक्रम प्रसारित करणे, मराठी आठवड्याच्या निमित्ताने ग्रंथ महोत्सव, कवी संमेलन, साहित्य पुरस्कार, साहित्यीक कट्टे, मनपा अधिकारी/कर्मचारी व शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, नाट्यप्रयोग सादरीकरण, साहित्य संमेलन, इत्यादी उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे :

- **अपघात विमा योजना –**

  पुणे महापालिका कायम आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास वा अपंगत्व आल्यास त्यांच्या नामनिर्देशित वारसदारास वा त्यास विमा निधी म्हणून एक ठोक रक्कम मिळावी या हेतूने पुणे महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा राबविणेत येत आहे.

- **महिलांसाठी विविध योजना/सांस्कृतिक कार्यक्रम/प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे –**

  पुणे महानगरपालिकेतील महिला अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी महिला दिनानिमित्त विविध सांस्कृतिक, प्रबोधनपर आणि इतर बाबींच्या अनुषंगाने विविध कार्यक्रम आयाजित करणे, विविध विषयांवर प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणेचे प्रस्तावित आहे.

- याशिवाय कामगार कल्याण निधीमधून विविध कल्याणकारी योजना व उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे.

## (२१) भूसंपादन व व्यवस्थापन विभाग

### सन २०१९ – २०

- पुणे महानगरपालिकेस आवश्यक आरक्षित जागा भूसंपादन कायद्यान्वये ताब्यात घेण्याची कार्यवाही या विभागांतर्गत करण्यात येते. जुना भूसंपादन कायदा १८९४ नुसार एकुण २९१ भूसंपादन प्रकरणाची कार्यवाही शासनातर्फे विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१५ व १६ यांचेमार्फत सुरु होती. तथापि नवीन कायदा २०१३ च्या तरतुदीनुसार अंमलबजावणी करणेकरिता त्यांनी एकुण २९१ चालु प्रकरणांपैकी ४९ प्रकरणांची नवीन भूसंपादन कायद्यानुसार सद्यस्थितीत कार्यवाही सुरु ठेवलेली असून ऊर्वरित २४२ प्रकरणे संबंधित खात्यांच्या प्राधान्यक्रमानुसार व उपलब्ध होणाऱ्या आर्थिक तरतुदीनुसार पुनर्जिवित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
- चांदणी चौक येथील महत्वाकांक्षी रस्ते व वाहतूक नियोजन प्रकल्प राबविण्यासाठी करावयाचे जागेच्या भूसंपादनाकरीता राज्य शासनाकडून र.रू.१८५ कोटी पैकी र.रू.७४.२० कोटी प्राप्त झाले आहेत.

### सन २०२० – २१

**दृष्टीक्षेपात अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२०–२१**

- पुणे महानगरपालिकेस आवश्यक आरक्षित जागा भूसंपादन कायद्यान्वये ताब्यात घेण्याची कार्यवाही या विभागांतर्गत करण्यात येते. जुना भूसंपादन कायदा १८९४ नुसार एकुण १५६ भूसंपादन प्रकरणाची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालया अतंर्गत विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१५ व १६ यांचेमार्फत सुरु होती. तथापि, भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुर्नस्थापना आणि पुनर्वसन अधिनियम २०१३ च्या तरतुदीनुसार अंमलबजावणी करणेकरिता त्यांनी एकुण २६४ चालु प्रकरणांपैकी ६१ प्रकरणांची नवीन भूसंपादन कायद्यानुसार सद्यस्थितीत कार्यवाही सुरु ठेवली असून ऊर्वरित २०३ प्रकरणे संबंधित खात्यांच्या प्राधान्यक्रमानुसार व उपलब्ध होणाऱ्या आर्थिक तरतुदीनुसार पुनर्जिवित करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येणार आहे. चालू असलेल्या भूसंपादनासाठी, निवाडा मंजूरीवर प्रलंबित प्रकरणी तसेच निवाडा मंजूर असलेली तथापि नुकसान भरपाई रक्कम प्राप्त नसलेने निवाडा जाहीर होणेवर प्रलंबित एकुण ३८ प्रकरणांसाठी र.रू.३० कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजना आराखडयामधील विविध आरक्षित जागांचा प्राधान्याने विकास करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक तरतुदी आतापर्यंत भूसंपादन व व्यवस्थापन या विभागाचे अर्थशिर्षकावर करण्यात येत होत्या. तथापि यापुढे संबंधित आरक्षण विकसित करणाऱ्या खात्यांनी त्या आरक्षणाच्या जागांचे भूसंपादन करणेसाठी आवश्यक त्या तरतुदी त्या–त्या खात्यांचे अर्थशिर्षकावर करणेत येणार आहे.
- कोथरुड व बावधन येथील चांदणी चौक येथील उड्डाणपुलाचे पोहोच मार्गासाठी आवश्यक जमिनीचे भूसंपादन करणेकामी महाराष्ट्र शासनाकडून र.रू.११०.८० कोटी इतका निधी मिळणार आहे.

## (२२) अतिक्रमण निर्मुलन विभाग

### सन २०१९-२०२०

- अनधिकृत स्टॉल, हातगाडी, पथारी, अडथळा ठरणारे साहित्य इ.वर महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियम तरतुदीनुसार कारवाई करण्यात आली आहे.
- पथविक्रेता अधिनियम २०१४ नुसार सर्वेक्षण करण्यात आलेल्या पथ विक्रेत्यांचे तात्पुरत्या स्वरुपात विविध झोन शहरामध्ये निर्माण करण्यात येऊन पुनर्वसन करण्यात आले आहे.
- एप्रिल २०१९ ते डिसेंबर २०१९ अखेर २३३ स्टॉल, ६००८ हातगाडी, १३२४८ पथारी व्यावसायिक, ६१३ सिलेंडर, २२७१ शेड/ झोपड्या, ६० इतर व्यावसायिक वाहने व इतर ८८६३ सार्वजनिक रस्ता व पदपथावरील अनाधिकृत व्यावसायिकांवर कारवाई करण्यात आलेली आहे.
- स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत पुणे महापालिका हद्दीतील बेवारस, बंद वाहनांवर पुणे शहर पोलीस वाहतुक विभाग यांच्यासह कारवाई करण्यात आली आहे.
- सन २०१४ च्या हॉकर्स पॉलीसी धोरणानुसार एकुण २९७८६ फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झाले असून त्यापैकी नोंदणीकृत फेरीवाले २१२५७ व ९२९९ पथारी व्यावसायिकांचे पुनर्ववसन करणे आले आहे.
- दि.३०/१२/२०१९ पर्यंत र. रू. ४,४४,०१,८५९/- जमा झाली आहे.

### सन २०२०-२१

**प्रस्तावित नाविन्यपुर्ण प्रकल्प किंवा योजना**

- प्रत्येक परिमंडळ कार्यालय हद्दीमध्ये गोडावून बांधणे, सी.सी.टिव्ही कॅमेरा व तद्नुषंगिक कामे करणे, पथारी प्रकल्प अंमलबजावणी करणे. तसेच पथारी व्यावसायिकांचे पुनर्वसनाकरिता विविध ठिकाणी नव्याने ओटा मार्केट बांधण्यात येणार आहेत.
- परिमंडळ १ ते ५ मध्ये अतिक्रमण विभागाने कारवाई करुन आणलेल्या मालाकरिता टॅगिंग पद्धतीने मालाची नोंद ठेवणे व संगणक प्रणाली विकसित करण्यात येणार आहेत.

**ठळक बाबी**

- फेरीवाले सर्वेक्षण व यंत्रणा राबविणेकामी संगणक प्रणाली विकसित करणेत आलेली आहे.
- हॉकर्स झोन निश्चित करुन त्याप्रमाणे हॉकर्सचे पुनर्वसन करण्यात आले आहे.
- सारसबाग येथे फुड प्लाझाचे नियोजन करण्यात आले आहे.
- शेतकरी आठवडे बाजार नियमान्वित करणे.

# दृष्टीक्षेपात अंदाजपत्रक–

## प्रमुख जमा बाबी :–

### (१) स्थानिक संस्था कर

**सन २०१९–२०**

- मे. महाराष्ट्र राज्य शासन, अधिसूचना क्र.स्थासंक–२०१३/प्र.क्र.२२/नवि–३२ (१), दि. २५/०२/२०१३ अन्वये दि.०१/०४/२०१३ पासून पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ''जकातकर'' ऐवजी ''स्थानिक संस्था कर'' लागू करण्यात आलेला होता. तथापि, मे. राज्य शासनाने दि.०१/०७/२०१७ पासून ''वस्तू व सेवा कर (GST)'' लागू केलेला असल्याने त्यामुळे तेव्हापासून स्थानिक संस्था कर बंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे करापोटी मे.राज्य शासनाकडून माहे जुलै २०१७ पासून दरमहा वस्तू व सेवा कर अनुदान प्राप्त होत आहे.

- सन २०१९–२०२० या आर्थिक वर्षात मे.राज्य शासनाकडून दरमहा र.रू.१५०.०८ कोटी प्रमाणे वस्तु व सेवा कर अनुदानापोटी र.रू. १८०१ कोटी, १% मुद्रांक शुल्क अनुदानापोटी र.रू.२०० कोटी व इतर जमेपोटी र.रू. १.१५ कोटी अशी एकुण र.रू. २,००२.१५ कोटीचे उत्पन्न अंदाजित केले आहे.

- माहे एप्रिल २०१९ ते डिसेंबर २०१९ अखेर (१) वस्तु व सेवाकर अनुदान र.रू.१,२७६.९२ कोटी (२) १% मुद्रांक शुल्क र.रू.१२५.४७ कोटी (३) स्थानिक संस्था कर विविध बाबींपासून प्राप्त उत्पन्न र.रू.१९ लाखाचे उत्पन्न प्राप्त असे एकुण र.रु.१४०२.५८ कोटी जमा झाले असून, खालील तक्त्यात संभाव्य उत्पन्न र.रू. ५२१.४४ कोटी गृहीत धरता सन २०१९–२० या आर्थिक वर्षात र.रू.१,९२४.०२ कोटी उत्पन्न प्राप्त होऊ शकेल.

| अ.क्र. | अपेक्षित उत्पन्न तपशिल | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | माहे जानेवारी २०२० ते मार्च २०२० या तीन महिन्याचे वस्तु व सेवा कर अपेक्षित अनुदान (दरमहा १४१.८८ कोटी प्रमाणे) | ४२५.६४ कोटी |
| २ | माहे जुलै २०१९ ते मार्च २०१९ या नऊ महिन्याचे १% मुद्रांक शुल्क अपेक्षित उत्पन्न | ९४.८१ कोटी |
| ३ | माहे डिसेंबर २०१९ ते मार्च २०२० या चार महिन्यामधील स्थानिक संस्था कराचे संभाव्य प्राप्त उत्पन्न | ०.९९ लाख |
| | **एकुण संभाव्य प्राप्त होणारे अपेक्षित उत्पन्न** | **५२१.४४ कोटी** |

- तथापि, मे. राज्य शासनाकडून पुणे महानगरपालिकेस वस्तु व सेवा कर अनुदान दरमहा र.रु. १४१.८८ कोटी तसेच दि.०१/०४/२०१८ पासून १% मुद्रांक शुल्क अनुदान प्राप्त होत आहे. सदरहू अनुदानाची प्राप्त झालेली रक्कम पाहता स्थानिक संस्था कराचे उत्पन्नाचे दिलेले उद्दीष्ट र.रू.७६ कोटीने कमी होणार आहे.

- स्थानिक संस्था कर कार्यालयाकडे सन २०१३–१४ पासून आजअखेर ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने विवरणपत्र दाखल करण्याची व्यवस्था करण्यात आलेली असून, दाखल झालेल्या वार्षिक विवरणपत्रांपैकी सन २०१३–१४ व १४–१५ या आर्थिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या विवरणपत्रातून कर भरल्याचे प्रमाणात अ,ब,क,ड या वर्गवारीप्रमाणे तपासणीचे कामकाज या कार्यालयाकडील सेवकांकडून करून घेण्यात येत आहे.

- सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात मे. राज्य शासनाकडून दरमहा र.रू.१५३.२३ कोटी प्रमाणे वस्तु व सेवा कर अनुदानापोटी र.रू १,८३८.७६ कोटी, १% मुद्रांक शुल्क अनुदानापोटी र.रू.२५० कोटी व इतर जमेपोटी र.रू.१.२४ कोटी असे एकुण र.रू. २,०९० कोटीचे उत्पन्न गृहीत धरण्यात आलेले आहे.

## (२) <u>मिळकत कर</u>

**सन २०१९-२०**

**<u>उद्दीष्ट र.रु. २११६ कोटी</u>**

- सन २०१९-२० या वर्षाचे मिळकतकर देयके संगणकीय प्रोग्रॅममधुन डेटा उपलब्ध करुन सुमारे ९२५१२५ इतकी बिले छपाई करून पोस्टामार्फत १५ एप्रिलपर्यंत वाटप करणेत आली. संपूर्ण कर जमा करणाऱ्या मिळकतधारकांना सर्वसाधारण करामध्ये ५ ते १० टक्के सवलत दि.०१/०४/२०१९ ते ३१/५/२०१९ पर्यंत ठेवण्यात आली होती सदर कालावधीत मिळकतकरापोटी सुमारे र.रू.६९९.५७ कोटी इतकी रक्कम जमा केली आहे.
- जे निवासी मिळकतधारक सन १९-२० या वर्षाचा संपूर्ण मिळकतकर भरतील त्यांना र.रू. ५ लाखाचा अपघाती विमा संरक्षण पुणे मनपाकडून देणेत येत आहे. आजअखेर १३ लाभार्थ्यांना या विम्यापोटी र.रु. ६५ लाख इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.
- मिळकतकराच्या डेटाबेसमध्ये सुमारे ९,३३,४३४ भ्रमणध्वनी व ईमेल ७,२३,६३२ समाविष्ट केलेले आहेत. भ्रमणध्वनी क्रमांकावर व ई-मेल वर सन २०२०-२१ मधील मिळकतकर विषयक मागणीची रक्कम मुदतीत भरणेबाबत तसेच मुदतीत कर न भरल्यास दरमहा २% शास्ती आकारणीबाबतची माहिती मिळकतकरधारकांना पाठविण्यात आली होती. तसेच भ्रमणध्वनी वर निवडणूक मतदान जागृती व स्वच्छता सर्व्हेक्षण याचा प्रसार करण्यात आला आहे.
- १००० स्वे फुटापर्यंतच्या निवासी स्वरूपाच्या अनधिकृत मिळकतींना तीनपटची शास्ती दि.०१/०४/२०१९ पासून रद्द करणेत आलेली आहे.तसेच ज्या निवासी स्वरूपाच्या अनधिकृत १००१ स्वे फुटापेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या मिळकतींना तीनपट ऐवजी दिडपट शास्ती लागु करणेत आलेली आहे.
- समान पाणी वाटप योजना (२४ X ७) अंतर्गत पाणीपट्टीमध्ये १५% वाढ करणेत आलेली आहे. (धार्मिक स्थळांना सदर १५% दरवाढ यापूर्वीच वगळण्यात आली आहे.)
- तसेच सन २०१९-२० मध्ये यूपीआय (Unified Payment Interface) व ईबीपीपी; (Electonic Bill Payment & Presentation) प्रक्रिया पूर्ण झाली असून बिलडेस्क, टेक प्रोसेसर व सिट्रस मार्फत आरटीजीएस व एनएफटी व्दारे ऑनलाइन कर भरणा करण्यात येत आहे. यामुळे नागरीकांनी त्यांच्या बँकेला फॉर्म भरुन दिल्यास माहे १ एप्रिल रोजी त्यांचे खात्यातून मिळकतकराची रक्कम पुणे मनपाच्या खात्यामध्ये जमा होणार आहे. तसेच Paytm सोबत इंटिग्रेशन करण्यात आले आहे त्यामुळे मिळकतधारकांना मिळकतकर Paytm व्दारे भरण्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे. यामुळे नागरीकांना कर भरण्यासाठी रांगेत उभे राहावे लागणार नसून नागरीकांचा बहुमुल्य वेळ वाचत आहे.
- मिळकतकर आकारणीचे जुन्या दस्ताऐवजांचे स्कॅनिंग व संगणकावर 'अे' फॉर्म अपलोडींगचे काम जास्तीत जास्त प्रमाणात करणेत आलेले आहे. यामुळे मिळकतकराच्या आकारणीचे सर्व दस्तऐवजांचे जतन होत आहे
- दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/१२/२०१९ अखेर मिळकतकरापोटी रू. १०८२.६४ कोटी इतकी रक्कम जमा झाली आहे. पुढील ३ महिन्याच्या कालावधीमध्ये सुमारे र.रु.३५० कोटी इतकी रक्कम जमा होणे अपेक्षित असून दि.३१/०३/२०२० अखेर र.रु. १३५७.२८ कोटी इतकी रक्कम जमा होणे अपेक्षित आहे.

- मिळकतकराची रक्कम जास्तीत जास्त ऑनलाईन स्विकारणेबाबत खात्याकडून प्रोत्साहन देण्यात आले असून सन २०१८-२०१९ मध्ये ४७.१९% ऑनलाईन कलेक्शन होते व २०१९-२० मध्ये माहे आक्टोबर अखेर ५०.५९% ऑन लाईन कलेक्शन झाले आहे. मिळकतकर ऑनलाईन भरणाऱ्या नागरिकांच्या संख्येत वाढ झालेली आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील व नव्याने समाविष्ट केलेल्या मिळकतींची निवासी, बिगरनिवासी, मोकळ्या व एकत्रित अशा सुमारे १०,४१,६८७ इतक्या मिळकती आहेत. तसेच नविन गाव हद्दवाढीतील ८ ड ला नोंदी न झालेल्या मिळकतींना आकारणी करणेत येत असून आकारणीमुळे मिळकतकराच्या मागणीमध्ये देखील वाढ होत आहे. यामुळे पुणे मनपाच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.

### सन २०२०-२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक- उद्दीष्ट र.रु. २२५३ कोटी

- मा.मुख्यसभा ठराव क्र.८०९ दि.१६/०२/२०१६ अन्वये सन २०१६-१७ सालासाठी मिळकतकरातील पाणीपट्टीपोटी १२ टक्के दरवाढ करणेस व त्यापुढील चार वर्षे समान पाणी वाटप योजना (२४ X ७) पूर्ण होईपर्यंत पाणीपट्टीमध्ये सन २०२०-२१ पर्यंत दरवर्षी १५% ने वाढ करणेस मान्यता देण्यात आलेली असून यामुळे सुमारे अंदाजित रू.२९ कोटी इतके वाढीव उत्पन्न अपेक्षित आहे. (धार्मिकस्थळांना सदर १५% दरवाढ यापूर्वीच वगळण्यात आली आहे)
- सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता म्हणजेच दि.०१/०४/२०२० ते दि.३१/०५/२०२० अखेर मिळकत कराची संपूर्ण रक्कम भरल्यास सर्वसाधारण करामध्ये ५% ते १०% सवलत देणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. जेणेकरुन पहिल्या २ महिन्यामध्ये मिळकत कराची रक्कम मोठ्या प्रमाणात जमा होईल.
- सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये नव्याने सर्वसाधारण करामध्ये (वार्षिक करपात्र रक्कमेवर) प्रत्येक टप्प्यास (Slab) ५.५%, जललाभ करामध्ये १.५%, जलनि:स्सारण करामध्ये ५% अशी वाढ सुचविण्यात आली असून त्यामुळे सुमारे १५० कोटी वाढीव उत्पन्न अपेक्षित आहे. सदरची वाढ ही मोबाईल टॉवर कंपन्या, आयटी आणि आयटीईएस कंपन्या यांनाही लागू राहील.
- ग्रामपंचायतकडील कर आकारणी न झालेल्या मिळकती व पुणे शहरातील हद्दीतील नव्याने बांधकाम झालेल्या (नव्याने भोगवटा पत्र मिळालेल्या) मिळकतींची आकारणी करणेत येत असून यामुळे पुणे मनपाच्या महसुलीमध्ये वाढ होणार आहे.

## (३) बांधकाम परवानगी व विकास शुल्क

### सन २०१९-२०

- **सन २०१९-२०२०** या आर्थिक वर्षाकरिता सद्यस्थितीतील बांधकाम क्षेत्रातील कल, प्रस्ताव संमतीकरण व जमा महसूल यांचा ताळमेळ पाहता बांधकाम विकास विभागाकडील जमा महसूलचे रू.८९९.६६ कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. बांधकाम क्षेत्रातील मंदीमुळे जमेचे उद्दिष्ट साध्य झाले नाही. डिसेंबर २०१९ अखेर सुमारे र.रू. ५२०.२८ कोटी जमा झालेले आहेत. तसेच ३१ मार्च २०२० अखेर पर्यंत एकुण र. रू.६५०.०० कोटी जमा होणे अपेक्षित आहे.

### सन २०२०–२१ (उद्दिष्ट र.रू.७५० कोटी)

- सन २०२०–२०२१ या अंदाजपत्रकीय वर्षात जमा महसुल र.रू. ७५० कोटी अपेक्षित आहे. तसेच ऑनलाईन ॲटोडीसीआर (Auto DCR) जलदगतीने बांधकाम परवानगीची कार्यपध्दती अवलंबून सदरचे उद्दिष्ट पूर्ण करणे शक्य होणार आहे. पुणे मनपा हद्दीसाठी मंजूर करण्यात आलेल्या सुधारित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०१७ मध्ये नव्याने प्रिमियम एफ.एस.आय., आय.टी./आय.टी.एस.इ. इमारतीसाठीचा अतिरिक्त एफ.एस.आय. व विशेष इमारतीसाठीचा अतिरिक्त एफ.एस.आय. पोटी प्रिमियम जमा होणार असल्याने सदर उद्दिष्ट गाठणे शक्य होणार आहे.

## (४) पाणीपट्टी

### सन २०१९–२०

- सन २०१९–२० सालासाठी मा.स्थायी समितीने मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार पाणीपुरवठा विभागासाठी महसुली कामासाठी र.रु. ५८६.९३ कोटी व भांडवली कामासाठी र.रु ५७९.८३ कोटी असे एकुण र.रु. ११६६.१७ कोटीची तरतूद करण्यात आली होती. या तरतूदीचे अनुषंगाने सन २०१९–२० सालासाठी पाणीपट्टीपोटी र.रु. ३२० कोटी मिळणेचे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक ३१/१२/२०१९ रोजी पर्यत मीटरद्वारे पाणीपट्टीपोटी र.रु. ७१.२५ कोटी जमा झालेले आहे.
- मीटरवरील दि. १५/०३/२०१७ अखेर एकुण नळजोड संख्या ४२,९५३ इतकी असून, थकबाकी सुमारे र. रू. ५०२.६३ कोटी आहे. दुबार पाणीपट्टी, नादुरुस्त मीटर बंद असल्याने, नळजोड बंद घोषित झोपडपट्टीमधील पाणीपट्टी, रस्ता रूंदीकरणामधील नळजोड इ. कारणांमुळे मीटर पाणीपट्टीची अवाजवी थकबाकी आलेली आहे. सध्याचे पाण्याचे मीटर बसविण्याची जबाबदारी संबंधित ग्राहकाची आहे. तसेच सदर मीटर मेकॅनिकल तंत्रज्ञानाचे असल्याने वारंवार नादुरूस्त होत आहे. सध्याचे सुमारे ४९% मीटर नादुरूस्त आहे व नादुरूस्तीच्या काळात सरासरी वापरापेक्षा जादा वापर गृहीत धरून बिलाची आकारणी करण्यात येते व मीटर दुरूस्त केल्यानंतर सदर बिलाची दुरूस्ती करण्यात येते. बिल दुरूस्तीची कार्यवाही खात्यामार्फत करण्यात येत असून, बिल दुरूस्ती नंतर वसूली होणारी रक्कम ही २० ते २५% इतकी असून, अवाजवी थकबाकी निरस्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.
- सन २०१९–२० या आर्थिक वर्षामध्ये मे.कोर्टा मार्फत २ वेळा लोक अदालत राबविण्यात येऊन अंदाजे र. रू.१.७६ कोटी थकबाकी वसुल करण्यात आली आहे.
- सन २०१९–२० या करीता टप्पेनिहाय (टेलास्कोपिक )पाणीपट्टी दरास मा. मुख्य सभा ठ. क्र. ५९८, दि. १२/२/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. मीटरद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठयाची पाणीपट्टी दरवर्षी सरासरी अंदाजे ६५ ते ६७ कोटी इतकी जमा होते. सन २०१९–२० या अर्थिक वर्षामध्ये ३१/१२/२०१९ अखेर र.रु. ७१.२५ कोटी इतकी जमा झालेली आहे.

| अ. क्र. | वर्ष | वसुली (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | २०१४–१५ | ५८.०३ |
| २ | २०१५–१६ | ७१.६७ |
| ३ | २०१६–१७ | ९३.९३ |
| ४ | २०१७–१८ | ९९.९१ |
| ५ | २०१८–१९ | १०३.७१ |
| ६ | २०१९–२० | ७१.२५ (३१/१२/२०१९ पर्यंत) |

- घरगुती व बिगर घरगुतीच्या मीटर पाणीपट्टीच्या दरामध्ये टप्पेनिहाय (टेलास्कोपिक) दरवाढ मा.मुख्य सभा ठराव क्र. २२७७, दिनांक ०५/०२/२०१६ अन्वये मान्य करण्यात आलेला आहे. यामुळे पाण्याचा कमी वापर करणाऱ्या नळजोड धारकांना कमी दराने बिल व पाण्याचा जादा वापर करणाऱ्या नळजोड धारकांना जादा दराने बिलांची आकारणी करण्यात येणार आहे. यामुळे पाणी वापरावर परिणाम होणार असून पाणी वाया जाण्याचे प्रमाणे कमी होणे अपेक्षित आहे. तसेच या वाढीव मीटर पाणीपट्टीमुळे पाणीपुरवठा करणेसाठी होणारा खर्च भरून काढणे शक्य होणार आहे.

**सन २०२०-२१ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक (उद्दिष्ट र.रू.२०२ कोटी)**

- सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये शहरातील अनधिकृत नळजोड शोधून त्यावर कारवाई करण्याची मोहिम हाती घेण्यात येणार आहे. त्याप्रमाणे वेळोवेळी लोकअदालतचे आयोजन करून थकबाकीदारांकडून रक्कम वसुल करण्याबाबतची मोहिम सुध्दा राबविण्यात येणार आहे. समान पाणीवाटप योजनेमध्ये अल्ट्रासोनीक/ इलेक्ट्रामॅग्नेटीक मीटर बसविण्यात येणार असल्याने मीटर नादुरूस्तीचे प्रमाणे कमी होऊन थकबाकी कमी होण्यास मदत होणार आहे.

**वापरानुसार दर आकारणी**

| **सध्याचे दर** | | **प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|
| खप कि.लि./महिना | दर (सन २०१९) | खप कि.लि./महिना | दर (सन २०२०) |
| **झोपडपट्टी** | | | |
| कच्ची झोपडी | ४०.२२/महिना | कच्ची झोपडी | ४२.२३ /महिना |
| पक्की झोपडी | ६६.९९/महिना | पक्की झोपडी | ७०.३४ /महिना |
| **घरगुती पाणी वापर दर** | | | |
| ० ते १८.६० | ६.३७ | ० ते १८.६० | ६.६९ |
| १८.६० ते ३०.०० | १०.६४ | १८.६० ते ३०.०० | ११.१७ |
| ३०.०० ते ३७.५ | २१.१८ | ३०.०० ते ३७.५ | २२.२४ |
| ३७.५ पेक्षा जास्त | ३१.८३ | ३७.५ पेक्षा जास्त | ३३.४२ |
| **बिगर घरगुती वापर दर** | | | |
| ० ते २० | ५५.१० | ० ते २० | ५७.८६ |
| २० ते ४० | ५७.१८ | २० ते ४० | ६०.०४ |
| ४० ते ६० | ६०.०९ | ४० ते ६० | ६३.०९ |
| ६० पेक्षा जास्त | ६९.२२ | ६० पेक्षा जास्त | ७२.६८ |

## (५) <u>आकाशचिन्ह परवाना</u>

**सन २०१९-२०**

- सन २०१९-२० मध्ये जाहिरात फलकांचे व नामफलकाचे दि. ०१/०४/२०१९ ते दि. ३१/१२/२०१९ अखेर र.रु.३,७३,६६,८६१/- एवढे उत्पन्न प्राप्त झाले आहे. परंतु प्रति चौ.फुट र.रु. २२२/- शुल्काबाबत मे. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. १०६८४/२०१८ दाखल असल्याने दि. ०१/१०/२०१८ पासून जाहिरातदारांनी शुल्क भरलेले नाही. तसेच खात्याचे उत्पन्न वाढविणेसाठी पुणे महानगरपालिकेच्या रस्त्यांवर दिशादर्शक कमानी तसेच सार्वजनिक जागांवर लावण्यात येणारे जाहिरात फलकांबाबत निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. परंतु निविदाधारकांच्या अपुऱ्या कागदपत्रामुळे निविदा प्रक्रिया रद्द करुन फेरनिविदा मागविणेबाबतची प्रक्रिया सुरु आहे त्यामुळे १०० कोटीचे उत्पन्न खात्यास प्राप्त झालेले नाही.

- सन २०१९-२० मध्ये दि. ०१/०४/२०१९ ते ३०/११/२०१९ अखेर परमिट, परवानाचे र.रु. ११,६९,७०५/- व फॉर्म विक्रीपोटी र.रु.१७,८५५/- एवढे उत्पन्न प्राप्त झालेले आहे.
- सन २०१८-१९ व २०१९-२० मध्ये मनपाच्या ताब्यात असलेले दिशादर्शक कमानी व जाहिरात फलकांचे ई-ऑक्शनव्दारे र.रु. ३,४१,९९,९२९/- प्राप्त झाल्याने त्यावर १८% जी.एस.टी. र.रु. ५९,०५,४२१/- शासनास प्रदान करण्यात आलेली आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या (सन २००७ ते २०११) या कालावधीतील जाहिरात फलकावरील सर्व्हिस टॅक्सवरील दंड २,०८,२७,८००/- शासनास सन २०१८-१९ मध्ये प्रदान केलेला आहे. तसेच सर्व्हिस टॅकसचे दंडावर मे. ट्रॅब्यूनल कोर्टात अपील दाखल करण्यात आलेले आहे.

## सन २०२०-२१

- सन २०२०-२१ चे जाहिरात फलकाबाबत मे.कोर्टाचा निकाल पुणे महानगरपालिकेच्या बाजूने लागल्यास दि. ०१/१०/२०१८ ते ३१/०३/२०२० एकुण र.रु. ४० कोटी व सन २०२०-२१ चे र.रू. ३०कोटी उत्पन्न अंदाजे खात्यास प्राप्त होऊ शकते. याशिवाय खात्याचे उत्पन्न वाढविणेसाठी पुणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक जागेवर जाहिरात फलक उभारण्याची नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेत येत असून यातून अंदाजे र.रु.५० कोटी असे एकुण जाहिरात शुल्कापोटी र.रू.८० कोटीचे उत्पन्न अपेक्षित आहे.
- परवाना व परमिट शुल्क दरवाढ करणेबाबत खात्यामार्फत मा. मुख्य सभेमध्ये विषयपत्र दाखल असून त्यास मान्यता मिळालेल्या दिनांकापासून नवीन दरवाढ लागू होणार असल्याने यातून अंदाजे र. रू. १ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.
- विकेंद्रिकरणामुळे अनधिकृत/नियमबाहय जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, पोस्टर, झेंडे, किऑक्स इ.वर निविदा प्रक्रिया करुन ठेकेदारामार्फत कारवाई करणेसाठी सर्व क्षेत्रिय कार्यालयांना पुढील आर्थिक वर्षापासून आपल्या स्तरावर अंदाजपत्रकीय तरतूद करणेबाबत सूचविण्यात आलेली आहे.

**सन २०१९–२० या आर्थिक वर्षातील जमेचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.**

*(आकडे रुपये कोटीत)*

| जमा बाजू | | |
|---|---|---|
| **अर्थशिर्षक** | **२०१९–२० साठीचे जमेचे उद्दीष्ट** | **माहे डिसेंबर २०१९ अखेर प्रत्यक्ष जमा** |
| सुरवातीची शिल्लक | ०.०२ | – |
| स्थानिक संस्था कर | १९९.१५ | १२४.१७ |
| वस्तु आणि सेवा कर (GST) | १८०१.०० | १२७६.९२ |
| मिळकतकर | १९२१.८७ | ८२६.६१ |
| पाणीपट्टी | ४९७.३५ | १९७.४९ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ८९९.६६ | ५८८.९७ |
| इतर जमा | ७४२.५० | २०५.९९ |
| अमृत व स्मार्ट सिटी अभियान अनुदान | १३.८५ | – |
| शासकीय अनुदान | २३९.६० | १२२.३६ |
| प्रधानमंत्री आवास योजना | ५०.०० | – |
| कर्ज/कर्जरोखे | ४००.०० | – |
| **एकुण रक्कम रुपये** | **६७६५.००** | **३३४२.५१** |

## *(ब) दृष्टीक्षेपात सन २०२०–२१ आर्थिक वर्षासाठी जमाखर्चाचा अंदाज–*

**सन २०२०–२१ या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येतआहे.**

*(आकडे रूपये कोटीत)*

| **जमा बाजू** | | **खर्च बाजू** | |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | १८६०.५० |
| स्थानिक संस्था कर | २३९.१५ | वीज खर्च व दुरूस्ती | २९२.९६ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | १८३८.७६ | पाणी खर्च | १००.३५ |
| मिळकतकर | १९७०.२० | कर्ज परतफेड, व्याज व घसारा | ९१.०४ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ७४९.२५ | औषधे, पेट्रोल/डिझेल | १५१.३० |
| पाणीपट्टी | ४६३.०० | देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | १११८.३६ |
| शासकीय अनुदान | १९६.७४ | वॉर्डस्तरीय | ३४.८० |
| इतर जमा | ४८९.२६ | क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | ८३.६७ |
| कर्ज/रोखे | २००.०० | | |
| प्रधानमंत्री आवास योजना | ८२.६२ | भांडवली व विकासाची कामे | २३७३.३० |
| | | अमृत व स्मार्ट सिटी अभियान | १२२.७० |
| | | वर्षा अखेरची शिल्लक | ०.०२ |
| **एकुण** | **६२२९.००** | **एकुण** | **६२२९.००** |

अंदाजपत्रकाच्या अंमलबजावणीवर शहराच्या सर्व नागरिकांच्या सेवासुविधांसह शहराचा सर्वांगीण विकास व इतर अनुषंगिक विकासात्मक बाबी या अवलंबून असतात. अंदाजपत्रकात नमूद विकास कामे व त्याच्या अंमलबजावणी जबाबदारी व दायित्व प्रशासनाच्या खांद्यावर असल्याने मी सादर केलेले हे अंदाजपत्रक आपल्या शहराच्या सर्व आशाआकांशा पूर्ण करेल, असा मनोदय व्यक्त करतो. अंदाजपत्रक सादर करताना मा. महापौर, मा. उपमहापौर, मा.अध्यक्ष, स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्षनेते, मा.सर्व पक्षनेते, मा. सर्व पदाधिकारी, मा. प्रभाग समिती अध्यक्ष, मा. वृक्ष संवर्धन समिती सदस्य, मा. सर्व सभासद, अधिकारी व कर्मचारी वर्ग, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था व सर्व प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी या सर्वांचे मी मन:पूर्वक आभारी व्यक्त करतो !

मा. केंद्रातील व राज्यातील सर्व माननीय मंत्रीमहोदय, मा. संसद सदस्य, मा.राज्यसभा सदस्य, मा.विधानसभा व मा.विधान परिषद सदस्य, शासनाच्या विविध महामंडळावरील सदस्य, केंद्र व राज्य शासनाचे सर्व वरिष्ठ अधिकारी यांचेही वेळोवेळी सहकार्य असून, अंदाजपत्रक तयार करताना ज्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य मिळाले, त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो !

या प्रस्तावित अर्थसंकल्पाला मूर्तरुप देण्यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य मिळेल या अपेक्षेसह मी आज दिनांक २७.०१.२०२० रोजी पुणे महानगरपालिकेतील माझे पहिले अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करीत आहे.

**(शेखर गायकवाड)**
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

दिनांक : २७.०१.२०२०